# राग दरबारी

डॉ. नितीन मोरे



# राग दरबारी

## (एकांकिकासंग्रह)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# राग दरबारी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# राग दरबारी (एकांकिका संग्रह)

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com


प्रकाशन : ८ जून २०१९


©esahity Pratishthan®2019


विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.


डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



डॉ. नितीन मोरे
केल्याने
देशाटन


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

## डॉ. नितीन मोरे यांची साहित्यसंपदा:

1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,
4. नाच जमूरे नाच,
5. अहम ब्रह्मास्मि,
6. मच्छर टाईम्स,
7. संवादोनी प्रकटावे
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास
12. शिभ्रष्टाचार!
13. आधुनिक कहाण्या
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार
15. राग दरबारी










ही सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर विनामूल्य उपलब्ध आहेत.

www.esahity.com



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
(HALL OF RESIDENCE)
प्रेमातुराणां



डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२



डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,


डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स


डॉ. नितीन मोरे
संवादोनी
प्रकटावे


डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

## डॉ. नितीन मोरे यांच्या पंधराव्या पुस्तकाच्या निमित्ताने

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची पंधरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची चार,डॉ. स्मिता दामले यांची सात, डॉ. वृषाली जोशी यांची पाच अशा अनेकांच्या

पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान



# राग दरबारी! ( एकांकिका संग्रह )

अनुक्रम


१ राग दरबारी!

२ महाराजांची स्टोरी!

३ केबीपी.. अर्थात.. कोण बनेल प्रधानमंत्री

४ ओसाडगावचा जनदरबार!

५ महाराज हिमसागरांचा भाषासागर!

६ हास्यराज महाराजांच्या दरबारात

७ गंभीरसेन महाराजांचा गंभीरपुर दरबार!

८ महाराज गीतशरण यांचा दरबार

९ महाराज सत्यदेवराय यांचा दरबार

# प्रस्तावना



आपल्या येथे काही राजेशाही व्यवस्था नाही. त्यामुळे राजेशाहीतील गंमती जंमतींस आपण मुकतो की काय असे वाटते कधीकधी. राजा म्हटले की त्याचा दरबार आला. त्याचे दरबारी आले. प्रधान आणि मंत्रीमंडळ आले. मग त्यात तडकाफडकी निर्णय आले. लहरी राजा किंवा अंधेर नगरी चौपट राजा आपल्याकडे प्रसिद्ध आहेत. त्याच्या राज्यातल्या गंमती असोत किंवा मती गुंग करणाऱ्या करामती असोत..

या राजदरबारी राग दरबारी एकांकिकांतून असलेच काही राजे भेटीस येत आहेत. त्यांना भेटून वाचकांचेही 'मनोरंजन' व्हावे ही अपेक्षा!

डॉ. नितीन मोरे



# अर्पणपत्रिका

**आपल्या लोकशाहीतील अनेक अनभिषिक्त राजे महाराजांस!**



# १ राग दरबारी!

स्थळ: **हुकुमचंद महाराजांचा दरबार.**

पाठून घोषणा होते:

राजाधिराज हुकुमचंद महाराज

हुकुम ए ताबेदार.. फौज ए फौजदार मालिक ए मर्जी .. नंबर ए मनमौजी

राजाओंके राजा .. गुनाहों के सजा

दिल ए बहार .. दिल ए खुश

नहीं ए नासाज.. तबियत ए बेताज

सदा आनंदी .. जणू जास्वंदी ..

राजाधिराज हुकुमचंदजी महाराज यून राह्यले आहेत हो..**sss**

उपनेत्र लावून वा गॉगल लावून..

निगाह रखो.. निगाह रखो.. निगाह रखो.. तीन वेळा निगाह रखो

महाराज हुकुमचंद ताडताड चालत येऊन बसतात. त्यांच्या तोंडावर रागावल्याचा भाव आहे. दरबारी एकमुखाने जयजयकार करतात.. हुकुमचंद महाराजांचा विजय असो.. विजय असो.. विजय असो! तीन वेळा विजय असो!

महाराज सिंहासनावर बसतात.

महाराज: प्रधानजी..

प्रधानजी: जी हुजूर.. जो आज्ञा.. जो हुकूम

महाराज: आज आम्ही वृद्ध आहोत प्रधानजी

प्रधानजी: नाही महाराज, आपण वृद्ध नाही. आपल्या केशकलापातील चुकार केस भले ही चमकत असेल.. आपल्या उपजत तैलबुद्धीवर भलेही गंज चढल्याचा कुणास भास होत असेल. तीस मालिश करून पॉलिश केल्यास ती परत बालिशपणे चमकू लागेल.. म्हणजे अंधारातील चमकणाऱ्या काजव्या सारखी. पण महाराज आपण वृद्ध नाही.. प्रत्यक्ष वगसम्राज्ञी कोकिळाबाई कोपरपूरकरीणीने प्रत्यक्ष अनुभवातून प्रत्यक्ष आम्हास प्रत्यक्ष सांगितले.. अन या कानांनी आम्ही प्रत्यक्ष आइकले. ते चुकीचे कसे असेल?

महाराज: नाही प्रधानजी नाही.. या सगळयांचा आमच्या वृद्ध असण्याशी संबंध? आम्ही आज अत्यंत वृद्ध आहोत.

सेनापती: नाही महाराज

शिक्षणमंत्री: नाही महाराज.. वृद्ध होवोत तुमचे शत्रू.. तुम्हाला अन्य काही कथन करायचेय महाराज?

प्रधानजी: होय महाराज. आम्हाला तेच वाटते. आपणास दुसरे काही म्हणावयाचे आहे काय?

शिक्षणमंत्री: होय महाराज. कुठल्याही दृष्टीने आपण वृद्ध नाहीत. आपल्या शिरकमलावरील श्यामवर्णीय कुंतलांचा सांगावा आहे. चिरतरूण आहात आपण. कुण्या देवीच्या वरदहस्ताचे वरदान लाभलेले आपणास.. झालेच तर राणी सरकारांस विचारावे.. ( एकाएकी जीभ चावत.. प्रधानजींस सांगितल्यासारखे..) महाराजांच्या या अशा उपरोक्त उद्विग्न उक्तीमागील उद्वेग आणि उद्देश उमलून वा उलगडून..

महाराज: सोपा करा.. मेकीटीझी..

शिक्षणमंत्री: काय महाराज? आपल्या आदेशाने आपल्या येथील एकेक बाबीस सोपे करू.. सुलभ करू.. सरल करू.. फक्त काय ते वदावे

महाराज: एवढे सारे करण्याआधी तुमची भाषा सोपी करा..

शिक्षणमंत्री: हुकूम महाराज. आपल्या हुकुमाबर हुकुम आम्ही ताबेदार ए शपथ.. वाहतो की यापुढे सारे शिक्षणच सोपे करून टाकू..नुसती भाषाच नाही! काढून टाकू तो परिक्षेचा यज्ञ ज्यात पडतात कित्येक निष्पाप जीवांच्या आहुती आणि समिधा बनतात कोवळी कोवळी बाळे.. आपल्या कोवळया मेंदूत घालताना ज्ञानाचे तुषार आणि कण..

महाराज: शिक्षणमंत्री.. आठवतेय.. तुम्ही काही पळांपूर्वी दिलेले आश्वासन! सोपीकरण आणि आणि तुम्ही बोलताय ते किती कठीणीकरण..

शिक्षणमंत्री: अंत:करणाच्या तळापासून क्षमस्व..

महाराज: हेच ते.. हेच ते ज्यामुळे आम्ही वृद्ध झालो आहोत..

प्रधानजी: शिक्षणमंत्र्यांमुळे महाराज**?** पण आपण वृद्ध नाही महाराज

शिक्षणमंत्री: मनापासून माफी महाराज. पण आपणास वृद्ध म्हणणाऱ्याचे नयन किंवा अंतर्चक्षू नक्कीच..

प्रधानजी: डोळे फुटले असणार म्हणायचेय ना शिक्षणमंत्री**?** तसे म्हणा!

शिक्षणमंत्री: होय प्रधानजी. आमची जीभ घसरल्यावाचून राहात नाही.

सेनापती: कोण आहे तो माईचा लाल ज्याची ही जुर्रत की त्याने करावी अशी बदमाशी. प्रत्यक्ष माबदौलत हुकूम ए ताबेदारांस त्यांच्या वयावरून हिणवावे! धिक्कार! आपली आज्ञा असेल तर आम्ही आमच्या तळपत्या भाल्याच्या टोकदार अग्रावर आणून दाखवतो त्याचे शिर.. अर्थात मुंडके!

महाराज: आम्हास तुमचा जोश कळतो पण होश तितकाच महत्वाचा! सेनापती**,** पण आम्हास सांगायचे ते आम्ही वृद्ध झालो आहोत ते. त्याचा वयाशी काय संबंध**?**

शिक्षणमंत्री: महाराज..

प्रधानजी: थांबवावे! शिक्षणमंत्री आपले शिक्षण येथेच!

शिक्षणमंत्री: नाही. आम्ही ह्या मुखी वचन देतो.. आम्ही त्यागणार आमच्या निवेदनाची काठिण्यपातळी.. निदान काही घरे खाली घेऊ ती.. पातळी!

प्रधानजी: तेच आम्ही सांगत होतो मंत्री तुम्हास. पातळी सोडण्यास.. तेव्हा ते राहू द्यावेत. जेव्हा आपल्या वळवळत्या जिभेत हाड उगवेल तेव्हा पुढील काही सांगावे. तोवर हे वृद्धपणाचे त्रांगडे आपणासच सोडवावे लागेल सेनापती

महाराज: होय, आम्ही आज अत्यंत वृद्ध झालो आहोत. का होणार नाही आम्ही वृद्ध? आधीच तसे होतो आम्ही त्यात आमचे मंत्रीगण एकावर एक वरताण! का आम्ही होणार नाही वृद्ध? सकाळसकाळी आमचा हुकूम.. या राजा हुकुमचंदाचा हुकूम मानत नाही म्हणजे काय.. आम्ही अत्यंत वृद्ध झालो त्यामुळेच.

सांस्कृतिक मंत्री: महाराज, वृद्ध शब्द आपण कोणत्या अर्थाने वापरत आहात ते कळेल काय?

महाराज: खामोश! आम्ही अशा प्रश्नाने अजूनच वृद्ध झालोय! एक ते शिक्षणमंत्री.. अशी भाषा बोलताहेत जणू छापखान्यातले खिळेच बसवलेत दातांच्या जागी. आणि आपण आम्हास असा सवाल विचारू धजता! का आम्ही होणार नाही वृद्ध?

प्रधानजी: माफी असावी महाराज. आपण वृद्ध झालात ते कळले पण का झालात ते.. म्हणजे या आपल्या दरबाऱ्यांनी काही हातभार लावला असेलही पण दरबारात येतानाच आपण का वृद्ध झालेलात ते कळू शकेल काय?

महाराज: शिपाई, सामोरी ये असा

( शिपाई येऊन उभा राहातो )

महाराज: आज सकाळी काय झाले?

प्रधानजी: शिपाई..? या शिपुरड्याने?

शिपाई( घाबरत): नाही. मी आत्ताच तर दरबारात येत आहे

प्रधानजी: तू नाही केलेस? म्हणजे तू काय केले नाहीस की महाराजांस अचानक वृद्ध झाल्याचे वाटू लागले?

शिपाई: काही नाही.. मी काही नाही

प्रधानजी: तेच विचारत आहोत आम्ही

महाराज: शिपायाने काहीच नाही केले!

प्रधानजी: म्हणून आपण वृद्ध झालात.. महाराज  हुकुमचंदांचा हुकूम असेल तर शिपायास काळकोठडीत रवाना करू आम्ही महाराज**?**

महाराज: प्रधानजी.. जरा थंड घ्या! आम्ही शिपायास विचारत होतो आज सकाळी काय झाले ते..

प्रधानजी: माफी महाराज. आम्हाला वाटले या नाचीज शिपायाने आपले आवडीचे मॉझरेला चीज आणले नाही.. आणि थंड म्हणाल तर आम्हाला सर्दी होते त्याने.. तरी महाराज हुकुमचंदांचा हुकूम असेल तर घेऊ आम्ही थंड.. पेप्सी की थम्स अप की लिंबू सरबत**?**

महाराज( दुर्लक्ष करीत): तर शिपाई.. आज सकाळी काय झाले**?**

शिपाई: काय होणार महाराज**?** सकाळी आज.. सकाळ झाली!

शिक्षणमंत्री: वा! हुकूम असेल तर यास खालच्या वर्गात ढकलू महाराज अशा उत्तरासाठी**?**

महाराज: नको! आणि धन्यवाद! कारण आपले हे वाक्य आम्हास संपूर्णपणे कळाले!

शिक्षणमंत्री: आपल्यासारख्या हिऱ्यांच्या पारख्या जवाहिऱ्याकडून या क्षूद्रातिक्षूद्र जंतूसारख्या य:कश्चित मानवाचे कवण कौतुक झाले.. आम्ही धन्य झालो!

महाराज: आम्ही ही तुमचे बोलणे समजू लागेल तेव्हा धन्य होऊ! तोवर शिपाई**,** आज सकाळी काय झाले**?**

शिपाई: आठवले महाराज. आज सकाळी.. पहाट झाली. भैरू उठला. त्याने संडासमार्जन .. नाही सडासंमार्जन केले..

शिक्षणमंत्री: इयत्ता पहिली.. मराठी.. धडा तिसरा.. पान नंबर पाच..

महाराज: अरे हे नाही. आम्ही आता अजूनच वृद्ध होत चाललो आहोत. कुणी आमच्या प्रश्नाचे उत्तर देत नाही!

सेनापती: कोण आहे तो माईचा लाल.. की तांबडा जो आपल्या हुकुमाची तामिळ करत नाही?

महाराज: तामिळ नाही की तेलुगू नाही. नाही. नाही. कुणीच नाही. म्हणूनच आम्ही अजून वृद्ध होत आहोत.

प्रधानजी: हुकूम महाराज हुकूमचंद! कोण आहे तो माईचा पिवळा जो तेलुगू पण करीत नाही!

महाराज: प्रधानजी, शिपायास बोलू द्यावे. शिपाई, आज सकाळी आमच्या महाली काय झाले? भैरू आमच्या महाली तर नव्हता!

शिपाई: होता महाराज. आपल्या महालावरील पहारेकरी.. भैरू जगदाळे.. त्याचे नाव आहे.

(महाराज रागाने त्याच्याकडे पाहातात)

शिपाई: पण मी महालात काय झाले ते सांगतो. सकाळी महाराज उठले. त्यांनी आळस दिला. उठून आपल्या बी ला पी लावली..

प्रधानजी: शिपाई हे काय बोलत आहात?

महाराज: नाही. पी .. नाही प्रधानजी.. तो योग्य तेच सांगतो आहे..

शिपाई: बी ला पी म्हणजे ब्रश ला पेष्ट! तर महाराज बाहेर आले..

प्रधानजी: महालातून..?

शिपाई: नाही! आपल्या बाथरुमातून! मग त्यांनी स्नान..

प्रधानजी: बाथरुममधून बाहेर येऊन मग स्नान..?

महाराज( दटावणीच्या सुरात ): एवढ्या बारकाईने नको शिपाई. मुख्य भाग सांग.. आम्ही वृद्ध झालो तो भाग सांग..

शिपाई: हुकूम महाराज. तर मधला भाग.. ( तोंडाने टेप फास्ट फॉरवर्ड झाल्याचा आवाज काढतो )

प्रधानजी: हे काय आहे शिपाई?

शिपाई: फा फॉ..

प्रधानजी: म्हणजे

शिपाई: फास्ट फॉरवर्ड! तर मग काय झाला.. झाला असा की.. ह्या इथे महाराज उभे. असे डोळे वटारून

महाराज: शिपाई, तपशीलात चूक होतेय! डोळे वटारले रे वृद्ध झाल्यावर. त्या आधीची कहाणी..

शिपाई: क्षमा महाराज. तर महाराज असे उभे. डोळे बिन वटारलेले. राणी सरकार तिथे तशा उभ्या. महाराज राणीसाहेबांस म्हणाले, आज आपण नाश्त्याची..

महाराज: शिपाई, हे काय सांगतोयस?

शिपाई: क्षमा महाराज. तर महाराज म्हणाले, त्यांना कुठे तरी दूर देशी पर्यटनास जावेसे वाटते..

प्रधानजी: हुकूम महाराज.. हत्ती, घोडा की पालखी बुक करू.. आजकाल मेरी ट्रिप डॉट कॉम वर पटकन होते बुकिंग.. शिवाय लवकर पक्ष्याची.. म्हणजे अर्ली बर्डची सवलत मिळते ती अलग..

महाराज: नाही प्रधानजी आम्हास पक्ष्यासारखे उडत नाही जायचे.. पण प्रत्यक्ष राणीसरकार आम्हास तेच म्हणाल्या.. उडत जा.. म्हणजे गेलात उडत!

शिपाई: बरे झाले आपणच सांगितले महाराज.. माझ्याने नसते बोलवले हे.. हे झाले नि त्यानंतर महाराजांनी डोळे वटारले! महाराज रागावले. राणीसरकारांचा मूड नव्हता. त्यात पर्यटनाचा विषय. त्यांस हे पर्यटन अजिबात आवडत नाही. नेमका त्यात तोच विषय.. तो ही सकाळसकाळी!

महाराज: म्हणून आम्ही वृद्ध झालो..

शिक्षणमंत्री: अभय असेल तर एक सांगू महाराज..

महाराज: अभय तुम्हाला आहेच. तुम्ही काय बोलता हे कळले तर काही शिक्षा करायची का ते ठरवू ना आम्ही. बोला. फक्त काही कळेलसे बोला..

शिक्षणमंत्री: महाराजांना कृद्ध किंवा क्रोधित म्हणायचे असणार.. वृद्ध नव्हे!

महाराज: तेच तर आम्ही कधी पासून सांगत आहोत. आम्ही रागावलो आहोत. आणि आमच्या रागाचा पारा पार वरपर्यंत चढला आहे.. आणि आमचा क्रोध अनावर झाला आहे.

प्रधानजी: इतके रागावू नये महाराजांनी. पूर्ण देशाचे सरकार आपण चालवत असलात तरी आपले सरकार राणीसाहेब चालवितात. तेव्हा त्यांच्या आदेशानुसार..

शिपाई: तुमचे तरी एक बरेय महाराज. माझ्याकडे पहा.. इकडे सगळयांकडून आदेश आणि घरी घरवालीकडून आदेश..

प्रधानजी: हुकूम म्हणा! हे कुणाला चुकलेय महाराज

महाराज: असे म्हणता**?** म्हणजे**?** आम्ही रागावूच नये**?**

शिक्षणमंत्री: नाही महाराज. रागवावे! कारण त्यावाचून आपल्या हाती दुसरे काय आहे.

प्रधानजी: खरंय महाराज

महाराज: प्रधानजी..

प्रधानजी: जी हुजूर

महाराज: ठीक तर! आज आमचा हा रागावण्याचा दिवस साजरा करू. आम्ही कधी असे क्रोधित होत नाही. आज झालो. तर सेलिब्रेट करू.. मैफिल बोलवा! आपले दरबारी गायक संगीतसम्राट कर्णसेन 'राग दरबारी' गातील..

प्रधानजी: आज्ञा हुजूर. पण आपण अजून क्रोधित नाही आहात ना महाराज**?**

महाराज: नाही प्रधानजी. तो राग वेगळा.. हा दरबारी राग वेगळा. होऊन जाऊद्यात..

पडदा पडता पडता पाठून राग दरबारी कानडाचे सूर ऐकू येऊ लागतात.



# २ महाराजांची स्टोरी!

महाराज: कोण आहे रे इकडे**?**

प्रधानजी : इकडे तुम्हीच आहात महाराज

महाराज : अरेच्चा हो की!

प्रधानजी : तिकडे म्हणावे महाराज ..

महाराज : तुम्ही किती हुशार आहात प्रधानजी.. कोण आहे रे तिकडे**?**

आतून आवाज.. मी आहे महाराज ..

महाराज : कोण रे तू**?**

आतून : शिपाई महाराज..

महाराज : लपू नकोस.. आत ये सिपॉय ..

शिपाई आत येतो

महाराज : सिपॉय .. सीट ऑन टीपॉय

शिपाई : म्हणजे महाराज**?**

महाराज : काही नाही. काल इंग्रजीचा क्लास होता.. त्यात शिकलो आम्ही ते म्हणून पाहिले.. सिपॉय .. सीट ऑन टीपॉय.. वा .. सिपॉय .. युवर्स नेम इज व्हॉट**?**

शिपाई : ....

महाराज : अरे व्हाय रे यु लुर्किंग बावळट लाइक **?** नाव काय तुझा सिपॉय**?**

शिपाई : माय नेम इज ॲंथनी गोन्साल्विस.. मै दुनिया मे अकेला हू .. घर भी है खाली.. दिल भी है खाली ..

महाराज : इसमे रहेगी कोई किस्मतवाली

शिपाई : रूपनगर प्रेमगली .. घर नंबर चारसो बीस

महाराज : एस्क्युज मी प्लीस ..

प्रधानजी : महाराजांची जोरदार तयारी सुरू आहे .. इंग्रजी फाडफाड

शिपाई : फाडतात..

महाराज : प्रधानजी .. टीपॉयवाल्या सीपॉयचे नेम आम्हाला अंडरस्टॅन्डिंगच नाही झाले..

प्रधानजी : ॲंथनी गोंसाल .. विस ..

महाराज : सिपॉय.. युवर नेम ॲंथनी.. **?**

शिपाई : नाही महाराज..

महाराज : देन व्हॉट युवर नेम**?** ॲंथनी नो मग व्हॉट रे**?**

शिपाई : माझे नाव सुपडू आहे महाराज.

महाराज : सुपडू**?** ॲसे कॅसे नॅव**?**

शिपाई : नाही.. आई लाडाने म्हणते..सुप्डू.. सुप्ड्या.. सुप्पू ..

महाराज : आई असे म्हणते नि बायको**?** अन सिपॉय .. व्हॉट कॉलिंग बायको**?**

शिपाई : बायको म्हणते .. ध्यान ..

महाराज : ध्यान**?** मन ट्रू नेम काय सिपॉय तुझे **?**

शिपाई : खरेखुरे नाव .. ज्योतिराव..

महाराज : वा ! काय नाव ! युवर मदरला सुपडे नाव सुचले बरे .. प्रेमाने ..

प्रधानजी : सुपडे नाही.. पाखडण्याचे .. सुपडू..

शिपाई : सु .. प .. डू

महाराज : अस्से .. तर सिपॉय .. आम्ही इंग्रजीचे एड्युकेशन घेत आहोत. आम्हाला इमिडिएट .. मीनिंग .. म्हणजे तुला नाही उंडरस्टॅंड होणार.. इमिडिएट म्हणजे.. हां .. तात्काळ.. आम्हास सुलभ इंग्रजी स्टॅंड्र फायु चे बुक डिमांडींग आहे

शिपाई : म्हणजे महाराज**?**

महाराज : ओह देवा! किती घोर अद्न्यान .. बॅकवर्ड कुठचा .. इंग्रजी पाचवी चे पुस्तक टेकून ये .. सिपॉय ..

शिपाई : टेकून**?** पुस्तकाला कसा टेकू **?**

महाराज : किती घोर अज्ञान .. टेकून म्हणजे घेऊन ये रे डॅडी.. म्हणजे बाबा ..

प्रधानजी : महाराजांनी अभ्यास मनावर घेतलाय. इंग्रजी शब्द कसे लीलया संचार करताना दिसतात आपल्या वाणीतून

महाराज : आम्ही वन्स डिसाईडले की डिसाईडले.. मग वुई नॉट सू बॅक

शिपाई : सू आली तर जावे महाराजांनी..

प्रधानजी : शिपाई तुला कळत नाही.. महाराज नॉट सू म्हणतात.. नॉट म्हणजे नाही ..म्हणजे सू आली नाही.. हो की नाही महाराज**?**

महाराज : प्रधानजी .. घोर अद्न्यान .. आम्ही वळून मागे बघत नाही असे सांगत होतो..

प्रधानजी : खरेय महाराज.. आपल्या भाषाभ्यासास तोड नाही .. आपल्याला कुणाची जोड नाही.. साखरेवाचून चहा गोड नाही..

महाराज : आणि जेथे आमचे नाव नाही.. असा एकही रोड नाही..

शिपाई : आणि माझ्याकडे पैसा करोड नाही..

महाराज : सिपॉय .. गेला नाहीस अजून.. गो .. अॅटवन्स ..

प्रधानजी : वन्सं **?** जाऊ बाई जोरात**?**

महाराज : अॅट वन्स म्हणजे लगेच प्रधानजी .. आमचे होऊन जाऊ देत आम्ही तुम्हास पण टीचू इंग्रजी.. टीचू म्हणजे शिकवू ..

प्रधानजी : होय महाराज ..

महाराज : नो होय .. यस म्हणा ..

प्रधानजी : होय महाराज .. यस्स महाराज

एकाएकी युवराज आत येतात ..

युवराज : पिताश्री आम्हाला खेळण्यातली नाही .. खर्रीखुर्री तलवार पायजे म्हंजे पायजे .. आम्ही लढाई करून शत्रूला हरवणार ..

महाराज : होय बाळराजे .. हा तुमचा डॅडी तुम्हाला स्वोर्ड देईल असा वोर्ड देतो.. मग तुम्ही वॉर करा नि शत्रूवर वार करा. आणि मग विन करा

युवराज : म्हंजे काय पिताश्री?

महाराज : तुम्ही अजून लिटील आहात.. बिग झालात की कळेल .. प्रधानजी तूर्तास यांना तलवारविद्या लर्निंगला पाठवा.. आमचे प्रिन्स तयार होतील, रेड्डी होतील, सज्ज होतील वॉर मध्ये लढायला..

युवराज : शूर आम्ही सरदार आम्हाला काय्कु.. णाची भीती ..

महाराज : वा! नेक फार गोड आहे प्रिन्सचा.. वा!

प्रधानजी : खरेय म्हणजे अगदी खरेय महाराज.. पण ते नेक.. म्हणजे युवराज नेकदिल खरे..

महाराज : तो नेकदिल आणि हा नेक डिफ्रंट .. वेगळा.. नेक म्हणजे गळा ..

प्रधानजी : असे महाराज.. यस्स.. एका नेकचे अनेक अर्थ ..

युवराज : म्हंजे आमाला तलवार मिळणार..

महाराज : येस प्रिन्स यस .. स्वोर्ड मिळेल हा वोर्ड .. म्हणजे आमचा शब्द.. प्रिन्स जा... गो .. पिले .. खेळा .. आम्ही दरबारात वोर्क आटोपून कमिंग ..

युवराज : होय पिताश्री

युवराज निघून जातात. राणी प्रवेशतात..

महाराज : यावे यावे राणी गव्हर्नमेंट.. गव्हर्नमेंट म्हणजे सरकार प्रधानजी

प्रधानजी : यस्स महाराज..

राणी : हे काय होत आहे**?** आमच्या राज्यात हे काय घडत आहे **?** आमचा मेणा अजून आला नाही .. शिपाई.. मेणावाला कुठेय **?**

महाराज : कोण आहे रे इकडे**?**

प्रधानजी : इकडे आपणच आहात महाराज..तिकडे..

महाराज : ओके ओके .. कोण आहे रे तुकडे.. नाही तिकडे...**?**

प्रधानजी : तिकडच्यास आपण पाठवले..

महाराज : म्हणजे**?**

राणी : कोण ज्योतीराव **?**

महाराज : होय राणी गव्हर्नमेंट.. आमचे बुक्क आणायला गेलाय सुपडू ..

राणी : हा कोण नवा शिपाई**?**

महाराज : जोतीरावचे दुसरे नाव सुपडू आहे राणी गव्हर्नमेंट...

राणी : आता तो गेला तर आमचा मेणा कोण उचलणार .. आमच्या मेण्याचा सेवक .. तातडीने..

महाराज : आम्ही आता बोलावून घेतो सुपडूस ..सिपॉय.. सुपडू सिपॉय ..

सुपडू हातात जाडजूड पुस्तक घेऊन येतो

शिपाई : तुमने पुकारा और हम चले आए

प्रधानजी : पुस्तक हथेलीपर ले आए रे ..

महाराज : सिपॉय .. सिट ऑन टीपॉय .. वेळेवर आलास.. तू राणी गव्हर्नमेंटच्या मेण्याचा भोई रे ..

शिपाई : होय महाराज..

महाराज : मग सांगयचे नाहीस ..

शिपाई : सांगितले असते तर आपण कोपला असतात महाराज

महाराज : सिपॉय .. सिट ऑन टीपॉय .. कोप झाला असता तरी आम्ही काय तुला इटणार होतो?

शिपाई : म्हंजे महाराज?

महाराज : टायगरचे पंजे .. किती घोर अद्न्यान .. साधे इंग्रजी वोर्ड् येत नाहीत .. नॉट कमिंग .. तू गेलास माझा कोप होईल म्हणून.. आणि आमच्या वर ही कोणी आहे .. या राणी गव्हर्नमेंटचा आमच्यावर कोप झाला असता तर? नशीब वेळेवर आलास ..ठीक आहे .. जावे राणी गव्हर्नमेंट.. मेणा आणि मेणेवाला .. दोन्ही तयार आहे. टुडे व्हेयर? आज कुठे जायचे?

राणी : आम्ही निघालो पर्यटनास.. पाय मोकळे करण्यास मेण्यातून .. ज्योतीराव आमचा खास भोई आहे.

महाराज : जा सुपडू .. ध्यान .. ज्योतिबा .. ज्योतिराव .. जा .. गो

राणी आणि ज्योतीराव निघून जातात.

महाराज : या गडबडीत राज्यकारभारास टाइम मिळाला नाही..  आम्ही हाऊ बिझी आहोत..  तरी कशी आहे राज्याची कंडीशन?

प्रधानजी: कशाबद्दल महाराज?

महाराज : घोर अद्न्यान .. अद्न्यानाचा डार्कनेस.. राज्याची हालहवाल वाइप करतो आहोत आम्ही ..

प्रधानजी : वाइप?

महाराज : वाइप म्हणजे पुसतो आहोत .. आम्ही राज्याची हालहवाल पुसतो आहोत ..

प्रधानजी : उत्तम.. अतिउत्तम.. सर्वोत्तम..

महाराज : व्हेरी व्हेरी छान .. म्हणजे आता कामकाजास हॉलिडे ..

प्रधानजी : होळी महाराज? अजून होळीस अवकाश ..

महाराज : घोर अद्न्यान .. हॉलिडे म्हणजे सुटी प्रधानजी. आता राज्यकारभारास सुटी .. आणि आम्हीही गेलो असतो राणी गव्हर्नमेंटबरोबर.. लेग मोकळे करायला.. मेण्यातून

प्रधानजी : आपण घोडागाडीतून जाऊ शकता महाराज..

महाराज : हॉर्सकार्ट... ? येस .. गुड कल्पना. आम्ही गोतो.. जातो .. आमची गाडी जोडा .. कोण आहे रे इकडे.. नाही तिकडे?

प्रधानजी : तिकडचा मेण्यावर गेलाय महाराज.. आपली आद्न्या असेल तर राजमहालाबाहेरील सेवकास बोलवू?

महाराज : बोलवा.. लवकर .. फास्ट.. आणि सिपॉयचा एवढा शॉरटेज ?

प्रधानजी : होय महाराज. आयपीएलच्या मॅचेस बघायला गेलेत सारे सुट्टीवर

महाराज : बोलवा इनिडियेटली .. म्हणजे लगेच

प्रधानजी : यस्स महाराज

प्रधानजी कोणाच्यातरी कानात काही सांगतात. एक शिपाई धावत येतो.

महाराज : सिपॉय .. सिट ऑन .. नो डोण्ट सिट ऑन टीपॉय.. घोडागाडी काढ गोईंग आर वुई .. तुझा नेम काय?

प्रधानजी : तो नेमबाज नाही महाराज .. गाडीवाला..

महाराज : घोर अद्न्यान रे .. नेम म्हणजे नाव.. तो सुपडू तू बापडू ?

शिपाई : नाही महाराज. मी कल्लू ..

महाराज : असे कोण म्हणते**?** आई की वायफी **?**

शिपाई : सगळेच .. माझे नाव कल्लूराम दिग्गूराम झुंझारलेकर

महाराज : हे नाव की काय**?** एवढे मोठे**?** बरं चल सिपॉय .. लवकर.. राणीगव्हर्नमेंट लांब निघून जातील

शिपाई : हुजूर जो हुकूम.. गाडी जोडतो मी महाराज

शिपाई जातो ..

महाराज : एकूण राज्यात ऑल इज वेल दिसतय प्रधानजी ..

प्रधानजी : नुसत्याच वेली नाहीत.. झाडे पण आहेत..

महाराज : घोर अद्न्यान .. हे वेल म्हणजे ती वेल नाही प्रधानजी .. ऑल इज वेल म्हणजे सगळे कसे छान छान ..

प्रधानजी : यस्स महाराज

शिपाई परत येतो

शिपाई : घोडा आणि गाडी तयार आहेत महाराज

महाराज : सिपॉय .. डोन्ट सिट ऑन टीपॉय .. चल .. गोऊया .. जाऊया

महाराज आणि शिपाई जातात. दरबारात प्रधानजी उभे असतानाच राणी येते

राणी : महाराज.. घात झाला. महाराज कुठेत **?**

प्रधानजी : काय झाले राणीसरकार**?** भात?

राणी : भात .. नाही .. घात .. घात .. घात

प्रधानजी : घात**?** म्हणजे काय**?**

राणी : आम्ही ज्योतिरावाला घेऊन निघालो ..

प्रधानजी : निघालात

राणी : मेण्यामध्ये बसलो ..

प्रधानजी : बसलात ..

राणी : मेणा पुढे निघाला ..

प्रधानजी : निघाला..

राणी : आम्हास वाक्य पुरे करू द्यावे

प्रधानजी : दिले .. क्षमा राणीसरकार .. सांगावे.

राणी : तर .. आम्ही मेण्यातून निघालो .. पुढे ज्योतीराव.. मागे दुसरा कोणी .. मेणा चालला पुढे .. आमच्या राजमहालावरून आम्ही चाललोय .. पडदा बाजूस केला .. तर काय**?**

प्रधानजी : तर काय राणीसरकार**?**

राणी : तर .. महालाबाहेर ..महालाबाहेर ..

प्रधानजी : काय होते **?** साप की अजगर**?** वाघ की अस्वल **?** गनिम की .. जाऊ देत सुचत नाही..

राणी : होते नाही .. नव्हते ..

प्रधानजी : कोण राणीसरकार**?** वाघ की अस्वल**?** साप की अजगर ..

राणी : अजागळ .. अजागळ आहात तुम्ही प्रधानजी .. कसे काय महाराज .. ते जाऊ देत ..

प्रधानजी : जाऊ देतो राणीसरकार .. तर कोण नव्हते**?**

राणी : आमच्या महालाबाहेरील .. महालाबाहेर ...

प्रधानजी : कोण **?** का**?** काय**?** केव्हा **?** कसा **?** नव्हता.. नव्हती.. नव्हते**?**

राणी : आमच्या महालाबाहेर शिपाई.. नव्हता.. आमच्या महालाची सुरक्षा.. धोक्यात.. आम्ही तशाच फिरलो माघारी..

प्रधानजी : माफी असावी ..

राणी : महाराज कुठे आहेत**?**

प्रधानजी : महाराज आपल्या मागेच निघाले..

राणी : कसे ..

प्रधानजी : तेच राणीसरकार.. घोडागाडीतून गेलेत .. आपल्या महालाबाहेरील शिपाई .. त्याला घेऊन ..

म्हणून..

राणी : महाराज .. आधी मेण्याचा.. आता महालाबाहेरचा .. आमचे सेवक पळवतात .. सिपॉय .. सिपॉय म्हणून.. येऊ देत घरी.. पाहतोच आम्ही.. आमचे सिपॉय.. शिपाई पळवतात..

तरातरा निघून जाते.

पाठोपाठ महाराज आत येतात..

महाराज : प्रधानजी.. हा सुप्ड्या काय विंडच्या वेगाने.. तुम्ही अद्न्यानी .. वाऱ्याचा वेगाने णेणा मेतो .. नाही मेणा नेतो काय **?** आम्ही गेलो तर यांचा काहीच ॲड्रेसनाही .. आम्ही आलो परत..

प्रधानजी : राणीसरकार..

महाराज : काय झाले .. गव्हर्नमेंट..

प्रधानजी : राणीसरकार आलेल्या..

महाराज : येथे **?** आणि आम्ही तेथे..

प्रधानजी : त्यांच्या महालाबाहेर कुणी सेवक नसलेला पाहून आल्या परत.. **..**आल्या नि गेल्या..

महाराज : म्हणजे क्रोधित.. होत ..

प्रधानजी : असावे तसे .. कारण त्या टोमॅटोसारख्या लाल झालेल्या जाताना ..

महाराज : याचा अर्थ त्याचा कोप .. आता आम्हास त्यांची समजूत काढावी लागणार .. आमचे काही ट्रू नाही..

प्रधानजी : ट्रू **?**

महाराज : घोर अद्न्यान .. आमचे काही खैर नाही.. खरे नाही ..

प्रधानजी : हे मात्र खरे महाराज .. एक सुचवू**?**

महाराज : टॉक .. बोला .. बुडत्याला काडीचा आधार .. आमच्या संकटावरील रेमेडी .. म्हणजे उपाय .. आहे तुमच्या कडे**?**

प्रधानजी : तो तुम्हीच शोधा महाराज.. पण एक सल्ला..

महाराज : द्या .. त्याची आम्हास सक्त आवश्यकता आहे..

प्रधानजी : आपण जाताना चिलखत .. जिरेटोप घालून जावे महाराज.. नाहीतर युवराजांस न्यावे .. तलवारीसह ..

महाराज : थ्यांक्यू..आम्ही येतो..

महाराज जातात .. मागून गाणे

कर चले हम फिदा .. जान ओ तन .. साथियों ..



# ३ केबीपी.. अर्थात.. कोण बनेल प्रधानमंत्री

अंधेरनगरीच्या चौपट राजांचा दरबार.. राजे बसले आहेत सिंहासनावर. प्रधानजी आणि काही दरबारी उभे आहेत. एक शिपाई आत येतो. मुजरा करत..

महाराजांचा जयजयकार असो..

महाराज: काय बातमी आहे शिपाई**?**

शिपाई: एक चांगली नि एक वाईट बातमी आहे महाराज

महाराज: चांगली आधी सांगा शिपाई

शिपाई: हुकूम महाराज.. चांगली बातमी ही की आज वाईट बातमी कोणतीच नाही..

महाराज: शिपाई**,** मग वाईट बातमी कोणती**?**

शिपाई: महाराज.. वाईट बातमी ही की आज चांगली बातमी कोणतीच नाही..

महाराज: शिपाई.. मग बातमी कोणती आहे..

प्रधानजी: महाराज.. कोणतीच बातमी नाही हीच बातमी आहे असे दिसते

शिपाई: होयच महाराज.. राज्यातच आजच कुठेच काहीच घडलेच नाहीच

महाराज: प्रधानजी.. हा शिपाई थोडा **'**च**'** आहे की काय**?** आणि असे कसे होईल की कुठेच काहीच घडलेच नाहीच.. आम्ही असताना**?**

प्रधानजी: चौकशी समिती बसवू महाराज**?**

महाराज: वा! ही बातमी होईल.. राज्यातील न घडलेल्या घटना का घडत नाहीत याची चौकशी करण्यास समिती.. वा! प्रधानजी ..

प्रधानजी: होय्य महाराज

महाराज: हुशार आहात तुम्ही

प्रधानजी: होय्य महाराज

महाराज: तल्लख आहात तुम्ही

प्रधानजी: होय्य महाराज

महाराज: चलाख आहात तुम्ही

प्रधानजी: होय्य महाराज

महाराज: डोके सुपीक आहे तुमचे

प्रधानजी: जी महाराज.. महाराजांची कृपा आहे..

महाराज: आमची**?**

प्रधानजी: होय्य महाराज.. आपला नाभिकच आमचे ही तासतो.. डोके महाराज..

महाराज: तरीच ते तुळतुळीत नि तल्लख आहे.. नेमून टाका..

प्रधानजी: त्या नाभिकास महाराज**?** कुठे**?** समितीच्या प्रमुखपदी**?** वस्तरा घेऊन तासून काढतील तासनतास..

महाराज: प्रधानजी.. आम्ही समिती नेमण्याबद्दल बोलत आहोत..

प्रधानजी: होय्य महाराज..प्रश्नाचा कीस पाडेल तो.. तेच म्हणावयाचे होते..

महाराज: तेच नव्हे.. उद्या तुम्ही या शिपायास बसवाल समितीत..

प्रधानजी: होय्य महाराज.. नाही.. नाही महाराज.. क्षमा महाराज..

महाराज: तर समिती टाका नेमून.. पहा काहीच कसे नाही घडले काल..

प्रधानजी: होय्य महाराज.. नेमतो महाराज.. करून टाकतो महाराज.. मग रिपोर्ट देतो महाराज..

महाराज: आणि लवकर करून टाका.. आम्हाला जलद रिझल्ट हवाय..

प्रधानजी: होय्य महाराज.. उद्यापर्यंत सांगतो महाराज..

दिवस दुसरा: महाराजांचा दरबार..

शिपाई: चौपट महाराजांचा विनय असो..

महाराज: विनय.. की विजय?

प्रधानजी: दोन्ही जुळे भाऊ आहेत महाराज.. विजय आणि विनय.. एकाला झाका दुसऱ्याला काढा..

महाराज: कशाला? आणि काढा कशाला? आणि कसला चिराईताचा?

प्रधानजी: नाही महाराज..तो काढा नाही.. याला झाका नि त्याला काढा असे म्हणण्याची पद्धत असते..

महाराज: कुठे?

प्रधानजी: इथेच महाराज.. तरीदेखील महाराजांना हवे असल्यास विनयच्या जुळया भावास पाचारण करू.. शिपाई.. विजयला बोलवा..

शिपाई: महाराजांचा विजय असो..

महाराज: आता कसं विनयी झाल्यासारखे वाटतेय.. नाही विजयी झाल्यासारखे वाटतेय..

प्रधानजी: होय्य महाराज..

प्रधानजी..झाले काय?

प्रधानजी: होय्य महाराज..

महाराज: मग सांगा

प्रधानजी: काय महाराज**?**

महाराज: काम झाले काय**?**

प्रधानजी: कसले महाराज**?**

महाराज: बातमी..

प्रधानजी: कसली महाराज**?**

महाराज: अरे विसरता कसे तुम्ही**?**

प्रधानजी: नाही महाराज..

महाराज: मग झाले काय**?**

प्रधानजी: काय महाराज**?**

महाराज: विसरलात**?** बदाम खात जा रोज.. आम्ही हुकूम दिलेला तुम्हाला..

प्रधानजी: होय्य महाराज.. स्मरणशक्ती वाढवण्याचा हा उपाय तुम्ही सांगितला होता.. पण

महाराज: पण**?** बदाम नाहीत**?**

प्रधानजी: नाही महाराज..

महाराज: अरे मग मागवून घ्या.. आमचे प्रधानजी बिन बदामाचे तडपताहेत..

प्रधानजी: बदाम आहेत महाराज.. पण

महाराज: पण काय.. दात नाहीत प्रधानजी**?** ती म्हण आहे ना.. दात आहेत तर बदाम नाहीत आणि बदाम आहेत तर दात नाहीत.. तसे दात..

प्रधानजी: नाही महाराज..

महाराज: म्हणजे.. सारे दात गेले प्रधानजी**?** बोळके झाले की काय तोंडाचे**?**

प्रधानजी: नाही महाराज.. दात नाहीत असे नाही.. दात आहेत.. बदाम आहेत.. पण..

महाराज: पण काय प्रधानजी**?**

प्रधानजी: स्मरणशक्ती वाढवण्यास ते खाण्यास आम्ही विसरतो..

महाराज: मग शेंडीस गाठ मारून ठेवावी प्रधानजी..

प्रधानजी: होय्य महाराज.. पण

महाराज: शेंडी नाही प्रधानजी**?**

प्रधानजी: नाही.. म्हणजे आहे महाराज.. शेंडी आहे. न तुटलेली पारंबी ही आहे..पण..

महाराज: गाठ मारता येत नाही**?**

प्रधानजी: नाही.. तसे नाही महाराज.. येते.. पण..

महाराज: अजून किती पण आहेत.. तुम्ही पण केलाय का विसरण्याचा**?**

प्रधानजी: नाही महाराज.. पण .. आम्ही गाठ मारावयास विसरतो.. रोज आम्ही शेंडीस या पगडीत सांभाळून ठेवतो.. गारूडी सापाची वेटोळी कशी बनवून ठेवतो तसा..

महाराज: वा! शेंडी आहे पण गाठ नाही.. बदाम आहेत पण खायची आठवण नाही.. काय प्रधानजी.. विचारतोय ते सांगा

प्रधानजी: होय्य महाराज..

महाराज**;** झाले का**?**

प्रधानजी: नाही.. मग बांधेन शेंडीला गाठ महाराज..

महाराज: ते नाही प्रधानजी.. काल सांगितले त्याबद्दल..

प्रधानजी: होय्य महाराज.. झाले..

महाराज: सांगा.. काय झाले**?**

आपल्या आज्ञेनुसार.. तत्काळ..

महाराज: प्रधानजी**,** सांगा कशी काय झाली नाही बातमीची बातमी**?**

प्रधानजी: ते लवकरच ठाऊक होईल.. समितीच्या अध्यक्षाची निवड करायला एक समिती आजच आम्ही बनवली आहे.. तत्काळ..

महाराज: आम्ही हुकूम दिलेला प्रधानजी..

प्रधानजी: त्या प्रमाणेच आम्ही सत्वर अंमलबजावणी केली आहे.. पण इस रूट की सभी लाइनें व्यस्त हैं.. शीघ्रही उत्तर की अपेक्षा है..कृपया लाइन में बने रहे या..कृपया थोडी देर बाद कोशिश करें..

महाराज: प्रधानजी.. समितीचा अहवाल आजच्या आज येण्याबद्दल आम्ही आदेश दिलेला.. अजून समितीही बसली नाही?

प्रधानजी: महाराज.. आपल्या आदेशानुसार होत आहे.. समितीच्या अध्यक्षपदी कोण.. त्यास कोणकोणत्या शासकीय सोयी द्याव्यात याबद्दल निर्णय होईल.. त्यांच्या बैठका होतील.. सारे काही शासकीय प्रथेप्रमाणे..

महाराज: खामोश! आम्हाला फक्त रिझल्ट हवा.. तो ही आताच्या आता.. आपले गृहमंत्री कुठे आहेत?

प्रधानजी: ते महाराज, उमेदवारांच्या मुलाखती घेत आहेत.. त्यांच्या अध्यक्षतेखाली बसवली आहे समिती..

महाराज: आम्हाला हे डिटेल्स नकोत.. आम्हाला फक्त सांगा की काल काहीच बरे वाईट का नाही घडले?

प्रधानजी: जो हुकूम महाराज.. आम्ही गृहमंत्र्यांना बोलावून घेतो..

महाराज: सत्वर.. तत्काळ.. लगेच.. जल्दी..

प्रधानजी: हुकूम महाराज..शिपाई..

शिपाई: हुकूम सरकार..

महाराज: गृहमंत्र्यांना जसे असतील तसे घेऊन या..

शिपाई: हुकूम सरकार..

प्रधानजी: तोवर महाराज आपण ह्या गाण्याचा आनंद घ्यावा.. मन हे राम रंगी रंगले..

( पाठून गाणे सुरू होते.. सारा दरबार भजनात रंगून जातो.. )

( गृहमंत्री आत येतात.. चट्ट्यापट्ट्यावाल्या चड्डीत.. पायात चपला..)

गृहमंत्री: चौपट महाराजांचा विजै असो.. तातडीने बोलावलेंत.. अस्सा निघून आलों.. चाल्लो होतो स्नानास..

महाराज: प्रधानजी म्हणाले तुम्ही इंटरव्ह्यू घेत होतात..

गृहमंत्री: महाराज.. खरेय.. पण आज सकाळी सकाळी आमची यमुना प्रसूत झालीं.. छान झालें..

महाराज: काय**?**

गृहमंत्री: कालवड..

महाराज: कालवण**?**

गृहमंत्री: कालवण नाही कालवड..

महाराज: कालवड**?**

गृहमंत्री: होय महाराज.. गायीच्या बछड्यांस कालवडच बोलायचें.. ते बाळंतपण उरकून चाल्लो तर शिपाई आलें.. आपण बोलावलें कळलें.. तडक आलों झालें.. होतों तस्सा..

महाराज: ते दिसतेच आहे..

गृहमंत्री: आन तिकडे उमेदवार खोळंबलें अस्तील..

महाराज: खामोश.. प्रधानजी..

प्रधानजी: जी महाराज..

महाराज: अजून समिती नेमण्याइतपत प्रगती नाही.. हे काय सुरू आहे आपल्या राज्यात**?**

गृहमंत्री: क्षमा महाराज.. पण आपण बोलावलें नस्तेत तर आतापावेतो आमच्या अंगावर पाण्याचे चार तांबे उलटले अस्ते.. नि तडक त्या मुलाखतीं.. पण आता साराच उशीर..

महाराज: प्रधानजी.. आम्हाला आताच्या आता रिपोर्ट द्यावा..

गृहमंत्री: कसला रिपोर्ट महाराज.. नाही तसे सारे सुरळीत आहें.. कसें सारे सरळ सोपें.. कुठे गोंधळ नाही.. गडबड नाही..

महाराज: तेच.. आम्ही तें.. नाही तेच सांगतोय.. आम्ही आहोत पण काल आम्हाला एक ही बातमी मिळू नये.. राज्यात काहीच कसे घडत नाही? याचीच चौकशी करा.. म्हणून आदेश दिला.. समिती नेमा.. आम्हाला आजच्या आज याचा निकाल हवा आहे प्रधानजी.. आणि गृहमंत्री.. तुम्ही जाऊ शकता.. अंघोळीस

गृहमंत्री: कृपा आहें महाराजांचीं.. तडक जाऊन फडक उरकतो कडक पाण्याने अंघोळ.. आणि एक महाराज.. आलोंच तर आमंत्रण करूनच टाकतों..

महाराज: कसले आमंत्रण?

गृहमंत्री: बारसें महाराज.. बारसें..

महाराज: बारसे?

गृहमंत्री: आम्च्या कालवडीचे महाराज.. आपण अगत्याने येणें करावें सहकुटुंब.. बार्श्यास महाराज..आहेंर आणू नयें.. आप्ला आशीर्वाद..

महाराज: गृहमंत्री.. आपण जावे.. कडक पाणी वाट पाहाते आहे..

गृहमंत्री: कृपा महाराजांची.. तितकें बार्श्याचे ध्यानांत ठेवावे..

महाराज: गृहमंत्री..

( गृहमंत्री तडक निघून जातात.. )

महाराज: प्रधानजी, आमचे भाग्य थोर की आम्हास असली रत्ने मिळाली..

प्रधानजी: आता एक ते आम्ही जिवाची बाजी लावून शोधतो महाराज.. पण..

महाराज: आपणास सगळीकडे पण दिसत असतो की काय प्रधानजी?

प्रधानजी: नाही.. तसेच काही नाही.. पण.. क्षमा महाराज.. समितीच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी दुसरी एक समिती नेमण्याची परवानगी हवी होती.. ती मिळाल्यास त्या अनुषंगानेही कार्यवाही करता येईल महाराज.. म्हणजे वेगाने काम..

महाराज: प्रधानजी.. तुम्हाला गणित येते काय?

प्रधानजी: थोडेफार येते महाराज..

महाराज: तर सांगा.. एका समितीच्या नेमणुकीस इतका वेळ तर दुसरीच्या नेमणुकीस किती?

प्रधानजी: महाराज.. शिक्षणमंत्र्यांस बोलावणे धाडतो.. प्रश्न कठीण.. आम्ही विसरलो पाढे..

महाराज: खामोश! आम्हाला लवकरात लवकर तो रिपोर्ट हवा आहे..

प्रधानजी: ते समितीबद्दल निर्देश दिले तर..

महाराज: प्रधानजी..

प्रधानजी: आम्ही जातीने लक्ष घालतो.. समिती नेमण्याबद्दल..

महाराज: आम्हाला..

प्रधानजी: रिपोर्ट हवाय एवढंच ना महाराज.. डन.. आम्ही आता रिपोर्ट आणल्यावाचून आमचे तोंड दाखवणार नाही महाराजांना.. आम्हाला आज्ञा द्यावी..

महाराज: जा.. विजयी होऊन या..

( प्रधानजी निघून जातात..

महाराज डोक्यावर हात मारत बसतात.)

महाराज: शिपाई..

शिपाई: जो हुकूम महाराज

महाराज: शिक्षणमंत्र्यांना बोलवा.. ताबडतोब..

शिपाई: जी महाराज..

( शिपाई जातो.. महाराज डोके खाजवत बसतात. बाकी दरबारी स्तब्ध बसून राहतात. थोड्या वेळाने शिक्षणमंत्री आत शिरतात..)

शिक्षणमंत्री: चौपट महाराजांचा चौपट  जयजयकार असो. जय असो.. विजय असो. आचंद्रसूर्य महाराज अमर असोत.. अकबर आणि अॅंथनी सुद्धा असोत.. महाराजांना आठवण यावी असे काय शैक्षणिक काम आमच्याकडे आहे महाराज..

महाराज: आम्हास एका प्रश्नाचे उत्तर द्यावे..

शिक्षणमंत्री: आज्ञा महाराज..

महाराज: ऐका.. जर एक समिती बसवण्यास दोन दिवस लागत असतील तर.. दोन बसवण्यास किती**?**

शिक्षणमंत्री: उत्तर सोपे नि कठीण आहे.. दोन उत्तरे आहेत महाराज..

महाराज: बोला..

शिक्षणमंत्री: सोपे उत्तर गणितात मिळेल.. चार दिवस..

महाराज: आणि कठीण**?**

शिक्षणमंत्री: त्यासाठी समिती कोण बसवते ते पहावे लागेल.. कशासाठी तेही पहावे लागेल.. समितीचे काम काय.. त्यात किती लोक असतील.. वगैरे वगैरे..

महाराज: म्हणजे**?**

शिक्षणमंत्री: ते समिती समितीवर अवलंबून असेल महाराज.. आणि..

महाराज: आणि काय शिक्षणमंत्री**?**

शिक्षणमंत्री: प्रधानजी समिती बसवत असतील तर अनंत काळ लागू शकतो..

महाराज: आणि तुम्ही बनवलीत तर**?**

शिक्षणमंत्री: महाराज.. हा अधिकार माझा नव्हे.. प्रधानांचा आहे..

महाराज: आणि तुम्ही प्रधान झालात तर**?**

शिक्षणमंत्री: जशी इच्छा महाराजांची..

महाराज: जावे.. समिती बसवा किंवा न बसवा पण रिपोर्ट घेऊन या.. आणि जो लवकर रिपोर्ट आणेल तो आमचा प्रधान.. शिक्षणमंत्री: जशी आज्ञा महाराज.. आम्ही लवकरात लवकर येतो..

महाराज: आपण जावे शिक्षणमंत्री.. हुकुमाची अंमलबजावणी व्हावी..

शिक्षणमंत्री: हुकूम महाराज..

**(** शिक्षणमंत्री जातात. महाराज परत चिंतेत आणि चिंतनात.. डोळे मिटून. डोळे उघडतात तर समोर मंत्री परत उभे..)

महाराज: आलात.. इतक्या जल्दी रिपोर्ट**?** आम्ही डोळे मिटून उघडण्याच्या आत**?** शाबास! तुम्ही प्रधानमंत्री होणार आता..हुकूमनामा काढून टाकू.. शिपाई..

शिपाई: जो हुकूम महाराज..

महाराज: थांब तेथे.. आधी ऐकू तर द्यावा रिपोर्ट..

शिक्षणमंत्री: क्षमा असावी महाराज.. रिपोर्ट नाही..

महाराज: इतका समय एका रिपोर्टसाठी**?**

शिक्षणमंत्री: क्षमा महाराज.. पण रिपोर्ट कसला हवा याबद्दल महाराजांनी काही सांगितले नाही त्यामुळे परत आलो..

महाराज: आपल्या बुद्धीचे कौतुक वाटते आम्हाला.. किती हुशार आहात तुम्ही.. ज्या विषयाची परीक्षा किमान त्याच्या विषयाचे तरी नाव माहिती हवे.. वा! जावे लवकरच परत यावे..

शिक्षणमंत्री: हुकूम महाराज.. पण तो रिपोर्ट..

महाराज: होय रिपोर्ट घेऊन यावे..

शिक्षणमंत्री: नाही.. कसला रिपोर्ट महाराज ते कळले तर..

महाराज: ते सध्याच्या प्रधानजींस विचारावे.. लक्षात ठेवा.. जो प्रथम येईल तो होणार प्रधानमंत्री.. जा..

शिक्षणमंत्री: पण..

महाराज: तुम्ही पण 'पण पण' करता की काय? जावे.. आमचा आदेश आहे.. आम्हाला परत संध्याकाळी पाच वाजता भेटावे..

शिक्षणमंत्री: हुकूम महाराज..

( शिक्षणमंत्री जातात.. डोके खाजवत. मनात म्हणत.. प्रधानमंत्री व्हायचे तर इतकी मेहनत तर हवीच..

महाराज विचार करत बसून आहेत.. एकदा कानात बोट घालून बाहेर काढतात.. एकदा मुकुट काढून डोके खाजवतात.. आणि एकाएकी स्वतःशीच बोलायला लागतात..)

सेनापतींना बोलवा.. ते तरी काही करतील.. हे प्रधानजी विसरतील.. शिक्षणमंत्र्यांचा काय भरोसा..

( मोठ्याने ) शिपाई.. सेनापतींना बोलवा.. जल्दी..

शिपाई: हुकूम महाराज..

( शिपाई जातो.. महाराज डोक्यावरचे केस उपटत एकेका केसाकडे बघत बसतात. सेनापती येतात..)

सेनापती: हुकूम म्हाराज.. बोलावले या गरीबास..

महाराज: सेनापती.. कितीवेळा सांगितलेय.. सेनापती तुम्ही.. स्वतःस गरीब म्हणू नका.. सेनापती कसे हवेत.. पाहूनच धडकी भरावी..

सेनापती: ते बरीक खरं म्हाराज.. आमास्नी  सेनापती बनवले ते आपणच.. म्हाराजांची कुरपा म्हनून हा हंबीर एक खंबीर शेनापती जाला.. पण एक काळजातली गोष्ठ सांगावी म्हनतो.. आम्हाला बनायचेय..

महाराज: ते नंतर.. आधी राज्यावरील संकट..

सेनापती: (तलवार काढीत.. ) कुठेय गनीम.. हंबीरची तर्वार याची न्हाई लावील वाट नि रगताचे न्हाई वाहवील पाट तर नाव लावाचा न्हाई..

महाराज: ती तलवार म्यान करा.. संकट असे नाही..

सेनापती: मंग म्हाराज.. **?**

महाराज: सेनापती.. झालेय असे की काल पासून राज्यात एकही अशी घटना घडलेली नाही जिची बातमी बनू शकते. याची चौकशी करावयाची आहे..

सेनापती: ती आम्ही करावी आसं म्हना की.. क्येली.. करून सांगतो..

महाराज: शाबास! आम्ही ठरवलेय.. जो सर्वप्रथम ही माहिती आणेल तो बनेल प्रधानमंत्री..

सेनापती: खरंच म्हाराज .. आमचे त्येच एक सपान हुतं.. शेनापती वरून परधानमंत्री.. झालंच समजून चला म्हाराज.. आम्ही जातीनं लक्ष घालून म्ह्यायती आणतो..

महाराज: शाबास! आमची हीच अपेक्षा होती.. जावे आणि परत यावे..

सेनापती: हुकूम म्हाराज..

**(** सेनापती जातात..)

महाराज: आता येईल मजा.. तोवर वाट पाहू.. एखादा व्हिडिओ गेम खेळू तोवर..

*********

वेळ संध्याकाळी पाच

महाराज: शिपाई.. वाजले किती**?**

शिपाई: चार वाजून एकूणसाठ मिनिटे एकूणसाठ सेकंद महाराज..

महाराज: वा! आता एका सेकंदात रिपोर्ट येणार.. पाहतोच आम्ही का नाही घडत राज्यात काही..

( गृहमंत्री घाईघाईत आत शिरतात.. कुठूनतरी धावत आल्यासारखे.. धापा टाकत उभे राहतात..)

गृहमंत्री: महाराजांचा चौपट.. नाहीं चौपट महाराजांचा विजै असो..

महाराज: तो तर असेलच.. आणलात रिपोर्ट..

गृहमंत्री: होय महाराज.. आम्ही चोख बजावलें काम..

महाराज: बोला आम्ही आतुर आहोत खूपच.. सांगावे काय ते..

गृहमंत्री: महाराज.. आपण अस्ताना काही घडणार नाही असें कसें शक्य आहे.. सारीं चूक शिंच्या बातमीदाराची आहे..

महाराज: शिपाई.. बातमीदारास हजर करा..आआत्ता

शिपाई: मतलब महाराज**?**

महाराज: आज आत्ता ताबडतोब..

शिपाई: हुकूम महाराज..

महाराज: अशी कोणती गोष्ट जी बातमीदाराने आम्हाला सांगितली नाही गृहमंत्री**?**

गृहमंत्री: महाराज.. आपले प्रधानजी ..

महाराज: ते गेले शपथ घेऊन.. जोवर छडा लागत नाही तोवर ते काही येत नाहीत..

गृहमंत्री: नव्हें महाराज.. नव्हें.. ते आणि शिक्षणमंत्री..

महाराज: काय झाले शिक्षणमंत्र्यांस**?**

गृहमंत्री: शिक्षणमंत्री आणिक प्रधानमंत्री.. दोघांची खडाजंगी..

महाराज: शक्ती तुऱ्याचा सामना?

गृहमंत्री: तसेंच कांही महाराज.. आम्ही आज सकाळीं येथून गेलों. गेलों ते तडक फडक अंघोळीस.. ती केलीं.. बाहेर आलों.. शेंडी अन जानवें पुस्ले.. आणि मुलाखतीस बसलों.. मुलाखतीस भाऊ गर्दी.. समिती म्हणजें कांय .. आम्ही सुरू केलीं मुलाखत.. तेवढ्यात.. प्रधानजी आलें धावत धावत.. म्हणालें.. समिती नको.. तपास समिती शिवाय होईंल.. त्यावर सारें उपस्थित चिडलें.. आम्ही देखील चिडलों.. निवडसमितीवर आम्ही काय उगीच वेळ दवडत होतों.. आम्च्या यमुनेस सोडून.. प्रधानजी म्हणालें.. आप्ला हुकूम आहें.. समितीचा पण हुकुम आप्लाच.. यावरून जुंप्ली आम्ची.. त्यांत वर आलें ते आप्लें बुकवालें.. शिक्षणमंत्री! त्यांनी आलें तसें भांडावयास सुरूवात केलीं.. त्यातून गडबड झालीं..

महाराज: याचा अर्थ आमच्या राज्यात मंत्रीगण भांडत बसलेत एकमेकांशी?

गृहमंत्री: एवढ्याने काय होतें महाराज.. पाठोपाठ सेनापती आलें तरवार परजीत.. त्यांनी त्यात आपली तरवार उगारलीं.. मग दोघांच्या भांडणात आला कीं तिस्रा! जंगी युद्ध..

महाराज: म्हणजे सारे काम सोडून भांडत बसले आहेत? आणि तुम्ही.. तिघांच्या भांडणात चौथे?

गृहमंत्री: नाही महाराज.. आता नाहीत भांडत.. आम्ही जातीने पाहून आलों.. भांडण संपव्ले तिघांनी आणि आतां विश्राम घेतात..

महाराज: खामोश! आम्ही आज्ञा दिलेली आम्हाला बातमी देण्याची..आणि विश्राम?

गृहमंत्री: आम्हीच त्यांना पोचवून आलों

महाराज: पोचवून?

गृहमंत्री: वैद्यांकडे महाराज. दोघे राजवैद्यांकडून आपली तुटलेली हाडें जोडून
घेताहेत महाराज.. आणि एक आप्ल्या फाटक्या चमडीवर टाकें घालून घेताहेत
आणि हीच बातमी घेऊन आम्ही जातीने आलों आपणांकडे..

महाराज: गृहमंत्री.. आपण फार छान काम केलेत.. आम्ही आपल्यावर खूप खूश आहोत..

गृहमंत्री: मग आम्ही जे आइकले.. जो बातमी आणील तों प्रधानमंत्री होईल.. ती खरी महाराज?

महाराज: खरी? शंभर टक्के..आमचा शब्द ही काळ्या दगडावरील रेघ. शिपाई.. हुकूमनामा
लिहावयास कारकुनास बोलवा..

महाराज: हुकूम महाराज.. पण बातमीदार आला आहे आपल्या आज्ञेनुसार.. त्यास पाठवू
महाराज ..

महाराज: दे पाठवून आत.. आणि कारकुनास बोलाव..

शिपाई: जी महाराज..

( बातमीदार येऊन घाबरून उभा राहतो. त्याचे पाय लटलट कापत आहेत.

कसाबसा वाकून मुजरा करतो.)

महाराज: कोण तू?

बातमीदार: नागेंद्रजी तुकारामजी वडखळकर

महाराज: हे काय आहे..?

बातमीदार: नाव आणि आडनाव महाराज

महाराज: नाव? चांगलेच आड आहे.. बोल बोल.. काय उत्तर आहे तुझ्याकडे?

बातमीदार: कसले महाराज?

महाराज: कसले काय? उत्तर कशास असते? हे तरी ठाऊक आहे की नाही तुला?

बातमीदार: होय महाराज.. उत्तर असते एखाद्या प्रश्नाला..

महाराज: शाबास.. मग बोल.. बोल उत्तर..

बातमीदार: महाराज.. प्रश्न कळला तर..**?**

महाराज: ठीक.. होतास कुठे**?**

बातमीदार: कधी महाराज**?**

महाराज: खामोश! प्रश्नाचे उत्तर प्रश्न**?**

बातमीदार: क्षमा महाराज.. मी येथेच असणार..

महाराज: कधी**?** आणि लक्ष कुठे असते तुझे**?**

बातमीदार: मी समजलो नाही महाराज.. चूक झाली असेल तर मोठ्या मनाने माफ करावे..

महाराज: ठीक.. बोल.. काल काहीच कसे घडले नाही आपल्या राज्यात**?** का एकही बातमी येऊ नये..**?** शिपाई म्हणाला, न बरे न वाईट.. कसलीच नाही बातमी.. का तुला आम्ही शिक्षा देऊ नये**?**

बातमीदार: क्षमा करावी महाराज..

महाराज: का**?** बातमीदार नसूनही आमच्या या गृहमंत्र्यांनी आणली खबर.. आमचे तीन मंत्री जायबंदी झाल्याची..

बातमीदार: अभय असल्यास मी काही सांगू महाराज..

महाराज: बोला.. शेवटची इच्छा पण सांगून टाक..

बातमीदार: महाराज.. ही बातमी आजची आहे.. कालची नाही.. काल ..

महाराज: आजची..! गृहमंत्री.. आम्ही कसे विसरलो.. आम्हाला काल काय घडले नाही याची बातमी हवी होती..न घडलेल्या घटनेची बातमी!

बातमीदार: महाराज.. आपल्या राज्यातील लोक ग्रह नि ताऱ्यांवर खूप विश्वास ठेवतात..

महाराज: मग**?** काल ग्रहमान अनुकूल नव्हते**?**

बातमीदार: महाराज.. कालचा दिवस सूर्यग्रहणाचा..

महाराज: सूर्य ग्रहण?

बातमीदार: होय महाराज.. आणि आपल्या राज्यातील कोणीच काही करीत नाही या दिवशी.. बरे ना वाईट.. घरात दडून बसतात.. म्हणून काल काहीच घडले नाही.. आणि ही सुद्धा एक बातमीच होती महाराज..

महाराज: वा! खूप खूश आहोत आम्ही तुझ्यावर.. तूच काल काय झाली ते सांगितलेस.. खरेतर काय नाही झाले ते सांगितलेस.. आम्ही प्रसन्न आहोत..

शिपाई (आत येत ) : महाराज कारकुनास बोलावलेले.. आलेत ते..

महाराज: पाठव..

( कारकून येऊन मुजरा करतो..)

गृहमंत्री: तत्काळ हुकुमनामा लिहायचा आहे कारकून.. महाराजांचा हुकूम आहे

कारकून कामास लागावे..

कारकून: जी महाराज

गृहमंत्री: आमच्या प्रधानमंत्रीपदाची ..

महाराज: थांबावे गृहमंत्री.. आम्ही जातीने सांगतो.. कारकून..

कारकून: जी महाराज..

महाराज: हुकुमनामा तयार करा.. आमचे जुने प्रधान श्री.आनंतराम कृपाशंकर कानकोंडे आपल्या पदावरून निवृत्त केले गेले आणि त्या जागी नवीन प्रधानमंत्री म्हणून.. नाव काय?

गृहमंत्री: जनार्दन गोपाळदास किबे..

महाराज: थांबावे गृहमंत्री.. नाव विसरलो.. नाही..

गृहमंत्री: जनार्दन गोपाळदास किबे महाराज..

महाराज: खामोश! आम्ही पाहतो आहोत उघड्या कानांनी आणि ऐकतो ही आहोत उघड्या डोळयांनी..

गृहमंत्री: कानांनी पाहणें अन डोळयांनी ऐकणें.. महाराजांचा विजै असो..तेव्हा कारकून लिहावे..

कारकून: लिहीतो महाराज..

महाराज: नवीन प्रधानमंत्री..

कारकून: म्हणून श्री गोपाळदास किबे..

गृहमंत्री: जनार्दन गोपाळदास..

महाराज: कारकून.. आम्ही सांगितले का**?** लिहा.. नवीन प्रधानमंत्री म्हणून श्री. अडखळकर..( बातमीदाराकडे पाहात ) काय रे आम्ही तुझ्या नावात अडखळतो.. काय नाव तुझे..**?**

बातमीदार: अडखळ नाही.. वडखळकर महाराज..

महाराज: ठीक.. नागजी.. नाही.. नागेंद्रजी तुकारामजी वडखळकर यांची नियुक्ती करित आहोत..नाव कठीण आहे.. पण यापुढे फक्त प्रधानजी म्हटले तरी चालेल.. काढा आदेश..

कारकून: हुकूम महाराज..



# ४ ओसाडगावचा जनदरबार!

सूत्रधार:

जाऊ नको तू थांब

रसिका.. क्षणभर येथे थांब..

घाई कसली.. गड्या तुला तू

घेई इथे विश्राम.. क्षणभर येथे थांब..

रसिका.. पळभर येथे थांब..

तर रसिका येथे आज ओसाडगावच्या दरबाराचा ओपन डे आहे.. ओपन डे म्हणजे काय**?** म्हणजे..

डे ओपन म्हणजे काय पुसशी तू

ओपनूनी .. म्हणजे वेंगाडून तोंड ते..

राजा राणी जनदरबारी बसती

सोडवण्या प्रश्न ते!

वा! किती जनहितदक्ष अन लोकाभिमुख कारभार.. रसिका..

पहायलाच रे हवा तुला तो..

राजा वदतो.. राणी वदते ..

त्यांच्या मुखे वदती जणू भगवान..

दूरदूरहून जन ते येती

त्यांचे ऐकती देऊन कान..

धन्य धन्य ते भगवान..

तर रसिका..

प्रधानजी या दरबारात मुख्य सूत्रधार बरे.. सूत्रधार म्हणजे..

किती घोर अज्ञान जगती हे..

सूत्रही न सूत्रधारही

ठाऊक नसे ..

या अज्ञानी बालांचे घ्या

क्लासेस घाऊकसे..

तर बावळट रसिक हो.. सूत्रधार म्हणजे .. जो साऱ्या नाड्या आवळतो

नाहीतर सैल सोडतो..

कुणाला बसवतो..

कुणाला नाचवतो..

कुणाला हसवतो..

नाही नाही.. हा कुणाला रडवत नाही..

कारण..

रडणारे रडती आपल्या कर्माने..

सूत्रधार फक्त नाचवी बाहुल्या..

बघा बघा नीट दिसतील ..

त्या सावल्या

तर मेहरबान कदरदान.. नादान.. सॉरी हे शेवटचे म्हणजे.. गलतीसे मिस्टेक.. तर कदरदान.. दिल थाम के देखो.. काय म्हणता.. दिल थांबवले

तर जग थांबेल? यूआर्राईट.. पण कन्फ्यूजन.. थाम म्हणजे टेंपरवारी थांबवा.. हॉल्ट.. आणि पहा ओसाडगावच्या राजा रूपचंद आणि राणी बासमती यांचा ओपन डे.. त्यांची हलविती कुत्रे.. सॉरी.. सारी सूत्रे .. प्रधानजी राजकिशोरचंद..

सूत्रे हलवणे म्हणजे काय..

नाकात दोन पाय..

उघडा डोळे बघा नीट..

आपोआप कळेल.. सूत्र हलवणे काय असते..

इस्टार्ट..

टाळी वाजवतो तसा मागील पडदा उघडतो. सूत्रधार बाजूला जाऊन उभा राहातो.. जाता जाता डोळयांवर चष्मा लावत जातो.. बघूया तरी काय होतेय ते या दरबारात म्हणत.

***

प्रधानजी उभे आहेत.

समोरच्या जनतेस उद्देशून बोलू लागतात: महाराज आणि राणीसाहेब लवकरच येतील. त्यांच्या स्वागतास तयार रहा. लक्षात ठेवा, आपल्या महाराजांस काही प्रश्ण आवडत णाहीत. तेव्हा आम्ही काही जणांची तयारी करूण घेतली आहे तेच बोलतील. तोण्डी परीक्षा समजा. बाकीच्याणी ऐकावे आणि आम्ही सांगू तेव्हा टाळया वाजवावयासच पाहिजेत. णाही तर गाठ आमच्याशी आहे. कुणी मधेमधेच पचकू णये. मणचे प्रश्ण विचरू णयेत. यात चूक झाली तर गय...

तेव्हढ्यात महाराज रूपचंद आणि राणी बासमती येताना दिसतात..

पाठून आवाज :

जनहितदक्ष, प्रजाहितसुखाय, सर्वजगत  एकमेव, अति दक्ष लक्ष भक्ष, अति चाणाक्ष एकाक्ष गवाक्ष रुद्राक्ष, भवसागर मोती शुभंकरोती जनसागर रोटी, राजाधिराज आणि राणीपणधिराज महाराज रूपचंद आणि महाराणी बासमतीदेवी राजदरबारात ओपंडेमध्ये येत आहेत. सावधान! राजा रूपचंद की..  जय! महाराणी बासमतीदेवी की..जय!

एक श्रोत्यांमधील प्रजाजन हळूच दुसऱ्याच्या कानात: 'रूपकी रानी चोरोंके राजा की जय!' दुसरा ऐकून न ऐकल्यासारखा परत 'जय' म्हणतो.

सारे दरबारी उठून उभे राहातात. राजा आणि राणी सिंहासनावर बसतात. राजाच्या हातात फूल आहे. राणी पदराने वारा घेत शूऽऽ शूऽऽ करत बसते. प्रधानजी पंखा जोरात सुरू करतात. महाराजांच्या हातातले फूल आणि डोक्यावरचा मुकुट उडून जातो. महाराज एकाएकी सूर मारून तो मुकुट पकडतात आणि डोक्यावर घालतात. आधी उलटा मग सुलट. 'व्हॉट ए कॅच!' म्हणत प्रधानजी टाळ्या वाजवतात. पाठोपाठ सारे दरबारात उपस्थित लोकही वाजवतात. राणी बासमती आपल्या केसातले एक फूल उपटल्यासारखे काढून रूपचंद राजाच्या नाकाखाली पकडते. राजा दीर्घ वास घेतो. आणि जोरात शिंकतो. फुलाच्या दोन तीन पाकळया त्या शिंकेबरोबर लांब उडतात. राणी त्या पाकळयांकडे बघत राहते.

रूपचंद राजा: प्रधानजी दरबाराची कार्यवाही सुरू करा.

राणी राजाच्या हातास हात लावत 'मम' म्हणते.

प्रधानजी: जी हुजूर. तर प्रजाजण हो आणि प्रजाजणी हो, आज आपल्या सालाबादच्या जणदरबाराचा हा उत्सव आहे. पंचक्रोशीतील असे एकही राज्य असे णाही जिच्यात राजा आणि राणी सरकार आपल्या जणतेच्या प्रश्णांना स्वतः उत्तरे देत असतील. हा

दरबार ए खास आहे तो म्हणूणच. रूपचण्द महाराजांचे हे रूप आपल्या सर्व रयतेचा माणबिंदू आणि कृपासिंधू आहे. राणी सरकारांच्या साथीणे आज आपल्या प्रजेस हे महत्भाग्य लाभले आहे आणि आपल्या रयतेस, जणतेस, प्रजेस आता थोड्याच वेळात आपल्या समश्या मांडूण त्यावर उपायांचा लाभ होणार आहे. प्रश्ण विचारणारी जणता आम्ही या डाव्या बाजूस बसविली आहे. ही उजवीकडे बसलेली प्रजा श्रोतेवर्ग आहे. आम्ही सर्व दरबारी आपल्या प्रजेचे स्वागत करत आहोत.

रूपचंद राजा जोराची जांभई देतो. एक माशी उडत आत जाण्याच्या बेतात असतानाच राणी ती जोरात आपल्या हाताने उडवते. राजाचा चष्मा त्या झटक्याने खाली पडतो. राणी झटक्यात तो उचलून राजास देते. राजा चष्मा डोळयांवर चढवतो. प्रथम उलटा मग सुलट. काहीच झाले नसावे असा चेहरा करीत राजा बोलू लागतो

राजा: प्रधानजी दरबार शुरू करेंगे.. शुरू कर!

प्रधानजी: जी हुजूर. एकसाथ णमस्ते! प्रजेस विणंती की त्यांणी आपले प्रश्ण थोडक्यात विचरावेत. आम्ही काल शिकवलेले आठवणीत ठेवूण (मध्येच जीभ चावत.. ) आपल्या मणाणे प्रश्ण विचरावेत. फक्त अडचणीत पाडणारे णकोत.. म्हणजे स्वतःच्या व्यक्तिगत अडचणी आणि समश्या नकोत.. काल आम्ही णिवडलेले.. प्रश्ण.. णाही लोक.. महाराज..

राजा ( अजून एक जांभई आवरत ) : ओपंडे शुरू करेंगे शुरू कर.. एकसाथ शु**SS**रू**SS !**

एकाचवेळी सगळे प्रश्नकर्ते उभे राहून बोलू लागतात. सगळाच गोंधळ होतो. महाराज आपल्या कानांत बोटे घालून बसतात. राणी हाताला हात लावत मम म्हणते.

प्रधानजी: जण जणींनो.. एकसाथ शुरू म्हणजे महाराज म्हणतात.. एकएकाणी साथ में शुरू.. तेव्हा एकेकाने विचरावा प्रश्ण..

महाराज अजूनही कानात बोटे घालून बसलेत. तरीही आदेशानुसार एक उभा राहून प्रश्न विचारू लागतो.

महाराज**,** मागील वर्षी शेतसाऱ्यास माफीची घोषणा आपण केली होती. तर या वर्षी कोणती नवीन घोषणा अपेक्षित आहे**?**

प्रधानजी: वा छाणच प्रश्ण!

राजा ( कानातून बोट काढत ) : शाबास! छान स्वागत गीत. सुमधुर! विचारा प्रश्न!

राणी हातास हात लावत: मम

प्रधानजी आणि इतर दरबारी एकमेकांकडे पाहतात. प्रधानजी तत्काळ सावरतात.

प्रधानजी: शेतसाऱ्यावरील प्रथम प्रश्ण  विचरा.

परत तो प्रश्न विचारला जातो..

राजा: आम्ही शेतसारा मागील वर्षी माफ करण्याची घोषणा केली नि नंतर ते करण्याचे राहूनच गेले. तरीही आम्ही  जनतेस असे होऊ शकते असा एक दिलासा दिला. आमची जनता आमच्या या कृतीमुळे प्रसन्न जाहली हे आम्हास ठाऊक आहे. त्यामुळे आम्ही यावर्षी त्या निर्णयाची अंमलबजावणी करता येईल का यावर एक समिती बसवणार आहोत. हाच आमचा मोठा निर्णय आहे. आम्हास  प्रजेची काळजी दिनरात ( कानात करंगळी घालून कान साफ करत ) पोखरून काढत असते.

राणी: ( राजाच्या हातास हात लावत ) मम

प्रधानजी: वा! जणता जणार्दणहो.. टाळयांच्या गजरात महाराजांच्या णिर्णयाचे स्वागत करावे!

सारे दरबारी टाळया वाजवतात. प्रधानजी हातवारे करून जनतेस टाळया वाजवण्यास भाग पाडतात.

प्रधानजी: आता दुसरा प्रश्ण. कोण्डदेव तुम्ही विचरा.

एक कोंडदेव नामक नागरिक उठून उभा राहतो आणि प्रश्न विचारतो :

महाराज, गत वर्षी पाऊस पाणी यथास्थित झाले नाही. राज्याच्या काही भागात. तेथे पाणी टंचाई आहे. याबद्दल महाराजांनी काही सांगितले तर बरे.

राजा समोरील पाण्याची बाटली तोंडास लावतो

प्रधानजी: जल हे जीवण आहे. हे महाराजांस ठाऊक आहे..

राजा: आम्ही सांगतो प्रधानजी. पाणी किती महत्त्वाचे हे आम्ही जाणतो. आमचे नागरिक हे जाणतातच राज्यातील काही भाग कायम दुष्काळी असतो. त्यामुळे त्या व्यवस्थापनाचा आम्हास पुरेपूर अनुभव आहे. दुष्काळ पडला रे पडला  की आमची यंत्रणा कामास लागते. तशी यावेळेस ही लागेल. आम्ही यावेळेसही इतर जनतेस दुष्काळकरातून पीडीत जनतेस मदतीचे पुण्य मिळवून देऊ हे आमचे आश्वासन आहे. आणि यावेळी दुष्काळग्रस्त भागातून येणाऱ्या आमच्या नागरिकांसाठी प्रत्येकी एक तांब्या पाणी मिळण्याची व्यवस्थित व्यवस्था करण्याचे व्यवस्थित व्यवस्थापन होईल. आमचे प्रधानजी त्यात जातीने लक्ष घालतील. आणि सर्व जनतेस पाणी पाजतील.

प्रधानजी: टाळ्या!

सारे ठरवून टाळ्या वाजवतात.

प्रधानजी: तर जण आणि जणी हो, पुढचा प्रश्ण.. विचारा

एक नागरिक : सादर नमस्कार आन सलाम म्हाराज. म्हाराज दर्वेषी असला कार्रेक्रम घेत असतात. माज्या औक्षात मी सोता तीन येळेस यून गेलो की न्हाई. माज्या आठौणीत पैला कार्रेक्रम हाये. त्यायेळेस म्हाराजांनी आमाला म्हंजे आमच्या गावाला दिलंल आश्वासान अजून बी आमचं गाववाले आठवून खुश होत्यात. यायेळेस पन असाच कायतरी नवीन आश्वासान घ्यून म्या यीन असा आश्वासान म्या गाववाल्याना दिलेला हाये. तर म्हाराजांनी कुरपा करून नवीन आश्वासान द्यावे ही माजी नम्र विनंती हाये

प्रधानजी: बसावे बाबाजी. तुम्ही तीणदा आलात तेव्हा तुम्हाला माहितीच आहे आश्वासण म्हटले की महाराज मागे हटत णाहीत.

राजा: जा.दिले तुम्हाला.. दोन विहीरी त्यासुद्धा बारमास पाण्यासकट, झालेच तर घरोघरी गोबर गॅस, आणि तुमच्या खात्यात दरडोई पाच हजार सुवर्ण मुद्रा.. खुश बाबाजी?

राणी ( हाताला हात लावत ): मम

बाबाजी: उपकार जाले म्हाराज. धन्य जालो आम्ही. आता गावात आम्ही आमचे आश्वासान संपूर्ण क्येले हे सांगनार आम्ही.

प्रधानजी: टाळया..

सगळे टाळयांचा कडकडाट करतात.

राजा उठून उभे राहातो. त्याबरोबर राणी पण उठते.

राणी: महाराज, का उभे राहिलात?

राजा: काही नाही, पायास मुंग्या आल्या राणीसाहेब

राणी: प्रधानजी जल्दीने पाणी.. पाणी द्यावे

प्रधानजी : (तात्काळ पाण्याची बाटली हाती देत..) घ्यावी राणीसाहेब!

राणी पाण्याची बाटली राजाच्या पायांवर उपडी करते. राजाच्या पायातील मोजडी आणि सलवार ओली होते.

राजा: हे काय करीत आहात महाराणी बासमती?

राणी: मुंग्या मारत आहोत महाराज!

राजा: राणी बासमती, आपली मती पाहून आमची मती गुंग झाली.

शिपाई येऊन सांडलेले पाणी पुसतो. राजा आपल्या चपला काढून देतो. शिपाई त्या हवेत झटकतो. नंतर फुंकर मारून सुकवायचा प्रयत्न करतो. काहीतरी लक्षात

आल्यासारखा त्या चपला पंख्यासमोर घेऊन उभा राहतो. तसाच त्या घेऊन उभा राहतो. राजा अनवाणी बसून राहतो.

राणी: गेल्या मुंग्या महाराज?

राजा: तुमच्या पुढे त्या मुंग्यांचा काय पाड महाराणीसाहेब! आम्हाला वाटले तुम्ही मुंग्या मारण्याचे कुठले जालीम औषध फवारता की काय.. नुसत्या पाण्यावर निभावले हे बरेच.

राणी: पण ओल्या कपड्यांनी आपणास सर्दी तर नाहीना होणार?

राजा: जनतेच्या सेवेत आम्ही सर्दीपडशासारख्या गंभीर दुखण्यांस विसरून जातो.

जोरात शिंकतो. शिंकताना पुन्हा चष्मा पडतो. राणी तो उचलून देते. तो उचलताना तिच्या डोक्यावरचा मुकुट पडतो. राजा तो उचलण्यास खाली वाकताना दोघांची डोकी आपटतात. दोघेही कळवळतात पण लगेच सावरतात. राजा मुकुट आपल्या डोक्यावर घालण्याचा प्रयत्न करतो तर राणी चष्मा घालायला लागते. एकाएकी लक्षात येऊन आपल्या गोष्टींची अदलाबदल करतात. राणी मुकुट घालते. राजा चष्मा प्रथम उलटा घालतो मग सुलट.. हे सारे काही सेकंदांत होते. मग काही झाले न झाल्यासारखे राजा सुरू करतो

राजा: ओपंडे पुन्हा शुरू करेंगे.. शुरू कर**SS**

प्रधानजी: हुकूम महाराज. पुढचा प्रश्ण  विचरावा. तुम्ही बोलावे.. ते लाल फेटेवाले.

लाल फेटेवाला माणूस (उठून उभा राहात): महाराजांचा विजय असो. आम्ही ओसाडगावचे पाटील. आमची बैलं हायेत आणि श्येती हाये. महाराजांना गावची विनंती की महाराजांनी आमच्या गावाकडे एकदा येणे करावे आमच्याकडे भाकर तुकडा खावा आन आमच्या गावास पावन करावे.

प्रधानजी: महाराज, आपण..

राजा: थांबावे प्रधानजी. ( शिंकतो. राणी राजास लाल रूमाल देते )

राजा: पिवळा.. पिवळयास नाक पुसतो आम्ही.. लाल घाम पुसावयास..पांढरा उगाच शोभेसाठी.. हिरवा जेवताना सांडल्यास..निळा.. ( राणी आपल्या पर्स मधल्या रूमालांच्या स्टॉकमधून तत्परतेने पिवळा रूमाल देते. राजा नाक पुसतो. रूमाल हातातच त्याच्या )

राजा: तर पाटील, आम्ही जातीने येऊ. आज आमचा ओपन आश्वासन डे आहे. त्यात हे एक अजून.

राणी ( हातास हात लावायला जाते. तो पिवळया रूमालास लागतो.. हात मागे घेत स्वतःच्या रूमालास पुसते.. परत हात हातास लावत ): मम

प्रधानजी: टाळया

पाटील: फार मेहरबानी महाराज

सगळीकडे टाळयांचा कडकडाट होतो.

प्रधानजी: आजचा आपला पुढचा प्रश्ण आहे तो कोण विचरेल.. तुम्ही तिकडे मुंडासेवाले दादा..

मुंडासेवाला: महाराजांचा विजय असो! आम्ही गावागावातून या दरबाराची दरवर्षी वाट पाहात असतो. आमच्यासाठी हा एक उत्सवच असतो. मी कोपरेगावच्या शाळेत शिक्षक असून शेतकरीदेखील आहे. शाळेतून मी आपली स्तुतीपर गाणी शिकवत असतो. आपल्या महानतेमुळे आपला देश किती आणि कसा पुढे जात असतो हे आम्ही सारे शिक्षक मुलांच्या मनावर बिंबवत असतो. मुले त्यामुळे राजभक्त आणि राष्ट्रभक्त बनत असतात. त्याबद्दल सांगावे म्हणून मी खास कोपरेगावातून आलो आहे...

राजा: वा! शिक्षक म्हणजे देशाचे भविष्य घडविण्याची क्षमता असलेले लोक आणि त्यांनी आपल्या शिष्यगणांस असे घडवणे म्हणजे वा! या गुरूजी, असे वरती या! आम्ही तुम्हाला व्यकिश: भेटू इच्छितो.

मुंडासेवाले गुरुजी कम शेतकरी महाराजांच्या समोर जाऊन उभे राहतात.

राजा: प्रधानजी, हे गुरुजी खरे देशसेवक आहेत.. यांचा सत्कार करा. मागवा एक मोठा हार आणि श्रीफळ.

प्रधानजी: आज्ञा हुजूर

प्रधानजी टाळया वाजवून शिपायास बोलावून घेतात

प्रधानजी: शिपाई, जा पटकन मोठा हार घेऊन ये. धावत जा आणि पळत ये.. आणि एक श्रीफळही आण

शिपाई: जी हुकुम ..

शिपाई पटापट जातो. आणि झटकन येतो. राजा गुरूजींना हार घालण्यास उभे राहता राहता पाय अडखळून पडता पडता सावरतो. राणी त्याला त्याच्या शेरवानीस पकडून वर खेचते. राजा धड उभा राहतो. काहीच न झाल्यासारखे पुढे बोलू लागतो.

राजा: गुरूजी आमचे देशभक्त आहेत. असे राष्ट्रभक्त आणि मुलांना योग्य शिकवण देणारे गुरूजन असतील तर आमच्या सिंहासनास ताकदच मिळेल आणि मिळत राहिल. आम्ही ताकदवान तर राज्य ताकदवान. आम्हाला अशा शिक्षकवर्गाचा अभिमान वाटतो.

राजा हार घालतो. श्रीफळ देता देता हातातून सटकते आणि फुटते. नारळाचे पाणी परत राजाच्या कपड्यांवर पडते. शिपाई नारळाचे दोन्ही भाग उचलतो. राजा एक हातात घेऊन त्यातले थोडे उरलेले पाणी पितो आणि खोबरे खाऊ लागतो. राणी हातास हात लावून मम म्हणते. नारळाचा दुसरा अर्धा भाग राजा गुरूजींना देतो. गळयात हार घालून नि अर्धी करवंटी हातात घेऊन गुरुजी खाली जाऊन बसतात. राजा खोबरे चघळत बसतो. पण त्या गडबडीत त्यांच्या प्रश्नाचाच विसर पडतो.

प्रधानजी: टाळया..

सगळेजण टाळया वाजवतात.

प्रधानजी: आता आपल्याला पुढचा प्रश्ण कोण विचरेल.. तुम्ही.. काळा कोट.. हां तो कॉलरवर उसवलाय तो.. तुम्ही..

राजा: प्रधानजी, आजचा हा शेवटचा प्रश्न

श्रोतेवर्गातून आवाज: महाराज, आम्हाला आमच्या भागातले प्रश्न विचारावयाचे आहेत. दुष्काळी भागातील ज्वलंत प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत.. प्रधानजी आम्हाला विचारू देत नाहीत.. आम्ही खुलपुरातील जनता..

प्रधानजी: शिपाई, बाहेर काढा त्यास, महाराजांच्या दरबारात गैरवर्तण? आद्ण्या असेल तर कैदेत रवाणगी करू..

शिपाई येऊन त्याला बखोटीस पकडून नेऊ लागतात. जाता जाता तो ओरडतो, जनता दरबार नाही हा.. नाटक आहे नाटक.. फार्स..

राजा ( ऐकून न ऐकल्यासारखे करत ): प्रधानजी, दरबार पुढे सुरू करावा.

प्रधानजी: महाराज, यास काय शिक्षा द्यावी.. आपला उपमर्द..

राजा: सोडून द्यावे त्यास.. आणि पुढचे कामकाज सुरू करावे..

राणी हातास हात लावत : मम

प्रधानजी: महाराज आपण धन्य आहात.. तर काळे कोट वाले काका.. तुमचा प्रश्ण विचरा

काळाकोटवाला (उभा राहून ) : म्हाराजांचा जैजैकार्सो.. आम्च्या प्रदेशात पाउस्पाणी अत्युत्तम झाले याबद्दल म्हाराजांना आम्च्या गावक्र्यांकडून खास धन्यवाद द्यायास मी आलो आहे. गेले दोन्वर्षे पाव्साचा पत्ता नव्ह्ता पण या वर्षी म्हाराजांच्या क्रूपेने उत्तम पाव्साची सोय झाली. त्यामुळे पीक्पाणी उत्तम. आम्च्या प्रदेशातील जन्ता सुखीस्माधानी आहे तुम्च्या मुळे. याबद्दल सांग्वायास मी दूर्देशातून आलो आहे. प्रश्न काही नाही. फक्त हे सांगाव्यास आल्तो प्रधान्जींच्या क्रूपेने

राजा: अशी कृतज्ञ जनता पाहिली की मन भरून येते. ( बोलता बोलता नाक भरून येते. पिवळया रूमालास नाक पुसत..) कोठे दुष्काळ कुठे पाऊस हा निसर्गनियम आहे. त्याबद्दल आम्ही काय बोलणार? तरीही आम्ही पर्जन्ययज्ञ करवला त्याचे फळ मिळाले.. आम्ही भरून पावलो. प्रधानजी यावर आता पुढे काही..

राणी ( हातास हात लावत ) : मम

शिपाई मोजड्या सुकवत उभा होता तो त्यात हात घालून सुकल्या की नाहीत ते पाहतो. मग वाकून राजाच्या समोर ठेवतो. पाय घालता घालता राजा एका पायावर उभा राहतो. लंगडल्या सारखा. मग तोल जाऊन पडायला लागतो. राणी त्याला टेकू लावल्यासारखी उभी राहते आणि नंतर त्याला सरळ उभा करते. राजा पायात चप्पल चढवून निघू लागतो..

जाता जाता बोलतो: ओपंडे बरखास्त..! पुन्हा भेटू पुढच्या वर्षी!

प्रधानजी: जशी आद्ण्या महाराज. जणता दरबारात उपस्थित सर्व जणतेचे आभार..

पडदा पडतो..

****

सूत्रधार:

पाहिलेस..

पाहिलेस रसिका..

रसिका पाहिलेस ना..

हा प्रधानजींचा कावा..

वाजवती बघा तो पावा..

जनता दरबारी भेटली

राजास जनता प्रत्यक्ष

असता प्रधानजी ते दक्ष

कुणा न पडे प्रश्न तो यक्ष!

प्रजा झाली धन्य धन्य..

हा नसता राजा

काय व्हायचे..

असता कुणी अन्य!

प्रधान हलवी सूत्रे आणि

दरबारी न हलते कुणी कुत्रे..

न हले एकही पान जर

प्रधानजी न ठेवती भान!

राजा आमुचा दिसे.. पण नसे खुळा

अतरंगी..नाना कळा.. जरी दिसे बावळा!

कारभार तो करीतो असला

अंतर्यामी ठाऊक कसला

जनहिताय अन प्रजासुखाय

त्यावरी वर्ख असा लावला!

तर बघ रसिका..

अन हस रसिका..

उघडून डोळे निरूपायाने

अन स्वतःवरी तू निरूपायाने

जरा गडे तू हास!

याहून जराही न ठेवशी आस!

हा जनताभिमुख कारभार..

त्याचा प्रधानजींवर भार!

असा हा धन्य राजदरबार

पुढील वर्षी पुन्हा उडेल हा बार!

तर भेटू पुन्हा.. पुढच्या वर्षी!



# ५ महाराज हिमसागरांचा भाषासागर!

स्थळ : राजदरबार

भालदार आणि चोपदार घोषणा देण्यास तयार आहेत. त्यातील एक नवीन आहे. एक दुसऱ्यास: नवीन हायेस बाबा.. कागूद घ्यून वाच..

दुसरा: व्हय. तसा पाट केलेलाय म्या. तरीबी..

हातातली कट्यार सिंहासनावर ठेवून हातात कागद घेऊन उभा राहतो.

महाराज येताना दिसताच दोघे घोषणा सुरू करतात. नवीनवाला हातात कागद घेऊन वाचतो..

राजाधिराज बंधूकुलोत्पन्न हिमसागर महाराज आपले चरणकमल घेऊन आणि राजदरबारात आपल्या कमलकरांनी सर्व दरबारी, सरदार दरकदार आणि सामान्य जनता यांसाठी आशीर्वचनांची कवचकुंडले घेऊन पावन आणि पुलकित करण्यास येत आहेत हो.. सर्वांनी आपले मुजरे आणि नमस्कार तयार ठेवावेत हो.. राजदरबारात पवित्र चरणधूळ झाडत आलेल्या महाराज हिमसागर यांचा विजय असो.. विजय असो.. विजय असो.. विजय असो.. चौवार विजय असो!

राजे हिमसागर सिंहासनावर बसतात. राजास ती कट्यार टोचते. तो नवा भालदार धावत येऊन ती कट्यार राजाच्या हातातून घेतो. राजा संतापतो..

महाराज: प्रधानजी, हे काय आहे? आमच्या सिंहासनावर कट्यार?

प्रधानजी: माफी असावी महाराज. शिपाई नवीन आहेत. त्यांच्याकडून चूक होऊ शकते

महाराज: शकते? नाही झालीच आहे. कट्यार तिच्या म्यानात होती म्हणून बरे.. नाहीतर काय झाले असते? आमची ही नवी कोरी सलवार फाटली असती .. कल्पना करवत नाही..

शिक्षणमंत्री: होय महाराज.. पण कट्यार आहे.. करवत नाही ती!

प्रधानजी: कट्यारच आहे. ती ही तिच्या म्यानात होती.

महाराज: नवीन आहेत शिपाई म्हणून सोडून देऊ यावेळेस. परंतु पुन्हा अशी चूक झाल्यास तीस माफी नाही!

प्रधानजी: नाही महाराज! पुन्हा अशी चूक होणार नाही! आम्ही जातीने ध्यान देऊ.. पुढच्या वेळी नवीन चूक करावयास सांगू त्यास..

शिक्षणमंत्री: होय महाराज, माणूस स्खलनशील आहे हे आपणच शिकवतो ना?

महाराज: स्खलनशील? म्हणजे कसा?

शिक्षणमंत्री: चूक झाली महाराज.. माफ करा!

महाराज: या चुकीस माफी नाही.. असले जड आणि बोजड शब्द वापरता.. या चुकीस क्षमा नाही..

शिक्षणमंत्री: क्षमा असावी महाराज. पण चुकणे आणि त्याबद्दल चुकचुकणे हे होतच राहाते. मनुष्यप्राणी हा चुका करतो म्हणून त्यास स्खलनशील म्हणतात.. तेव्हा या शिपायास उदार आणि मृदु अंत:करणाने माफ..

महाराज: ते आम्ही कधीच केले आहे.

शिक्षणमंत्री: धन्यवाद महाराज. माणूस आहे.. चुकणारच! तेच त्याचे व्यवच्छेदक लक्षण नव्हे काय?

महाराज: काय च्छेदक? ते राहू द्यावे.. आम्ही त्या शिपायास कधीच माफ केले आहे.. पण आम्ही बोलतोय ते तुमच्याबद्दल! तो स्कलन की ज्वलनशील शब्द..

शिक्षणमंत्री: महाराज.. जड.. बोजड अवघड आणि  क्लिष्ट असे काही विशिष्ट शब्दांत विशिष्टपणे काहीच नसते.. ते आपापल्या मनमंदिरातील किंवा मस्तिष्कातील एखाद्या शाब्दिक, मौलिक वा..

महाराज: खामोश! प्रधानजी..

प्रधानजी: जी महाराज..

महाराज: आज शिक्षणमंत्र्यांस सुट्टी द्यावी. मंत्री.. जा.. आता सोपे शब्द शिकून या..

शिक्षणमंत्री: क्षमा याचना करीत आहोत महाराज दोन्ही कर जोडूनी.. य:कश्चित नगण्य अशा या मनुष्यप्राण्याकडून नकळत प्रमाद घडल्याबद्दल तो आपल्याकडे कृपाकटाक्षाची भीक मागत आहे.. या आमच्या कररूपी वाडग्यात आपल्या कृपाप्रसादाची ओंजळ घालून उपकृत केल्यास आजन्म ऋणी राहू..

महाराज: शिक्षणमंत्री.. आपण जावे. नाहीतर आपले भाषण समजावून घेण्यास अजून कोणाची नेमणूक करावी लागेल. सोपी भाषा शिकावी अन परत यावे..

शिक्षणमंत्री: बंदा आपल्या हुकुमाबाहेर नाही महाराज. आता एकच ध्येय.. एकच लक्ष्य! सुलभीकरण.. सुलभीकरण आणि..

महाराज: शिक्षणमंत्री..! आपण त्वरित रवाना व्हावे..

शिक्षणमंत्री: जी हुजूर!

(शिक्षणमंत्री जातात)

महाराज: एवढे विद्वान आपले मंत्री असतील असे वाटले नव्हते आम्हाला. प्रधानजी, दरबाराची कार्यवाही सुरू करावी

प्रधानजी: जी महाराज.

महाराज: राज्याची हालहवाल..

प्रधानजी: उत्तम!

महाराज: सर्वकाही..

प्रधानजी: सुरळीत!

महाराज: सुरळी?

प्रधानजी: सुरळीत महाराज..

महाराज: सारे कसे ..

प्रधानजी: कुशल आणि मंगल!

(आतून दोघे शिपाई बाहेर येत मुजरा करतात..)

दोघे: आज्ञा हुजूर!

प्रधानजी: तुम्हाला कुणी बोलावले?

एक शिपाई: आताच तर बलावले.. म्या कुशल ..

दुसरा: अन म्या मंगल!

महाराज: वा! आम्हाला आता हसू फुटत आहे.. हा कुशल आणि तो मंगल!

प्रधानजी: महाराज, किती छान झाले हे.. आता दरबारात नेहमीच कुशल मंगल राहिल!

(शिक्षणमंत्री आतून बाहेर येत..)

शिक्षणमंत्री: क्षमा महाराज.. पण व्याकरणदृष्ट्या थोडे चुकीचे आहे.. राहतील म्हणावयास हवे!

महाराज: शिक्षणमंत्री.. चुकीचे गेले चुलीत! आपण आमची आज्ञा..

शिक्षणमंत्री: उल्लंघितो आहे याची कल्पना आहे.. पण आपल्या भाषेच्या उपमर्दाची आणि व्याकरणदृष्टीने..

महाराज (दटावत): शिक्षणमंत्री..

(शिक्षणमंत्री परत निघून जातात.)

महाराज: हुश्श.. यांच्या जिभेवर कालीमाता नाचते की काय?

शिक्षणमंत्री (परत बाहेर येत): आपणास सरस्वती नर्तन करते असे म्हणायचेय का?

(महाराज रागावून बघतात तसे शिक्षणमंत्री पटकन आत निघून जातात.)

महाराज: तर प्रधानजी, दरबारात सर्व कुशल मंगल आहेच. ते असेच राहिल यापुढेही हे खरे. पुढे बोलावे काय ते.

प्रधानजी: अत्यंत समाधानकारक. राज्याची प्रगती समाधानकारक. शेती आणि तत्सम बाबी .. समाधानकारक.. उद्योग आणि तत्सम.. समाधानकारक..

महाराज: हे तत्सम कुठून आलेत?

प्रधानजी: महाराज.. तत्सम म्हणजे त्यासारखे.. चूक झाली..

(शिक्षणमंत्री आतून हसल्याचा आवाज येतो..महाराज दुर्लक्ष करतात)

महाराज: बोलावे पुढे.. राज्याचे प्रगतीपुस्तक!

प्रधानजी: समाधानकारक!

महाराज: म्हणजे? वरच्या वर्गात ढकलला?

प्रधानजी: नाही महाराज.. ढकलला नाही.. स्वतःहून पोहोचला वरच्या वर्गात! अभ्यास करून! विद्यार्थी गुणी आहे महाराज!

महाराज: छान! चांगले चाललेय राज्य! प्रधानजी..

प्रधानजी: हुकूम महाराज..

महाराज: विद्यार्थी उत्तम म्हणून शिक्षक उत्तम!

प्रधानजी: होय महाराज.. आणि खरेतर शिक्षक उत्तम..म्हणून विद्यार्थी उत्तम!

(शिक्षणमंत्री बाहेर येत..)

शिक्षणमंत्री: धन्यवाद महाराज.. आपल्या राज्यातील आमच्या अखत्यारीतील शिक्षकवृंद बालमनांवर संस्कार करीत त्यांस मृत्तिकेच्या मृदु गोळ्यासम आकार देत आहे. त्या

कौशल्याच्या बळावर हा विद्यार्थी त्यानंतर जीवनपरीक्षेचा मेरूपर्वत लीलया लांघून जाऊन त्याप्रमाणे बाह्य जगातील आव्हाने पेलण्यास समर्थ होत आहे.. त्या कष्टांची सुमधुर अन रसदार फळे आपल्या समोर आपल्या जिव्हेस सुखावतील अशी..

महाराज: शिक्षणमंत्री.. तुम्हांस आम्ही आधीच सांगितलेले.. एक तर हा विद्यार्थी तो तुमचा शाळकरी नव्हेच.. त्यास तुम्ही आपला विद्यार्थी समजण्याची चूक का करत आहात?

शिक्षणमंत्री: क्षमा असावी पण या  जीवनशिक्षणात प्रत्येक जण विद्यार्थी आणि जीवनसंगरात प्रत्येक जण सैनिकच असतो महाराज..

महाराज: असेल.. पण त्याहूनही महत्त्वाचे.. आपल्या जिभेत काही हाडे उगवेपर्यंत आपण विश्रांती घ्यावी असा आमचा आदेश होता.. तो मोडून तुम्ही परत तोच गुन्हा करीत आहात..

शिक्षणमंत्री: प्रमादाबद्दल माफी असावी.. विद्यार्थी आणि शिक्षक म्हटले की आमची ही कर्णसंपुटे टवकारल्यावाचून राहात नाहीत..

महाराज: शिक्षणमंत्री.. आम्ही आपणास कोणत्या भाषेत शिकवावे की आपणास कळेल?

शिक्षणमंत्री: कळेल म्हणजे आकलन महाराज? पण आता शिखा भंगो की वटवृक्षाची पारंबी.. आम्ही आमच्या भाषेचे सुलभीकरण करूनच आपणास आमचे हे मुखदर्शन देऊ..

महाराज: जावे.. आणि यशस्वी होऊन यावे.. प्रधानजी.. मंत्र्यांस दूर त्यांच्या महाली सोडण्याची व्यवस्था करा म्हणजे ते असे मिनिटामिनिटात परत येणार नाहीत.

प्रधानजी: हुकूम महाराज..

शिक्षणमंत्री: मनुजा नकोस विसरू कधी ते दृष्य.. पळापळाने घटते ते आयुष्य..

महाराज (दटावत) :  शिक्षणमंत्री..

(शिक्षणमंत्री जातात. दरबार पुन्हा सुरू होतो.)

महाराज: प्रधानजी, आपल्या राज्यातून रस्त्यांबद्दल तक्रारी होत्या. काही त्याबद्दल सांगावे

प्रधानजी: होय महाराज..

महाराज: आपल्या राज्यातील काही रस्त्यांवर काही प्रमाणात खाचखळगे झाल्याच्या बातम्या होत्या.. मग त्याचे आता काय झाले?

प्रधानजी: आम्ही चौकशी करत आहोत. त्याच्या अहवालाची वाट पाहात आहोत.

महाराज: पण हे असे खड्डे रस्तोरस्ती का पडावेत?

प्रधानजी: महाराज, आमचे काही मंत्री म्हणतात.. रस्ता आहे तर खड्डे असायचेच!

(शिक्षणमंत्री आतून बाहेर येतात..)

शिक्षणमंत्री: आम्ही कथन करतो महाराज.. कुठल्याही रस्त्यावर खाचखळगे असायचेच! असा कुठला जीवनपथ आहे ज्यावर मनुष्य प्राण्यास त्यांचा सामना करावा लागत नाही? मनुष्याच्या एकूणच जीवनप्रवासात जीवनशक्ती लागते आणि त्यासाठी जीवनलालसा आणि यांस..

महाराज: शिक्षणमंत्री.. आपण गेला नाहीत.. प्रधानजी.. अजून हे येथेच कसे?

शिक्षणमंत्री: आम्ही प्रस्थानाकरीता रथाच्या आगमनाची प्रतीक्षा करीत होतो पण महाराज राजरस्त्यातील खड्ड्यात रथचक्र फसल्याने त्यास विलंब होण्याचे वृत्त आहे..

महाराज: प्रधानजी..

प्रधानजी: महाराज, हे खरेय महाराज. रस्त्यातील एका ठिकाणी रथाचे चाक अडकल्याने उशीर झाला.. त्यामुळे शिक्षणमंत्री खोळंबलेले आहेत.

महाराज: हा आमचा उपमर्द आहे प्रधानजी!

प्रधानजी: क्षमा असावी महाराज. त्या रथचक्रास कोणती सजा द्यावी महाराज?

महाराज: चुकताय तुम्ही प्रधानजी! चूक त्या रस्त्यातील खड्ड्याची आहे

शिक्षणमंत्री: हे विश्लेषण अत्यंत सुयोग्य आणि चपखल आहे महाराज. याबद्दल आम्हास आपला अभिमान आहे. आम्ही शिक्षणप्रसार करण्यासाठी..

महाराज: शिक्षणमंत्री..

(मंत्री आत जातात)

महाराज: प्रधानजी.. तो रथ नसेल तर दुसरा मागवा.. दुसरा नसेल तर तिसरा मागवा.. पण या मंत्र्यांची रवानगी करा जल्दीने. नाहीतर आम्ही भाषेच्या आघाताने जायबंदी होऊ!

(शिक्षणमंत्री परत बाहेर येतात..)

शिक्षणमंत्री: नाही महाराज नाही.. हे होणे नाही.. हे आम्ही होऊ देणार नाही.. आजपासून या जिव्हेवरील काठिण्याचा आणि दुर्गमतेचा थर कायमचा ओरबाडून आणि खरवडून काढू आम्ही.. त्याचा पाठीमागे सोडणार नाही लवलेश आणि अवशेषही.. करू अशा भाषेस नामशेष आणि शोध घेऊ सुगमतेचा.. लालित्य फक्त ललितरम्य भाषेच्या प्रयोगातच नसते पण साध्या पण सुयोग्य शब्दांच्या सहजसुंदर उपयोगातून ही त्याचा अनघड आणि मनोहर तसेच मनोरम आविष्कार घडवून आणता येऊ शकतो.. याबद्दल आमच्या मनात यत्किंचितही किंतु नाही.. त्यामुळे यापुढे या दृष्टीने विहंगमावलोकन करून फक्त सुलभ भाषा संयोजन.. सुलभ शब्दोच्चार.. सुलभ..

महाराज: तुम्ही राहू द्यावे शिक्षणमंत्री.. आजच्या आमच्या भाषिक औषधीची मात्रा थोडी जास्तच उगाळली गेली आहे.. तिचे जास्त वळसे घेतल्यास आम्हाला त्याची बाधा होण्याची शक्यता आहे. प्रधानजी हवे तर यांना आमचा रथ द्या पण आता तरी या छापखान्यातील खिळयांसारखे शब्द वापरणाऱ्या आमच्या मंत्र्यांस त्यांच्या महाली सोडून या.. आणि आता या भाषिक जुलूमावर जालीम उतारा शोधा!

प्रधानजी: हुकूम महाराज..

(शिक्षणमंत्री जातात..)

प्रधानजी: शिपाई.. महाराजांच्या रथाच्या चालकास तातडीने बोलावून घ्या आणि शिक्षणमंत्र्यांस त्यांच्या घरी पाठवून द्या!

शिपाई: हुकूम सरकार..

महाराज: शाबास प्रधानजी.. आता आम्ही नीट श्वास घेऊ शकू.. या उच्चतम कोटीच्या भाषेने आम्ही गांजून गेलो.. असे वाटले की आमचा हा श्वास कोंडतोय की काय जैसा एखाद्या पिंजऱ्यात अडकावा राघू ..

प्रधानजी: पण महाराज.. काळजी नसावी.. शिक्षणमंत्री तर गेले..

महाराज: ते गेले म्हणूनच तर आम्ही असा सुटकेचा दीर्घ आणि उबदार निश्वास सोडला. आता आमच्या जीवात जीव येईल. आमच्या मनात रूंजी घालणारे हे विचार एखाद्या फुलपाखराप्रमाणे आता स्वच्छंद विहार करतील.. त्या मंत्र्यांनी असे काय केले..

प्रधानजी: पण महाराज.. शिक्षणमंत्री तर गेले..

महाराज: ते सत्य.. पण आम्हाला वाटते की आम्हास तर लागण झाली नाही ना.. आमची भाषा ऐकून वाटते.. अरेच्चा.. आम्हास ही तो शिक्षणमंत्र्यांचा गुण लागला की काय**?**

शिपाई: (हळूच.. पण दरबारास ऐकू जातेच..) बाबा कुशल.. आईक.. ढवळयाशेजारी पवळा बांदला.. वाण नाहीतर गुन लागला!.. ( मंगल हळूच टाळी देतो..)

महाराज: कोण रे तो बोलतोय**?**

प्रधानजी: माफी असावी महाराज.. शिपाई नवीन आहे..

महाराज: अजून एकदा माफी देतो आहोत.. पण यानंतर नाही..

प्रधानजी: शिपाई.. याउप्पर असला गुन्हा माफ करण्यात येणार नाही..

शिपाई: चूक झाली सरकार.. पुन्यांदा न्हाई व्हनार.. आयच्यान शपथ

महाराज: प्रधानजी**,** जल्दीने आपल्या गुरूजींस बोलावणे पाठवा. शिक्षणमंत्र्यांनी आमच्या डोक्यात भाषिक कोलाहल माजवला आहे.. असे वाटतेय की साधे सरळ काहीच बोलू नये.. वापरावी अशी भाषा की कोणास ती ऐकून कुणी विद्वान बोलत आहे असे वाटावे..

प्रधानजी: जी हुजूर.. शिपाई.. राजगुरूंस घेऊन या दरबारात.. तातडीने..

शिपाई: आज्ञा हुजूर

महाराज: तुम्हाला काय वाटते प्रधानजी.. आम्ही यातून सुधारू**?** आम्हास ही दुर्धर व्याधी जडल्यासारखे वाटत आहे..

प्रधानजी: महाराजांनी धीर सोडू नये. आजवर या राज्याने कित्येक संकटे झेलली..

महाराज: त्या सगळयात हे गंभीर आहे प्रधानजी.. कारण त्याची प्रत्यक्ष झळ आम्हाला बसली आहे.. या भाषिक चक्रव्यूहातून कसे पडावे बाहेर.. अभिमन्यूसारखे आम्ही शिरलो तर आत पण आता यातून निर्गमन कसे करणार?

प्रधानजी: राजगुरूंकडे याचे नक्कीच उत्तर असेल महाराज..

(राजगुरू येतात..)

राजगुरू: महाराजांचा विजय असो. आम्हाला तातडीने बोलवावे असे काय संकट आहे महाराज.. आम्ही सेवेत हजर आहोत हुजूर

महाराज: गुरुजी.. आज आम्ही एक भयंकर द्विधा मनस्थितीत सापडलो आहोत. जणू एखाद्या कात्रीत अडकलो आहोत. कवी असतो आणि परिस्थिती अनुकूल असती तर कमलदलात अडकलेल्या भुंग्यासम असे म्हणालो असतो.. आमच्या मनात नि मुखातूनही शब्दांचे पाट वाहात आहे.. शब्दगंगेचा प्रवाह धरबंद सोडून धो धो वाहू पाहात आहे. एखाद्या प्रपातासारखा.. आणि या साऱ्यास जबाबदार आहेत आमचे शिक्षणमंत्री. त्यांच्या जिव्हालौल्याची आम्हाला लागण झाली. आम्ही एक काठिण्यपातळी गाठून आता बोलू लागलो आहोत. आता यातून आमची सुटका नाही. एखादे भूत बसावे मानगुटीवर..आमच्या मुखी ही असली भाषा येऊन वसली आहे.. आता या बाधेवर उतारा कोठला?

राजगुरू: महाराजांनी शांत व्हावे. आम्हाला समजले आहे की हे काय होत आहे.. आणि आपणास वाटते ती समस्या नसून तो एक उपाय आहे..

महाराज: गुरुजी असे कोड्यात का बोलावे. आमच्या दुभंग मेंदूत हे शिरत नाही. एक मन म्हणते की साधेसुधे बोलावे .. दुसरे त्यावर वरचढ होऊन म्हणते.. नाही.. तुझे काही ऐकणार नाही.. ही आणि असलीच भाषा हवी.. एखाद्या दुभंगव्यक्ती सारखे आम्ही पाहात आहोत.. मूळ व्यक्तीस हताशपणे पाहण्यावाचून कुठला पर्यायच नाही राहिला आता..

राजगुरू: शांत महाराज.. आमची एक विनंती आहे..

महाराज: बोलावे गुरुजी..

राजगुरू: आपले दोन शिपाई येथे समोर उभे करावेत.. त्यांना आपण काही ही सांगावे..जे मनात येईल आपल्या ते.. त्यानंतर आम्ही पुढील उपाय सांगू..

महाराज: याने उपाय सापडेल?

राजगुरू: आपण करून तर पहावे महाराज..

महाराज: ठीक आहे.. आज्ञा आहे.. प्रधानजी: कुशल, मंगल.. इकडे येऊन उभे रहा.

(दोघे येऊन उभे राहतात..)

गुरूजी: शिपायांनो.. महाराज काय म्हणतात ते लक्ष देऊन ऐका..

शिपाई: हुकूम सरकार

गुरुजी: महाराजांनी आता काही वाक्ये बोलावीत यांना उद्देशून अशी विनंती आहे..

महाराज: होय.. आम्ही बोलूच. आमच्या नेक दिल शिपायांना आदेश आम्ही देऊच. आम्हाला याबद्दल संतोष आहे की आपणाकडे यावर उतारा उपलब्ध आहे. आम्ही चित्त एकाग्र करून हाच विचार मनात घोळवीत आहोत की कधी आम्ही या भाषिक तुरूंगातून सुटून मुक्त श्वास घेऊ.. पुनश्च येतील ते पुराणे दिन.. जेथे असतील फक्त सुंदर पण सुलभ शब्द.. ज्यास असतील फक्त अर्थांच्या चौकटी.. आणि उन्मुक्ततेने घेऊ आम्ही जीवनाचा आस्वाद.. एखाद्या पांढऱ्याशुभ्र कबुतराच्या फडफडणाऱ्या पंखासारखे आम्हीही फडफडवू आमच्या विचार आणि भावभावनांचे पर आणि फोडून जाऊ छप्पर या अथांग आसमंताचे..

राजगुरू: कृपया थांबावे महाराजांनी..

(महाराज बोलायचे थांबतात)

राजगुरू: आता शिपाई.. सांगावे महाराज काय बोलले?

कुशल: म्या? मला न्हाई.. मंगल.. बोल की म्हाराज तुला बोल्ले..

मंगल: न्हाई बा.. मला एकल्याला न्हाई.. आपल्या दोघांनाबी बोल्ले म्हाराज..

राजगुरू: भांडू नका.. पण दोघांपैकी कुणास कळले असेल तर सांगावे..

मंगल: म्या न्हाय बा सांगत..

कुशल: म्या काय बोलू.. मला तर काय बी नाय कळलं..

मंगल: मला बी..

कुशल: पन म्हाराज.. कळलं काय नाय पन आईकायला ग्वाड वाटलं बगा

मंगल: लयभारी वाटलं म्हाराज.. आसं वाटलं की आईकत ऱ्हाऊ..

कुशल: खरंच बाबा.. झ्याक अगदी..

राजगुरू: महाराज.. आपल्या प्रश्नाचे उत्तर येथे आहे..

महाराज: म्हणजे कानास ऐकायला चांगली वाटेल ती भाषा.. मग ती कोणास कळो न कळो..

राजगुरू: नाही महाराज.. हे उत्तर नाही आमचे.. आम्ही समजावून देऊ ..पण त्याआधी हा दरबार बरखास्त केल्यास..

महाराज: प्रधानजी, दरबार बरखास्त करा. फक्त तुम्ही आणि राजगुरू यांनी येथे थांबावे.

(सारे दरबारी निघून जातात. शिपाई जाऊन बाहेर उभे राहतात..)

महाराज: बोलावे गुरुजी.. आम्हास अत्यंत आश्चर्य वाटत आहे.. आपणास कसे मिळाले प्रश्नाचे उत्तर?

राजगुरू: सांगतो आम्ही महाराज. हे दोघे शिपाई आपल्या जनतेचे प्रतिनिधी समजावेत. आपली जनता त्यांच्यासारखीच अशिक्षित वा अर्धशिक्षित. त्यांना आपण काय म्हटले त्यातील एक अक्षरही कळले नाही महाराज..

महाराज: तोच तर आमच्या पुढील यक्षप्रश्न आहे.

राजगुरू: नाही महाराज.. तो प्रश्न नाही.. तेच उत्तर आहे!

महाराज: म्हणजे काय गुरुजी?

राजगुरू: आपले शिपाई शेवटी काय म्हणाले.. कानास ऐकावयास गोड वाटले..

महाराज: म्हणजे**?**

राजगुरू: महाराज.. ही आपली खास पद्धत.. जिच्यात आपण बोलताही.. ऐकणाऱ्यास चांगले वाटते आणि तो खूश होतो.. अगदी त्याच्या हाती काहीच लागत नाही तरी. उलट आपला राजा किती उच्च दर्जाचा विचारी आणि विचारवंत असल्याचे त्यास वाटू लागते.

प्रधानजी: खरे आहे महाराज..

राजगुरू: अन या भाषेआडून आपण आपणास हवे ते हुकूम सोडू शकता. त्या भारी शब्दांच्या आडून हवे ते करवून घेऊ शकता.

महाराज: अस्सं**?**

प्रधानजी: खरंय महाराज..

राजगुरू: आणि अजून एक.. ही आणि असली भाषा ज्यांना समजेल तो विद्वान.. तो आपल्या दरबारात मानकरी होईल. बाकीचे सामान्य जन म्हणवले जातील.

म्हणजे निव्वळ भाषेच्या निकषावर सामान्य जन अन वरील दर्जाचे अभिजन यांस तोलून घेता येईल. म्हणजे ही भाषा अभिजनांसाठी उपयुक्त..

प्रधानजी: म्हणजे अभिजनच ही भाषा बोलू शकतील.. किंवा जे ही बोलू आणि समजू शकतील तेच अभिजन!

राजगुरू: योग्य बोललात प्रधानजी. अजूनही फायदे आहेत महाराज. कठीण भाषा समजून घेण्यासाठी सामान्यांस अभिजनांच्या पायी यावेच लागेल. आणि मदत मागणारा कधीही ज्याच्याकडे जातो तो आपसूकच वरच्या दर्जाचा गणला जातो! त्यामुळे आपली सामाजिक दर्जाची उतरंडही आपसूक बनून राहाते.

प्रधानजी: खरे आहे महाराज..

राजगुरू: या खेरीज आपल्या भाषेच्या जोरावर आपण असे हुकूम सोडू शकता ज्याचा आपण आपल्या सोयीनुसार अर्थ बदलून हवा तेव्हा हवा तसा लावू शकता..

महाराज: म्हणजे या काठिण्यपातळीचे फायदे बहुत आहेत..

राजगुरू: अर्थात महाराज..

महाराज: याचा अर्थ हीच भाषा उपयुक्त आहे**?**

राजगुरू: होय महाराज. विशेषत: राज्यकारभारात. त्यासाठी या भाषेत थोडे अजून बदल करता येतील महाराज..

महाराज: प्रधानजी.. आज आम्हाला आमच्या राजगुरूंच्या असण्याचा अभिमान वाटतो..

प्रधानजी: खरेय महाराज

महाराज: आणि आपल्या शिक्षणमंत्र्यांस बोलावून घ्या.

प्रधानजी: होय महाराज..

महाराज: आणि रथ नसेल तर आमचा रथ पाठवा..

प्रधानजी: होय महाराज..

महाराज: आम्ही त्यांच्याकडून असेच शिकत राहू इच्छितो.. आम्ही ही असेच बोलत राहू..आम्ही महाराज हिमसागर आपल्या शब्दभांडारात भर घालत घालत त्याचा बनवू भाषासागर.. आणि त्यातील उचलून एक एक शब्दरूपी थेंब चिंब भिजवून टाकू आम्ही जनतेस आमच्या टपोऱ्या विचारमौक्तिकांनी..

प्रधानजी: होय महाराज

महाराज: आणि या बळावर एक दिवस गणले जाऊ आम्ही चक्रवर्ती..

प्रधानजी: होय महाराज..

महाराज: प्रधानजी.. आता आम्ही अजून नाही करू शकत प्रतीक्षा.. शिक्षणमंत्र्यांस बोलवा.. तातडीने..!

प्रधानजी: होय महाराज!



# ६ हास्यराज महाराजांच्या दरबारात

दरबारात महाराज प्रवेश करतात. दरबारी शांत बसून आहेत. महाराज येण्याची घोषणा होत नाही. राजा थोडा वेंधळा आहे. अंगातील अंगरख्याच्या गुंड्या वरखाली लावलेल्या. डोक्यावरचा मुकुट वाकडा घातलेला. पायात मोजड्यांच्या ऐवजी बाथरुम स्लीपर्स. येता येता जोरदार जांभया देतात. आणि सिंहासनावर बसता बसता घसरतात. परत उठून बसतात..

महाराज: प्रधानजी..

प्रधानजी: जी हुजूर..

महाराज: आज आम्ही आलो तेव्हा पाठून हसण्याच्या आवाजाची टेप लावली नव्हती.. आम्ही त्यामुळे खफा आहोत..

प्रधानजी: आम्हाला कल्पना आहे महाराज. (हळूच) आणि लावली असती तर ती आपण धर..पडलात तेव्हाच वाजली असती नेमकी.. (मोठ्याने) पण आम्ही जातीने चौकशी केली आहे..

महाराज: चौकशी? मग काय आढळले त्यात?

प्रधानजी: त्यात असे आढळते आहे की आपल्याकडे जी एकमेव हसण्याची टेप होती ती घासून घासून गुळगुळीत झाली असून ती आता वापरणे शक्य नाही.

महाराज: काय? म्हणजे यापुढे हास्यरसाचा परिपोष होणे नाही? आम्ही आमचा दिवस काय असाच सुरू करावा की ज्यात आम्हास गंभीर मुद्रेने राहावे लागेल? आमच्या राज्यातील हास्यरसोत्पादनामुळे आपले राज्य देशविदेशात प्रसिद्ध आहे. आम्ही देशभर आदेश दिले होते.. हास्यरसाचे घाऊक उत्पादन आमच्या राज्यात झालेच पाहिजे. आणि बाटली अन डबाबंद हशे जागोजागी मिळाले पाहिजेत..आणि विषय

हास्याचा असला तरी हसण्यावारी नेण्याचा नाही. हास्योत्पादनाचे गंभीर प्रयत्न आमच्या राज्यात झालेच पाहिजेत असा आमचा हुकूम असताना हे असे संकट यावे. (आकाशाकडे पाहात) श्रींच्या मनात काय योजिले असावे न कळे. हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा.. आणि ते हास्यास्पद व्हावे ही आमची इच्छा!

प्रधानजी: क्षमा असावी महाराज.. हास्यास्पद शब्द चुकीचा वाटतो येथे..

महाराज: असेल. आम्ही हास्यरस भक्षण..सेवन किंवा श्रवण न केल्याने ही आमच्यावर नौबत आली.

प्रधानजी: क्षमा महाराज. आम्ही जातीने लक्ष घालतो आणि पाहतो यासंबधी काय करता येईल..

महाराज: प्रधानजी.. तुम्ही नको.. तुम्हीदेखील गेलात तर आम्हास करमणार नाही येथे. तुम्ही नसलात तर आम्ही कुणाच्या तोंडाकडे पाहून हसावे? तुम्ही दुसऱ्या कोणास पाठवावे आणि स्वतः येथेच थांबावे..

प्रधानजी: हुजूर जो हुकूम. आम्ही आपल्या सांस्कृतिक मंत्र्यांस धाडतो आणि स्वतः आपल्या मनोरंजनासाठी येथेच राहातो..

महाराज: शाबास प्रधानजी. पाठवा त्या मंत्र्यांस.. आज दिसत नाहीत ते?

प्रधानजी: महाराज.. खरेतर ते याच प्रश्नावर आधीच तोडगा काढण्यास गेले आहेत..आम्हीच पाठवले त्यांना. पण परत आले की परत धाडून देऊ त्यांस..

महाराज: कशाला?

प्रधानजी: उपाय शोधण्यास महाराज..

महाराज: पण तोडगा निघाल्यास त्यांना परत जाण्याची जरूरी..?

प्रधानजी: जरूरी नसेल तरी पाठवू महाराज.. आपल्या आज्ञेचे पालन हे आमचे कर्तव्य आहे. त्यामुळे त्यांना जावेच लागेल आणि जाऊन परत यावेच लागेल..त्यांना आता तोडगा न मिळाल्यास तो शोधण्यास आणि तोडगा निघाला असेल तर.. अजून काही उपाय

शोधण्यास पाठवू.. (नाटकीपणे) पण.. पण त्यांना जावेच लागेल.. जावेच लागेल.. जावेच लागेल.. आम्ही शपथ वाहातो.. त्यांना आम्ही पाठवू.. पाठवू आणि पाठवूच..

महाराज: शाबास प्रधानजी. तुम्ही उपायांवर तोडगा काढलात..

प्रधानजी: नाही महाराज.. तोडग्यावर उपाय काढीत आहोत..

महाराज: छान.. तोडगा आणि उपाय..

प्रधानजी: एक अर्जी महाराज.. उपाय न मिळाल्यास तोडगा काढू अन तोडगा न मिळाल्यास उपाय..

महाराज: उपाय! शाबास.. त्याशिवाय तरणोपाय नाही आपल्याला.. आले का..**?**

प्रधानजी: कोण महाराज**?**

महाराज: तरणोपाय**?**

प्रधानजी: म्हणजे आम्ही समजलो नाही महाराज..

महाराज: नाही म्हणजे.. आपले मंत्री परत आलेत काय**?**

प्रधानजी: नाही महाराज.. प्रश्न मोठा.. प्रसंग बाका.. त्यांना काही वेळ द्यावा लागेल महाराज..

महाराज: लागू द्यात. वेळ लागला तरी चालेल.. पण त्यांना तत्काळ बोलावून घ्या. समयालोप करू नका.

प्रधानजी: क्षमा महाराज.. कसला लोप न करावा अशी आज्ञा आहे महाराजांची**?**

महाराज: वेळ.. वेळ जाण्यास वेळ लागत नाही.. तो जाईल व्यर्थ.. तेव्हा मंत्र्यांस संदेश धाडा.. जसे असाल तसे निघून यावे..

प्रधानजी: पण महाराज.. जो तोडगा ते शोधू पाहात आहेत

महाराज: तो नंतर.. आधी त्यांना आज्ञापत्र द्या. जसे असतील तसे यावे असा निरोप द्या.

प्रधानजी: जी महाराज..शिपाई.. जा. सांस्कृतिक मंत्र्यांना बोलावून आणा..

शिपाई: सांस्क्रूती मंत्री म्हंजी**?**

प्रधानजी: शिपाई.. अप्पासाहेब कोलदांडगे.. आज सकाळी आम्ही त्यांना धाडले कामगिरीवर.. त्यांना बोलावून आणा..

शिपाई: कोन परधानजी**?** सकाळी ग्येले त्ये लांब पगडी अन लाल मिशावाले..

प्रधानजी: लांब पगडी**?**

महाराज: लाल मिशा**?**

प्रधानजी: शिपाई.. तू चुकतोयस.. अशी चूक कुणाची होऊच कशी शकते**?** आम्ही कधीच चुकत नाही असे महाराज.. आणि आम्ही घाबरत नाही.. शिपायास सडेतोड सांगतो.. शिपाया चू तुकतोयस.. नाही तू चुकतोयस.. तर तेच लाल पगडीवाले..

शिपाई: जो हुकूम महाराज.. आता घेऊन येतो लाल पगडी वाल्यांस..

**(**शिपाई जातो)

महाराज: प्रधानजी आम्ही व्याकूळ झालो आहोत.. तुम्हाला वाटते की आम्ही परत हसू शकू**?** आमचा जीव हसण्यासाठी व्याकूळ आणि आतुर झाला आहे..

प्रधानजी: महाराजांनी हसण्यासाठी एवढे व्यथित होऊ नये.. आपले दु:ख समजू शकतो महाराज.. आपल्याला हसवण्याचे आटोकाट प्रयत्न आम्ही करू त्यासाठी कुणाला कितीही सायास का न पडोत.. की कुणीही किती..

**(**शिपाई एकाच वेळी तीन लाल पगडीवाल्यास घेऊन येतो..)

शिपाई: आपल्या हुक्माची ताडबतोब तामिली झाली म्हाराज.. आपण एक मागवले आनि म्या तीन तीन आनले.. घ्या नीट बगून.. हवा तो पगडीवाला घ्या अन नको त्यास सोडून येतो..

**(**पगडीवाल्यास पुढे आणतो..)

प्रधानजी: शिपाई.. हे काय..**?** हे कोणास धरून आणले तू**?**

शिपाई: न्हाई परधानजी.. अजाबात चूक व्हनार न्हाई या परतापाकड्नं.. लाल म्हंजी लालच पगडी.. हां ह्या तिसऱ्याची जरा विटलीय खरी.. पन.. लालच हाये

प्रधानजी: शिपाई.. चू तुकतोयस.. तू चुकतोयस.. मंत्री हवेत आम्हाला.. नुसती लाल पगडीवाले नाही.. त्या पगडीखालील मुंडक्यास लांब मिशा.. त्या कुठेत..

शिपाई: चूक झाली ..कबूल

प्रधानजी: मग जा आणि योग्य त्या माणसास घेऊन ये..

शिपाई: जाईल म्या.. पन म्या काय म्हनतो.. यातील एक पन न्हाई**?**

प्रधानजी: शिपाई..

शिपाई: बगा ना एकादा जमत असेल तर.. ॲडजस व्हत आसंल तर..

प्रधानजी: शिपाई.. लांब मिशा..**?**

शिपाई: हॅत्तिच्या.. त्यात काय्ये.. वाडतील की.. काय पगडीवाले.. वाडतील की न्हाई**?** आन अरजन आसल तर आपले त्ये हायत ना आरटिसट.. त्ये देतील चिटकवून.. म्या जाऊन बलावून आणतोया..जाऊ महाराज**?** म्हंजे हुकूम आसंल तर..

प्रधानजी: शिपाई.. नगास नग चालतो का**?** जा अजून राग आणू नकोस.. सांस्कृतिक मंत्री.. त्यांना घेऊन ये.. लक्षात ठेव.. लाल पगडी.. लांब मिशा..

शिपाई: व्हय.. पन ह्या तिघांचं काय करू**?**

प्रधानजी: आमच्या घरी पाठव..

शिपाई: चालेल परधानजी..पाठिवतो.. ओ पगडीबुवा.. चला.. परधानजींच्या घरला..मजाय ब्वा तुमची.. शाई पाहुणे म्हना..

प्रधानजी: शिपाई.. तू आज डोक्यावर पडला का रे**?** एकतर कोणालाही उचलून आणतो.. आणि आता घरी सोडतोय**?**

शिपाई: चूक जाली तर माफी.. पण सारे काही आज्ञेबरहुकूम.. आपणच म्हणाले..

प्रधानजी: शिपाई.. हा हुकूम आहे. या तिघांना सोडून द्या त्यांच्या घरी.. आणि सांस्कृतिक मंत्री..

शिपाई: आनतो म्हाराज.. लाल पगडी लांब मिशा.. आता न्हाई चुकनार..(जाता जाता) लांब पगडी.. लाल मिशा.. जातो म्या.. हा गेलो न हा आलो..पाठ करतच जातो म्हंजे चूक व्हायला नको.. लांब तंगडी लाल मिशा.. लांब लंगडी लाल मिशा.. न्हाई.. लाल लंगडी लाल मिशा.. ह्येच..लाल लुगडी.. न्हाय बाप्या मानूस.. लुगडं न्हाय.. हां लांब लंगडी लांब मिशा.. लाल लंगडी लांब मिशा..

(जातो. पाठोपाठ तिघे पगडीवालेही जातात)

महाराज: प्रधानजी, ह्या शिपायास कुठून शोधून काढलेत? रत्न आहे..

प्रधानजी: होय महाराज.. आमच्याच गावाकडचा आहे महाराज..

महाराज: आता हा आणखी कुणास उचलून आणेल?

प्रधानजी: काळजी नसावी महाराज.. लाल पगडी आणि लांब मिशावाले राज्यात एकमेवच असणार.. त्यामुळे चूक नको व्हायला.. येईलच तो इतक्यात.. तसा हुशार आहे..

महाराज: ते दिसलेच.. हुशारीचे तेज तळपले त्याच्या चेहऱ्यावर.. आता जोवर येत नाहीत तोवर काही खरं नाही.. प्रधानजी.. एक सांगा.. आपला खरा प्रश्न कोणता होता.. विसरलो आम्ही..

प्रधानजी: महाराज, हसण्याचा..

महाराज: हां.. हसणे. या हसण्याने रडवले आम्हाला..

प्रधानजी: होय महाराज.. नाही महाराज.. असे नाही होऊ देणार आम्ही. जिवात जीव असेतोवर नाही..

महाराज: आम्हास येथे अजून बसणे नाही. आम्ही हसण्यावाचून नाही बसू शकत. आम्ही महालात जातो. राणीसरकारांशी चार शब्द बोलतो. म्हणजे जरा बरे वाटेल..

(महाराज निघून जातात)

(शिपाई आत येतो. त्याच्याबरोबर एक विदूषक आहे. लांब विदूषकी टोपी आणि लाल मिशा आहेत. नाकावर लाल चेंडू आणि कपडे रंगीबेरंगी आहेत. त्यात त्याची तुमानही लालभडक आहे.)

शिपाई: परधानजी.. आनलं की न्हाई.. लाल तंगडी लाल मिशा.. हाय की न्हाई.. येत नव्हता.. म्हनलं राजाचा हुकूम हाये.. तवा कुटं तंबू सोडून आला.. पा हाय ना बरोबर.. असनारच.. या परतापाचे काम..चोख.

प्रधानजी: शिपाई.. परताप.. आणि त्याचे प्रताप..

शिपाई: व्हय व्हय.. आनलं की न्हाई.. नीट पाहून घ्यावा.. नंतर म्हनाल बरोबर न्हाई..

प्रधानजी: शिपाई.. हे काय.. कोणास उचलून आणले? अरे हा काय तुला आमच्या सांस्कृतिक मंत्र्यांसारखा दिसतोय? बरं झाले महाराज नाहीत इथे.. नाही महाराजांनी पाहिले तर..

शिपाई: बघतील.. म्हाराज खूश होतील.. परतापाचं कामच असं..

प्रधानजी: परताप.. तू डोक्याला ताप .. देऊ नकोस..

शिपाई: परधानजी.. हे काय.. उगा रागावू नका.. माला सांगितलेले कामच केलं ना..

(सांस्कृतिक मंत्री घाईघाईत आत शिरतात. वर अंगरखा.. खाली अर्धी चड्डी.. एका पायात मोजा.. दुसऱ्यात बूट. असल्या अवतारात.. )

सांस्कृतिक मंत्री: महाराजांनी तातडीने बोलावल्याचे कळले म्हणून हातचे काम सोडून आलो..

प्रधानजी: ते दिसतेय.. आणि कामच नाही.. अजूनही काही सोडून आलात तुम्ही..

(मंत्री खाली वाकून बघतात.. )

सांस्कृतिक मंत्री: अरेच्चा.. खरंच की.. महाराजांनी बोलावले म्हटले नि मी तस्सा निघून आलो..

प्रधानजी: तस्सा की अस्सा?

शिपाई: पहा परधानजी.. यापेक्षा माजावाला काय वाईट आहे?

सांस्कृतिक मंत्री: महाराज येतील तोवर आम्ही जरा अवतार सुधारून येतो प्रधानजी..

(मंत्री निघून जातात)

शिपाई: पन एक खरं परधानजी.. लाल टोपी अन लाल.. न्हाई लांब मिशा अगदी याच्यावानी..

(महाराज आतून बाहेर येतात..)

महाराज: प्रधानजी.. शिपाई आला म्हणजे मंत्री आले असणार.. कोठे आहेत.. आम्हाला हसावयाचे आहे.. आजचे हासू अजून बाकी आणि त्याशिवाय पुढचा राज्यकारभार कसा करणार आम्ही..

प्रधानजी: आले आहेत महाराज.. काही क्षणात येतील..

महाराज: कोठे दिसत नाहीत..

(तेवढ्यात लक्ष विदुषकाकडे जाते.. )

महाराज: हा कोण? कोण रे तू? बाकी कपडे मस्त आहेत तुझे.. कोण तू?

विदूषक: (विदुषकी चाळे करत)

आम्ही कोण म्हणून काय पुसता..

आम्ही असू लाडके..

इतरांना आवडो भाजी कुठलीही

आम्हा आवडे दोडके..

इतरांनी पहावे नजरेने कौतुके

(टोपी काढत)

म्हणूनी असे बोडके

आम्ही परंतु असू असे की

(दात दाखवत)

दंत असे पडके

कारण असे जाहले की आमुचे

वज्रदंत असत किडके

म्हणतो हे स्वरचित काव्य ते

जरी तोडके मोडके

(विदूषक उड्या मारत सुटतो.. धरपडत उठतो.. त्याचे चाळे सुरू राहतात. दरबारी आपले हसू दाबत गप्प राहतात. मग एकाएकी महाराज हसत सुटतात.. विदूषक आपले चाळे सुरू ठेवतो.. )

महाराज: वा! मजा आला.. सुंदर.. आम्ही खूश झालो.. आणि आज प्रथमच हसलो.. वा! हसलो आम्ही.. हसलो.. वा!

प्रधानजी.. प्रश्न सुटला.. कोठून आला हा येथे?

शिपाई: म्या आनलाय म्हाराज.. सोता.. येत नव्हता.. म्हनलं म्हाराजांनी बलिवलंय..

महाराज: वा! शिपाई.. छान कामगिरी.. (आपल्या गळयातील माळ त्याला देत) ही तुझी बक्षिसी.. वा!

(प्रधानजींकडे खुन्नसने पाहात माळ घेतो..सांस्कृतिक मंत्री आत येतात.. आता सुधारित अवतारात.. समोर विदुषकास पाहून चक्रावतात)

सांस्कृतिक मंत्री: आम्ही आलो महाराज.. तातडीने.. आणि हा कोण महाराज?

महाराज: हे आमचे नवीन मंत्री आहेत.. प्रधानजी..

प्रधानजी: जी हुजूर

महाराज: आजपासून यास आमच्या पदरी रुजू करून घ्या. हा विदूषक आमचा हास्यमंत्री.. आम्ही खूप खूश आहोत.. आता हवा तेव्हा.. हवा तितका.. हवा तसा आणि हवा तेथे.. हास्यरस.. हास्यरसोत्पादनात आमचे राज्य आता अजून पुढे जाणार.. आम्ही हास्यास्पद होण्याचे आमचे स्वप्न साकारणार.. प्रधानजी.. याच्या नावाची घोषणा रीतसर करालच.. आज्ञापत्र निघेलच.. तोवर आज आम्ही हास्यरसात चिंब भिजू इच्छितो.. विदुषका.. नाही.. हास्य मंत्री..

विदूषक: जी महाराज..

महाराज: आज आत्ता येथे आम्हाला हसवावे..

विदूषक: आज्ञा हुजूर..

(विदूषक आपले चाळे पुन्हा सुरू करतो. आधी विदुषकी चाळे पाहताना चिडीचुप असलेला दरबार महाराजांबरोबर हसण्यात बुडून जातो..)

विदूषक:

आम्ही कोण म्हणून काय पुसता
दाताड वेंगाडूनी
आम्ही असो हास्य मंत्री राज्याचे
ऐकून घ्या हो झणी
उलटे उठूनी चालू उल्टे आम्ही
सदा ते शीर्षासनी
डोईवर नसती कसे केस ते
न लागे कंगवा फणी
घोड्यापुढे धावतसे अक्कल ती
शंका नको ती मनी
टोपी खाली दडले असे काय ते
जाणून घ्यावे झणी
एक विदूषक असे इथे तो
हास्यरस मेरूमणी
...
एक विदूषक असे इथे तो

हास्यरस मेरूमणी..

(विदूषक पुढे काही न सुचून अडखळतो.. त्याच ओळी परत म्हणत राहतो.. एकाएकी महाराज उठून उभे राहत ओळ पुरी करतात)

महाराज:

असता मंत्री ते असले विदूषक

आम्ही हास्यरसात होऊ अग्रणी




# ७ गंभीरसेन महाराजांचा गंभीरपुर दरबार!

स्थळ: गंभीरसेन महाराजांचा दरबार..

दरबारात घोषणा..

शिपाई: होशियार.. कदरदान.. मेहेरबान.. प्रधानजी (पुढे येत): काय रे संतोक सिंग.. जुने दिवस विसरला नाहीस अजून.. महाराजांच्या पदरी लागून पंधरा दिवस झाले.. अजून तेच डोंबाऱ्याचे खेळ..

संतोकसिंग: क्षमा प्रधानजी..

(परत घोषणा करू लागतो..)

राजाधिराज गंभीरपुर सम्राट.. प्रगती सुसाट..धन अफाट.. राजा मोकाट.. राज्य विराट.. महाराज गंभीरसेन आपल्या भंगीर.. नाही.. गंभीर मुखलकमासह.. नाही.. मुखकमलासह येत आहेत.. येत आहेत.. येत आहेत. समस्त दरबाऱ्यांनी आपापल्या मुखावर गंभीर भाव आणावे आणि चेहऱ्यावरचे हासू नाहीसे करावे हो.. महाराजांचा त्रिवार जयजयकार असो. बोला गंभीरपुर सम्राट की जय.. गंभीरसेन महाराज की जय. सर्वांनी आपापले चेहरे लांब करून बसावेत हो.. न केल्यास आमचे शिपाई ते लंबे करतील हो.. लांब तोंडाने गंभीरसेन महाराजांचा गंभीर जय असो.. विजय असो.. जय असो.. विजय असो..

(महाराज येतात. बसतात. सारे दरबारी एकदम गंभीर तोंड करून बसतात.)

महाराज: वा! नवीन घोषणा! छान आहे ही. आणि सर्वांचे लांब चेहरे पाहिले की जीव सुखावतो. ज्याचे तोंड लांब त्यास दुनिया करी सलांब.. नाही सलाम. सारे जगत

दु:खाने पीडित असताना राजाने सदा गंभीरच रहावयास हवे. यथा राजा तथा प्रजा. तर राजा गंभीर तर प्रजाही गंभीर.

प्रधानजी: आपले म्हणणे सत्य आहे खाविंद

महाराज: हे कोण आलेत नवीन प्रधानजी?

प्रधानजी: खाविंद म्हणजे आपणच महाराज. शेजारील सुलतानपुरातील राजास दरबारी खाविंद म्हणतात असे ऐकून आहोत. म्हणून आम्ही आपणास ही तेच संबोधन वापरत आहोत.

महाराज: छान. शब्द चांगला आहे आणि गंभीर देखील. खाविंद.. खाविंद गंभीरसेन महाराज.. आम्ही आज खूपच गंभीर आहोत. दरबाराची कारवाई सुरू करा प्रधानजी..

प्रधानजी: हुकूम महाराज..

(शिपाई आत येतो..)

शिपाई: तुम्ही मला बोलावलेत का?

प्रधानजी: तू? तुला भास झाला काय?

शिपाई: नाही.. हुकूम नाव आहे माझे.

प्रधानजी: असेल.. पण राजांचा हुकूम..

शिपाई: मीच. राजांच्या चरणी.. हुकूम..

महाराज: हुकूम..

शिपाई: जी महाराज..

महाराज: तू हुकूम नाही.. प्रधानजी.. हुकूम..

शिपाई: नाही महाराज.. प्रधानजी श्री. एकवीरचंद.. हुकूमचंद मी नाचीज.. मी हुकूम..

महाराज: शिपाई हुकूम.. आमचा हुकूम..

शिपाई: धन्य महाराज.. आपण मला आपले म्हणालात.. आपला हुकूम म्हणालात.. धन्य..

महाराज: प्रधानजी..

प्रधानजी: हुकूम..

शिपाई: जी प्रधानजी..

महाराज: शिपाई..

शिपाई: हुकूम महाराज..

प्रधानजी: महाराज.. हुकुमास आवरावे महाराज..

शिपाई: काही गलती झाली असल्यास माफी करावी महाराज..

महाराज: आमचा हुकूम आहे की या हुकुमास आमच्या हुकुमाबर हुकूम आमच्या महालाबाहेर पहाऱ्यास ठेऊ नये.

प्रधानजी: जो हुकूम

शिपाई: जी महाराज..

प्रधानजी: महाराज.. आपल्या बोलण्यातून जोवर हुकूम येत राहिल तोवर शिपाई ऐकणार नाही

शिपाई: जी प्रधानजी

महाराज: प्रधानजी आमचा हुकू.. नाही आमची आज्ञा आहे.. शिपाई हुकूम याची बदली आमच्या महालापासून दूरवर करावी

प्रधानजी: हुकू.. नाही आज्ञा महाराज.. शिपाई हुकूमचंद तुझी बदली होत आहे..दुसऱ्या शिपायास येथे नेमतो आम्ही.. आत जावे आणि आमच्या कार्यालयात हुकुमाची वाट पहावी

शिपाई: जो हुकूम.. हा हुकूम आपल्या हुकुमाची वाट पाहिल..

(शिपाई जातो)

महाराज: या हुकुमाने चांगलाच गोंधळ घातला प्रधानजी

प्रधानजी: जी हुजूर..

महाराज: पुढील कामकाज सुरू करावे

प्रधानजी (आजूबाजूला शिपाई नाही हे पाहात): हुकूम महाराज.. सर्व प्रथम महाराज आपल्या राज्यातून पकडल्या गेलेल्या तीन गुन्हेगारांबद्दल..

महाराज: देऊन टाका कैदेची शिक्षा.. असा काय गुन्हा केलाय त्यांनी?

प्रधानजी(नाटकीपणे): आम्ही सांगू नये आणि आपण ऐकू नये.. हे सांगण्याआधी आमची जीभ का नाही झडली?

महाराज: एवढा कसला गंभीर गुन्हा घडला आहे?

प्रधानजी(नाटकीपणे): काय सांगावे महाराज.. हे तिघे.. छे बोलवत नाही..

महाराज(तितक्याच नाटकीपणे): तुम्हाला बोलावेच लागेल प्रधानजी.. बोलावेच लागेल. आणि हे जे काही हलाहल असेल ते आम्ही पचवू त्या नीलकंठाप्रमाणे..

प्रधानजी: आपण आपल्या राज्यावरील संकटाचा निकराने मुकाबला कराल महाराज.. हे सारी रयत जाणून आहे. तेव्हा.. छे छे.. सांगवत नाही आम्हाला.. तरीही सांगतो महाराज.. यातील दोघे.. एकमेकांना हसवीत होते आणि तिसरा.. टाळ्या देत होता त्यांना..

महाराज: या गंभीरसेन महाराजांच्या राज्यात कुणी हसणारे सापडले?

प्रधानजी: होय महाराज.. नाही नाही महाराज.. शिव शिव

एक शिपाई (आतून येत): जी हुजूर.. तुम्ही बोलावलेत मला?

प्रधानजी: नाही..

शिपाई: नाही.. मलाच मारलीत तुम्ही हाक.. मी शिवराम.. सारे मला शिव म्हणतात.

प्रधानजी: अजून काही गोंधळ होण्याआधी.. ऐक, मी तुला बोलावले नव्हते..

शिपाई: असं कसं प्रधानजी. हे कान.. आपला हुकूम..

प्रधानजी: हुकूम नको.. नाही.. हवं तर आज्ञा म्हण.. नाही.. आज्ञाच म्हण.. हा माझा हुकूम.. नाही माझी आज्ञा आहे..

शिपाई: जो हुकूम.. नाही .. जो आज्ञा.. आपण या गुलामास हाक मारलीत आणि हा गुलाम हजर

महाराज: हे काय होत आहे इकडे? प्रधानजी.. हे काय होत आहे? आमच्या दरबारात असे काय होत आहे की हुकूम आणि पाठोपाठ हा शिव यावा? तुम्हाला काही कल्पना?

प्रधानजी: नाही महाराज.. हे असं का व्हावे.. आम्ही काय सांगू.. रामा शिवा गोविंदा.. आणि काय!

दुसरा शिपाई (आत येत): आपण बोलावलेत महाराज. बंदा हजर आहे. आपण फक्त हुकूम करावा

प्रधानजी: तू कोण..?

शिपाई: आपणच बोलावलेत मला? ते रामा.. शिवा..

प्रधानजी: रामा? शिवा नाही.. तो तर इथेच आहे.. की गोविंदा?

शिपाई: हजर.. मी गो गो गो म्हणजे गोविंदा गोपाल गोविलकर.. निम्नतम देखभाल शिपाई.. महाल लाकडी दरवाजे सुरक्षा आणि देखरेख फ दक्षिणपूर्व विभाग.

प्रधानजी: छान! हुकुमापाठोपाठ शिवा आला गोविंदरावांस घेऊन..

महाराज: अरे हे काय चाललेय येथे.. गंभीरसेन महाराजांच्या दरबाराचे गांभीर्य कुठे हरवत चाललेय.. आम्ही आता फक्त गंभीर चेहऱ्याने नाही तर अतिगंभीर चेहऱ्याने बसणार आहोत.. गंभीर.. अतिगंभीर..

प्रधानजी: अतिगंभीर.. तरी बरे रामा नाही आला.. नाहीतर..

गोविंदा: म्हणावे लागले असते.. अरे रामा?

तिसरा शिपाई (आत येत): आपण बोलावलेत महाराज? सेवक आपल्या चरणी हजर आहे.

प्रधानजी: म्हणजे तू रामा?

शिपाई: होय हुजूर.. मी रामा शिवराम गोंदवलेकर. ज्येष्ठ शिपाई, दरबार विभाग, पाणी खाते, नळ ठोकणी जोडणी अन तपासणी य पूर्वोत्तर विभाग

प्रधानजी: ठीक.. तू जा. आणि पाणी खात्यात लक्ष दे..

शिपाई: हुकूम हुजूर..

(शिपाई जातो)

महाराज: प्रधानजी.. हे चांगले झाले.. या रामाची बोळवण थोडक्यात झाली. दरबाराच्या कामाकडे लक्ष देऊ..

प्रधानजी: जो हुकूम.. नाही आज्ञा महाराज: पण या समस्येवर तोडगा काढावयास हवा. अशाने दरबारात गांभीर्याचा अभाव जाणवतो. आमच्या नजरेतून काही हसणारे दरबारी सुटले नाहीत.. प्रत्यक्ष आम्हास ही काही वेळेस हसू येते की काय अशी भीती वाटली होती. तेव्हा ही समस्या सोडवलीच पाहिजे.. ती सुद्धा युद्ध पातळीवर.. अशा विनोदी समस्यांवर आपला विनोदी विदूषकच उतारा देईल प्रधानजी.

प्रधानजी: जी महाराज.. शिपाई.. गोविंदा..

(गोविंदा उत्तर न देताच उभा राहतो)

प्रधानजी: गोविंदा.. लक्ष कुठे आहे. आम्ही हाक मारली तुला.. कुठे आहे लक्ष?

गोविंदा: हुजूर.. सदा दक्ष.. ऐकली हाक  हुजूर पण खात्री नव्हती.. आपण मलाच बोलावलेत की..

प्रधानजी: व्यर्थ बडबड नको.. जा.. विदूषकास बोलावून आण.. तात्काळ!

गोविंदा: आज्ञा हुजूर..

(गोविंदा जातो)

महाराज: प्रधानजी तुमच्या विचारात या समस्येवर काही तोडगा?

प्रधानजी (दोन्ही हातांनी खसाखसा डोके खाजवीत):  आम्ही विचार करीतच आहोत महाराज..

महाराज: आपला विदूषक नक्कीच काढेल उपाय..

(विदूषक येतो.

दिसायला विदुषकासारखाच. डोक्यावर लांब टोपी आणि नाकावर लाल चेंडू.. अंगात रंगीबेरंगी कपडे. पायात उलट्या चपला!)

विदूषक: महाराजांनी माझी आठवण काढावी अशी कोणती समस्या आहे महाराज?

महाराज: प्रधानजी तुम्ही विदुषकास सारे काही समजावून सांगा.. आम्ही तोवर निवांत बसतो..

प्रधानजी: आज्ञा हुजूर..

(प्रधानजी आणि विदूषक बोलत उभे राहतात.. गाण्याची रेकॉर्ड फास्ट फॉरवर्ड व्हावी तसा आवाज काही काळ येत राहातो.)

विदूषक: समस्या कळली महाराज. आणि त्यावर उपायही सापडला आहे.. हुकूम असल्यास कथन करतो.

महाराज: अर्थातच. आम्हाला या समस्येस येथेच संपवायचे आहे. कारण त्यामुळे आमच्या गांभीर्यास बाधा येत आहे.

विदूषक: जी हुजूर. या प्रश्नाचे उत्तर आहे बदल.

महाराज: बदल? काय बदलावे?

विदूषक: नाव! आतापर्यंत ज्याच्या ज्याच्या नावाने गोंधळ झाला त्या सगळयांचा नाव बदल.

प्रधानजी: म्हणजे हुकूम यापुढे हुकूम राहणार नाही? म्हणजे महाराजांच्या हुकुमाबद्दल नाही.. हुकुमचंदाबद्दल बोलत आहोत आम्ही

विदूषक: होय.. पण अजून एक बारीकशी सूचना आहे महाराज. नाव बदलताना फक्त अक्षरे उलटपालट करावीत. म्हणजे हुकूमचंद यापुढे कुहूमचंद.. शिवराम होईल विशराम.. गोविंदा होईल दोविंगा वगैरे. म्हणजे त्यांना त्यांची मूळ ओळखही विसरावयास होणार नाही आणि यापुढे आपण हुकूम शब्द उच्चारलात तर तो आपल्या हाकेस उगीच ओ देणार नाही!

महाराज: वा! नामी कल्पना नामकरणाची. प्रधानजी तत्काळ करून टाका अंमलबजावणी..

प्रधानजी: हुकूम महाराज.. आम्ही आताच आदेश काढून त्या साऱ्यांची बदलून टाकतो नावे. ना राहिल हुकूमचंद नि ना राहतील रामा शिवा गोविंदा!

विदूषक: समस्येवर उपाय महाराजांच्या पसंतीस पडला याबद्दल आभार महाराज. मी सर्कस सोडून आलो. आता जाऊ शकतो?

महाराज: थांबावे काही क्षण विदुषका. तर प्रधानजी आता सारे काही पूर्ववत धीरगंभीर होईल. यापुढेही असे काही नजरेस आल्यास त्यांचेही नाव बदल करून टाका तात्काळ.

प्रधानजी: होय महाराज.. त्यामुळे दरबार गंभीर नव्हे तर अतिगंभीर होईल महाराज

महाराज: अतिगंभीर आणि उग्र

(राजकुमार आत येतात)

राजकुमार: आज आमची आठवण आली दरबारात.. पिताजी या राजकुमार उग्रसेनाची याद का काढलीत?

(प्रधानजी महाराजांकडे पाहात गप्प बसतात)

महाराज: युवराज.. आलात.. यावे. पण तुमची आठवण काढली असे कोणी सांगितले तुम्हाला?

प्रधानजी: आम्ही सांगतो महाराज.. ते गंभीर आणि उग्र म्हणालात ना आपण..

महाराज: खरेच आहे प्रधानजी.. आपल्या दरबारात हे आज असे काय होत आहे? आधी हुकूम मग तो शिव.. गोविंदा आणि आता खुद्द उग्रसेन युवराज!

प्रधानजी: पण या समस्येवर तोडगा तर निघाला आहे महाराज..

ऊग्रसेन: कोणती समस्या पिताजी?

प्रधानजी: नामकरण.. नाव बदलीकरण..

उग्रसेन: कोणाचे महाराज?

महाराज: नाही.. हे होणे नाही..युवराज उग्रसेन.. नव्हे गूरूउसेन? नाही..

उग्रसेन: कशाबद्दल महाराज? आणि आमच्या नावाच्या तोडफोडीबद्दल..

महाराज: विदुषका.. नाही.. हे असे होणे नाही..

विदूषक: नियमास अपवादही असतात महाराज! सामान्यातिसामान्यांस लागू होणारा सामान्य नियम असामान्य युवराजांस सामान्यत: लागू होऊ नये महाराज..

महाराज: असे म्हणता? पण परत तोच प्रश्न.. आम्ही कुठे उग्र शब्द उच्चारला की..

विदूषक: या प्रश्नास भाषासुधाराचे उत्तर आहे महाराज.

महाराज: वा विदुषका.. सार्‍या समस्यांवर उपाय आहे तुझ्याकडे! बोल..

विदूषक: महाराज.. उग्र हा शब्दच आपल्या राज्यातील शब्दकोशातून बाद करावा. उग्र शब्द फक्त युवराज उग्रसेनांस पुकारण्यास राखीव ठेवावा म्हणजे आपले काम सोपे होईल.

प्रधानजी: नामी तोडगा विदुषका!

महाराज: खरंय.. आम्हाला विदुषकाचा अभिमान वाटतो..

प्रधानजी: आम्ही असा शासन आदेश काढून टाकतो तात्काळ महाराज.

महाराज: शुभस्य शीघ्रम प्रधानजी..

प्रधानजी: हुकूम महाराज.. आम्ही तात्काळ काढतो तसे आदेश..

महाराज: आज आम्हास खूपच बरे वाटत आहे. कारण युवराज ही उपस्थित आहेत. आणि प्रत्यक्ष राज्यकारभाराचे धडे घेत आहेत.

प्रधानजी: होय महाराज

महाराज: स्वतःच्या डोळयांसमोर युवराजांनी पाहिला तो राज्यकारभार.. तातडीने निर्णय आणि तातडीने अंमलबजावणी. नामबदल.. नामकरण.. शब्दबंदी.. राखीव नाम.. युवराज.. यांस म्हणतात धडाडीचा राज्यकारभार आणि तुमच्या डोळयांदेखत झाल्या त्यास म्हणतात प्रशासकीय सुधारणा..

उग्रसेन: होय पिताजी. आम्ही हे ध्यानात ठेवू.. आता आम्ही मृगयेस जाऊ**?**

महाराज: अर्थात.. हेच वय तुमचे बागडायचे.. नंतर आहेच.. हा राज्यकारभाराचा पसारा

प्रधानजी: होय महाराज.. युवराजांनी निघावे.. युवराजांच्या मृगयेचे ही आम्ही काढून टाकू आदेश..

महाराज: अर्थात प्रधानजी. ते ही तातडीने!



# ८ महाराज गीतशरण यांचा दरबार

(पाठून एक टेप वाजते..)

कवितेच्या प्रकारात महाराज येण्याची घोषणा..

पाठून त्यात संगीतही आहे..

ऐका हो ऐका

ऐका देऊन दोन्ही कान

येती महाराज आपले

दरबाऱ्यांनो ठेवा मान..

आले हो आले

महाराज आले

हालत डुलत

महाराज आले

गीतशरण महाराज

दरबारी आले

दरबारी सारे

आज धन्य झाले

अदब बा मुलाहिजा

रहा उभे सारे

दर्शन महाराजांचे

धन्य धन्य व्हा रे

सारे सारे रहा रे

सावधान एकजात

वाका वाका रे सारे

करा रे कुर्निसात

राजाधिराज महाराज श्री गीतशरण महाराज यांचा विजय असो. विजय असो विजय असो.

(महाराज येतात. हाती त्यांच्या एक मोबाईल आहे. त्याचा इयरफोन कानात आहे.. गाणे ऐकल्यासारखे महाराज डुलत आहेत. मध्येच हाताने चुटकी वाजवतात. मध्येच तान

घेतल्यासारखे हात हलवतात. दोन चार गाण्यांच्या ओळी गातात.. आणि ते करता करता सिंहासनावर बसतात. थोडावेळ बसून राहतात. कोणाकडे लक्ष न देता. प्रधानजी बोलण्याचा प्रयत्न करतात पण महाराज ऐकत नाहीत.. आपल्यातच मग्न आहेत. स्वतःशीच गुणगुणत राहतात.

कानातले इयर फोन घालून बसतात नि एकाएकी..)

प्रधानजी.. दरबारात कामकाज अजून का सुरू झाले नाही?

(प्रधानजी उत्तर देण्यासाठी बोलतात पण महाराजांच्या कानातील बोंडकांमुळे त्यांना काही ऐकू येत नाही.

एकाएकी महाराज मोठ्याने ओरडल्यासारखे बोलू लागतात. )

महाराज: प्रधानजी, आम्ही काही विचारले.. दरबाराचे कामकाज का सुरू झाले नाही अजून? आम्ही येऊन घटका झाल्या.. पण कशाला कशाचा पत्ता नाही. आम्ही आल्याची घोषणाही नाही.. हे आज काय घडते आहे या दरबारात?

(प्रधानजी बोलतात पण महाराजांना ऐकू जात नाही.)

महाराज: हे काय प्रधानजी.. नुसतेच ओठ हलवता आहात? बोलणार कोण? की आज नुसताच गप्प बसण्याचा दिवस आहे? सिनेमात असते तसे.. पार्श्वगायन..? (गाऊ लागतात)

नाही मी बोलत नाथा.. नाही मी बोलत.. विनयहीन वदता का.. नाथा.. नाही मी बोलत..नाथा..

(प्रधानजी परत बोलतात ते अर्थातच महाराज ऐकू शकत नाहीत.. महाराजांच्या कानातील इयरफोन काढायला सांगणार कोण? सारे जे होईल ते पाहू लागतात.)

महाराज: आज सारे कसे शांत शांत.. सा़ऱ्या दुनियेत आज शांतता नांदेल! अलमदुनियेत अमनचा अमल! आणि आम्ही असू शांतीदूत.. ( प्रार्थनेच्या सुरात गाऊ लागतात )

भवसागर तरून जावो

गीतशरण बहरून येवो

शांतीचा अंमल राहो

शांतीसागर गीतदेश होवो..

हे आम्ही असे सांगितले

सांगूनच नाही थमले

शांतीचा मंत्र जपा हो

शांतीसागर गीतदेश होवो..

असो आम्ही दूत शांतीचे

असू आम्ही दूत क्रांतीचे

हे साम्राज्य असो गीताचे

दुमदुमे नाव गीतशरणाचे..

तर प्रधानजी.. काय हालहवाल?

प्रधानजी: उत्तम महाराज.. सारे काही क्षेम..

महाराज: प्रधानजी इतकीही शांती नको की आम्हास काही ऐकूच येऊ नये.. आपण नुसतेच ओठ हलवीत आहात

प्रधानजी: नाही महाराज.. आम्ही बोलत आहोत..

महाराज: खामोश! नाही नाही.. खामोश नाही.. बोला.. जोरात बोला.. हे पार्श्वगायन बस.. शांती असावी पण इतकी? मोठ्याने बोलावे..

(शिपायाकडून माईक घेत प्रधानजी बोलू लागतात. म्हणजे माईकमध्येच ओरडू लागतात..)

प्रधानजी: हे राज्य आपल्या कृपेने व्यवस्थित सुरू आहे महाराज.. सारे काही आलबेल.. आणि..

(त्यांच्या उच्चरवाने सगळयांच्या कानठळया बसू लागतात. सगळे कानात बोटे घालून बसतात.. महाराजांच्या कानी अंधुकसा आवाज येतो. महाराज कानाकडे हात नेतात. कानातले इयरफोन काढताच त्यांच्या कानी हा कर्कश्श आवाज पडतो. महाराज वैतागतात..)

महाराज: प्रधानजी.. खामोश.. आता खरेच शामोश! बोलावे म्हटले म्हणून अशा आवाजात.. कोलाहल.. कर्कश्श.. गोंधळ.. भणभणून जावे डोके.. शांतीदूत आम्ही.. शांतीसुत आम्ही.. आमचे पिताजी महाराज शांतीसागर यांच्या आत्म्यास या आवाजाने किती क्लेष होतील काही कल्पना आहे?

प्रधानजी: माफी असावी पण आपल्या कानी काही कुणकुण आली ती कुजबुज नव्हती तर आमच्या या ध्वनिवर्धकाचा ध्वनी होता. आपण महाराज कर्णतुकडे घालून बसल्यामुळे..

महाराज: तुकडे? शिव शिव.. हे ऐकण्याआधी आमच्या कानांचे का नाही झाले तुकडे?

प्रधानजी: त्यांस इयरपीस असेही म्हणतात महाराज.. म्हणजे कर्णतुकडेच नव्हेत का? महाराजांच्या कानातील त्या तुकड्यांमुळे..

महाराज: ( गाऊ लागतात )

खामोश..

तुम्ही खरगोश

एहसान फरामोश..

या कानीचे भूषण

हे कर्ण तुकडे

या कानीचे आभूषण

हे कर्ण तुकडे

का बोल तुम्ही

लाविता झणी

इकडे आणि तिकडे

गीतशरणाच्या हृदयीचा

ऐका कुणी आक्रोश..

खामोश..

खामोश.. तुम्ही खामोश.. !

गीत गीत

गात आम्ही

या राज्याचे

संगीत आम्ही

गीतशरणम.. आम्ही

संगीतशरणम ..आम्ही

का असले बोल लावीत

करता असा आक्रोश..

गीतशरणाच्या हृदयीचा

ऐका कुणी आक्रोश..

खामोश..

खामोश.. तुम्ही खामोश..

प्रधानजी: माफी असावी महाराज. पण आपल्या कर्णतुकड्यातून आमचे बोलणे तुम्हाला ऐकू येत नसावे म्हणून..

महाराज:

खामोश..

तुम्ही खामोश..

कुणी दिसे न

आम्हा तानसेन

गीतशरण आम्ही

का न व्हावे

मुळी कानसेन..

तृप्त पर्ण तृप्त कर्ण

नको कुणाचा आक्रोश

कुणी आमचे ऐकूनिया

होऊ आम्ही बेहोष

खामोश..

तुम्ही खामोश

(दरबारी टाळ्या वाजवत गाणे म्हणू लागतात.. अर्थ लक्षात न घेता.. 'खामोश.. तुम्ही खामोश..' एकाएकी संगीत बंद होऊन एक क्षण एकदम शांतता पसरते.

सारे दरबारी टाळ्या वाजवतात.)

महाराज ( गात ):

प्रधानजी दरबाराचा करावा सुरू कारभार..

गीतशरण राजाचा सुरू करा दरबार..

काय जाहले राज्यामध्ये

अन होईल ते काय..

काय करावे आणि पुढे

कसे हलवीता हातपाय..

कसे होईल काय होईल

**कसे ऐकू येईल गान**

**गीत संगीत श्रवण कराया**

**असती आतुरलेले कान..**

**प्रधानजी: महाराज.. आपली इच्छा पूर्ती करण्यास आम्ही आणले आहेत..**

**महाराज: कोणास .. खुद्द संगीतसम्राट तानसेन?**

**प्रधानजी: नव्हे.. गानसेन.. महाराज संगीतभूषण गानसेन..**

**महाराज: अहाहा! म्हणजे आमची इच्छा पूर्ण झाली म्हणायची.. तात्काळ बोलवावे त्यांना..**

**आतुर आम्ही..**

**कातर आम्ही..**

**का तर ऐकण्या**

**आतुर आम्ही..**

**(गानसेन येऊन उभा राहतो. दिसायला कॉलेजतरूणासारखा. एखाद्या गायकासारखा वेश नाही. अंगात टी शर्ट आणि जीन्स. हातात गिटार खांद्यावर पकडलेली. पाठीवर बॅग. येऊन वाकून नमस्कार करतो.)**

**गानसेन: हैल गानशरण महाराज..**

**महाराज: अरे.. हा कोणती भाषा बोलतोय? हैल म्हणजे काय प्रधानजी?**

**प्रधानजी: आंग्ल भाषा विभूषित आहेत गानसेन.**

**महाराज: आंग्ल? अशीही काही असते भाषा?**

**प्रधानजी: होय महाराज.. प्रसिद्ध भाषा आहे ती..**

**महाराज: असेल.. तर संगीतसम्राट गानसेन.. कुठे मिळाली ही उपाधी तुला?**

**गानसेन: उपादी? व्हॉट्स उपादी?**

**प्रधानजी: अरे.. दी नव्हे.. धी..**

**शिक्षणमंत्री: थांबावे महाराज .. आपली आज्ञा असल्यास आम्ही सांगतो त्यास.. आम्हाला ती भाषा अवगत आहे.**

**महाराज: सांगावे शिक्षणमंत्री.. बोलावे..**

**शिक्षणमंत्री: धन्यवाद महाराज.. तर गानसेना.. उपाधी मीन्स डिग्री.. म्हणजे तानसेन संगीतसम्राट.. तसा तू कसा बनलास?**

**गानसेन: नो नो नो.. उपाधी नाही काही तशी.. आणि नो संगीतसम्राट.. ॲम संगीत भूषण..**

**शिक्षणमंत्री: वा! प्रेमाने दिली असणार ही पदवी तुला..**

**गानसेन: प्रेम? यू मीन लव्ह?  व्हॉट हॅज दॅट टू डू विथ पदवी?**

**शिक्षणमंत्री: म्हणजे?**

**गानसेन: रीतसर मिळाली ती मला.. म्हणजे मी मिळवली ती**

**महाराज: वा! अत्यंत विद्वान दिसतोय पदवीधारक गानसेन.. कुठे मिळाली तुला ती पदवी?**

**शिक्षणमंत्री: म्हणजे डिग्री?**

**गानसेन: तीन वर्षे पहिली संगीत स्नातक मग स्नातकोत्तर संगीतरतन.. मग ही संगीत भूषण..**

**महाराज: वा! बरीच तपश्चर्या दिसतेय.. कुठे मिळाल्या या पदव्या?**

**गानसेन: पार उत्तरेस.. संगीत विद्यापीठ.. दरभंगा आणि झुमरीतलय्या येथे..**

**महाराज: म्हणजे तुझे वास्तव्य इतकी वर्षे उत्तरेस होते?**

**गानसेन: नाही महाराज.. मी तिथे गेलो तर इकडील कारभार कोण पाहिल? यू नो फार्मिंग.. वुई आर अ फॅमिली ऑफ फार्मर्स.. यू नो..**

**महाराज: कळत काही नाही.. कानाला बरी वाटते ही भाषा.. आंग्ल..**

**शिक्षणमंत्री: होय महाराज.. हा म्हणतोय की हा जर तिकडे जाऊन राहिला असता इतकी वर्षे तर याची शेती कोणी पाहिली असती?**

**महाराज: म्हणजे.. याला पदवी..**

**गानसेन: सिंपल महाराज.. डिस्टन्स एज्युकेशन.. पोस्टल कोर्स.. संगीताचा! तो केला की डिग्री हातात.. डबल फी भरली तर निम्म्या वेळात.. यू नो..**

**महाराज: संगीत आणि ते काय म्हणालास.. पोस्ट कोर्स..**

**शिक्षणमंत्री: पोस्टल कोर्स म्हणजे तिकडून ते माहिती पाठवणार नि हा इथे शिकणार..**

**महाराज: म्हणजे.. गुरू नाही? प्रत्यक्ष वादन नाही..**

**गानसेन: गुरू? द्याट्स आऊटडेटेड.. म्हणजे आजकाल आम्ही स्वतःच शिकतो.. काय म्हणतात ते स्वावलंबी.. सेल्फ डिपेंडंट!**

**महाराज(उपरोधाने) : वा! काय संगीतभूषण आहे!**

गानसेन: थ्यांक्यू.. म्हणजे धन्यवाद

महाराज: पण तरीही आम्ही तुम्हाला पदरी ठेवून घेऊ म्हणतो. प्रधानजींनी मेहनतीने शोधून काढलेय तुला

प्रधानजी: धन्यवाद महाराज

गानसेन: पण मी कुठेच नोकरी केली नाही आजवर

प्रधानजी: मग आता करशील

शिक्षणमंत्री: देअर इज ऑलवेज अ फर्स्ट टाइम यंग मॅन..

महाराज: खरंय.. पण गानसेना.. तुझे खास असे काय.. शास्त्रीय गायन?

गानसेन: नो नो.. नो शस्त्र.. मी शस्त्रावर विश्वास नाही ठेवत.. आय बिलिव्ह इन पीस..

महाराज: कसलं पीस? मोरपीस की कबुतर

शिक्षणमंत्री: तो म्हणतोय की.. नाही त्याला शास्त्रीय म्हणजे काय ते कळले नाही.. गानसेना.. शास्त्रीय म्हणजे क्लासिकल म्युझिक..

गानसेन: ओह! नो नो.. क्लासिकल नाही..

महाराज: रागदारी..

गानसेन: नाही महाराज.. नाही रागावलो मी..

प्रधानजी: महाराज.. याला शास्त्रीय नाही..अशास्त्रीय संगीत येत असावे.. झुमरीतलय्यातला पदवीधर आहे हा..

महाराज: मग तू कसली गातोस गाणी? कुठले घराणे..

**गानसेन: घराणे.. आय डोण्ट नो.. पण महाराज.. मी गातो ते.. यू नो फ्री लान्स..?**

**महाराज: हा काय आंग्ल तारे तोडतोय शिक्षणमंत्री?**

**गानसेन: नो तारे.. यू नो..**

**महाराज: गानसेना.. आमच्या मंत्र्यास बोलू दे.. तर मंत्री..**

**शिक्षणमंत्री: खरे सांगू महाराज.. हा मनास येईल तसा गातो..**

**गानसेन: करेक्ट.. तेच म्हणतोय मी.. मनास येईल ते आणि तसे..**

**महाराज: म्हणजे?**

**गानसेन: मीन्स.. सिनेमागीत.. डिस्को नि रॅप.. नि पॉप आणि हिपहॉप..**

**महाराज: हा काय बोलतोय.. ही कुठली नवीन संगीत घराणी?**

**शिक्षणमंत्री: याबद्दल आम्हाला ही नाही ठाऊक महाराज.. पण आपण यास येथे गाऊन दाखववावयाची आज्ञा करा म्हणजे काही उलगडा होईल..**

**महाराज: होय.. ही गोष्ट योग्य होईल..**

**गानसेन: यस्स.. प्रूफ ऑफ पुडिंग इज इन इटिंग..**

**महाराज: म्हणजे?**

**शिक्षणमंत्री: हा म्हणतो की पुडिंग.. हां.. बेसन पुडिंग.. म्हणजे पिठलं बनले की नाही घरात याचा पुरावा हवा तर ते खाऊन पहावे लागते..**

**महाराज: पिठलं.. हा पिठलं बनवतो की गातो?**

शिक्षणमंत्री: नाही महाराज.. एक उदाहरण.. म्हणजे तो गाऊन दाखवेल तेव्हा आपल्या लक्षात येईल तो कसा गातो ते..

महाराज: हे योग्य.. गा गानसेना गा..

गानसेन: सॉरी.. आय कान्ट..

शिक्षणमंत्री: व्हॉट डू यू मीन? गाणार नाहीस म्हणजे?

गानसेन: मी आधी गायचो.. मग मी ओथ घेतली..

शिक्षणमंत्री: ओथ म्हणजे प्रतिज्ञा..

गानसेन: जोवर कुठे कामास सुरुवात होत नाही तोवर गायचे नाही.. त्यामुळे मी गाऊ शकत नाही..

महाराज: आणि मी तुला दरबारी गायक म्हणून ठेवून घेतले तर?

गानसेन: नाही.. मला अडकून पडायचे नाही.. मुक्त.. फ्री

महाराज: म्हणजे तू कामास लागणार नाहीस आणि गाणारही नाहीस.. आम्हाला एका दरबारी गायकाची अत्यंत आवश्यकता आहे..

गानसेन: पण नाही.. आय डोण्ट..

महाराज: आमची आज्ञा आहे.. आजपासून तू दरबारी गायक.. ही आमची आज्ञा आहे..

गानसेन: आज्ञ्या.. व्हॉट्झ दॅट?

शिक्षणमंत्री: ऑर्डर.. ऑर्डर..

गानसेन: ओके.. मग.. तर मी दोन दिवसांनी आनंदाने गाईन..

**प्रधानजी: दोन दिवस?**

**गानसेन: यस्स.. टू डेज.. काय म्हणतात तो रियाझ करेन.. प्रॅक्टिस यू नो..**

**महाराज: शाबास.. रियाजाशिवाय गाणे नाही.. आम्ही प्रसन्न आहोत.. आजपासून तू आमचा शाही गायक..**

**प्रधानजी.. यास त्याचा पगार आणि बाकीचे समजून सांगा..**

**प्रधानजी: प्रति मास नवीन आलेल्यास तीनशे रजत मुद्रा आणि एका वर्षाने त्यात दहा टक्क्यांची वाढ.. मूळगावी जाण्यास सुटी भरपगारी वर्षात दहा दिवस.. घोडागाडी दिमतीस..**

**महाराज: आणि आम्ही आमच्या पदरी ठेवलेल्या कोणासही कधीच नोकरीतून कमी करत नाही.**

**शिक्षणमंत्री: जॉब सिक्युरिटी यू नो गानसेन..**

**गानसेन: आता महाराजांचीच आज्ञा आहे तर मला व्हावेच लागेल जॉईन. पण महाराज.. आपण परत एकदा विचार करावा.. मला पदरी घेण्याआधी..**

**महाराज: खामोश.. आम्हाला.. या गीतशरणास.. आमच्या पदरी हा गानहिरा हवाच.. गानसेना.. तुला प्रधानजी नेमणूकपत्र देतील.. दोन दिवसांनी आम्ही तुझे ऐकू गाणे तोवर.. तोवर आम्ही स्वतःच गाऊ.. जा.. रियाजास लाग..**

**गानसेन: आङ्न्या महाराज..**

**(गानसेन जातो.)**

महाराज: प्रधानजी.. आम्हास दिसते सुखस्वन.. उघड्या डोळ्यांनी पाहतो आम्ही ते

प्रधानजी: कोणते महाराज?

महाराज: विचार करा.. आमच्या नवरत्नांपैकी एक.. गानहिरा गानसेन.. रोज रंगेल दरबारात गाण्याची मैफिल.. सुरांच्या साजात सचैल न्हाऊन निघतील दरबारी आणि आम्ही देखील.. पण आज आमचे मन गात आहे.. ह्रदयातून आवाज येत आहे आमच्या.. अंतर्हृदयाच्या कोपऱ्यातून.. येत आहेत स्वरतरंग आणि स्वरलहरी.. ज्यातून प्रकटेल जादुई सुरांचा जादुई माहोल.. सुरांची बरसात.. त्यातून चिंब न्हाऊन निघणारे आम्ही..मग सगळीकडे सूर सांडतील.. पाणी साठावे तसे साठतील.. मग बनतील सुरांचे जलाशय.. त्या सुरांच्या जलाशयात सूर मारून मनसोक्त पोहणारे आम्ही.. अहाहा! गानसेन करील या गीतशरणाचे कर्ण तृप्त.. तृप्त मनाने हाकू आम्ही राज्यकारभाराचा शकट.. वा! मग नाही गरज आम्हाला त्या तुकड्यांची.. कर्ण तुकड्यांची!

(गाऊ लागतो)

सुरां साथीने

संगतीने सुरांच्या

उमटेल संगीत..

शब्द हरवले

सूर गवसले

**हृदयातून प्रकटे गीत..**

**थोर नियंत्या**

**उपकार तुझे रे..**

**माझिया मनी**

**उमटेल गान रे..**

**अंतरातूनी**

**प्रकटेल तान रे..**

**आणि प्रकटेल**

**सुगम संगीत..**

**हृदयातून प्रकटे गीत..**

**गानशरणा या**

**हृदयी परिमल..**

**सूर न शब्द हे**

**किती हे विमल..**

**संगीत संगती**

**पसरे दरवळ..**

**आणि प्रकटेल**

**धुंद मधुर ते गीत..**

**हृदयातून प्रकटे गीत..**

**अता न कधीही**

**गीतशरण एकला..**

**सूर संगतीने**

**संगती असला..**

**गीत संगीत गान**

**संगती बसला..**

**सुमधुर सुंदर आणि सुरेल**

**हृदयातून प्रकटे गीत..**

**(दरबारी टाळया वाजवत शेवटी 'हृदयातून प्रकटे गीत' म्हणतात.. हळूहळू अंधार पसरतो.. परत उजेड होतो तेव्हा दरबार भरलेला आहे. महाराज सिंहासनावर आहेत. आज कानात कर्णतुकडे नाहीत..)**

महाराज: गानसेना.. केलास ना रियाज.. आता होऊन जाऊ देत.. मैफिल.. घाल आपल्या सुरांची मोहिनी.. आज दरबारात नवे पर्व सुरू होत आहे.. आम्ही आतुर आहोत..

गानसेन: हैल महाराज.. म्हणजे महाराजांचा विजय असो. आपली आड्न्या आणि मी हुकुमाचा ताबेदार. आज त्या संगीतभूषण पदवीचे चीज झाले.. द एक्स्पेन्सेस गॉट जस्टीफाइड.. मी आपल्यापुढे नवीन पद्धतीने गाणी सादर करीत आहे महाराज.. होप यू लाइक इट..

शिक्षणमंत्री: म्हणजे महाराज.. सेवा गोड मानून घ्यावी

गानसेन: ऐकावे महाराजांनी.. या गाण्यामागे गेल्या फिफटीन इयर्सची मेहनत आहे.. लिसन..

(गानसेन गाऊ लागतो.. चाल एकदम रॅप म्युझिकची.. गानसेनाचा आवाज बरा आहे पण त्यातही सुरांस कच्चा. एकतर दरबारी गाण्यात न बसणारे शब्द नि चाल.. त्यात सूर नि तालाची गल्लत.. संगीताची जाण असलेल्या महाराजांच्या कानास सारे चांगलेच खटकते असे भाव जसजसे गाणे पुढे जाईल तसे उमटत जातात)

गानसेन:

महाराज..

हे हे महाराज..

गानशरण ..

त्यांना नाही मरण..

नाही मरण

मी त्यांना शरण..

महाराज.. महाराज... महाराज..

मी आलो कुठून..

मी जाईन कुठे..

गाणे बोलीन

मी गाईन कुठे..

महाराज.. हे महाराज..

हे हे महाराज.. महाराज..

मी गातो सुरात

माझ्या सूर गळयात..

महाराज ऐकती

गाईन त्यांच्या कानात..

मी तळयात मळयात..

गाणे गळयात गळयात..

गीत गीत सुरात सुरात..

सुरात सुरात.. सुरात सुरात..

महाराज.. महाराज..

हे महाराज.. हे हे महाराज..

माझ्या गळयामध्ये

वसे गंधार गंधार

सूर्य मावळता होतो

अंधार अंधार..

माझ्या गाण्याचा पसरेल

प्रकाश प्रकाश.. प्रकाश..

होईल मोकळे मोकळे

आकाश.. आकाश.. आकाश..

माझ्या आकाशीचा देव कोण?

महाराज.. महाराज..

हे महाराज.. हे हे महाराज..

झाली महाराजांची

कृपा कृपा

हे नरवर नरवीर

नृपा नृपा

कृपा महाराजांची

झाली माझ्यावर

प्रेम पहिले पहिले

माझे गाण्यावर..

गाण्यावर

ऐकून माझे गाणे

तृप्त महाराज.. महाराज..

हे महाराज.. हे हे महाराज..

(दरबारी स्तब्ध होतात. कुणी काहीच बोलत नाहीत..)

महाराज: गानसेना.. आता कळले आम्हाला.. तुला रियाजाची गरज का होती आणि अजूनही आहे.. जा आणि तातडीने परत रियाज करून उद्या अजून काही सादर कर..

गानसेन: धन्यवाद महाराज.. प्रॅक्टिस मेक्स मॅन परफेक्ट.. मी जातो आणि तयारीस लागतो..

(गानसेन जातो.)

महाराज: प्रधानजी.. यास गानहिरा म्हटले आम्ही काल.. यास दरबारी गायक बनवून..

प्रधानजी: अजून एक संधी देऊन बघावी महाराज.. कदाचित दरबारात पहिल्या प्रथम गाण्याचा ताण असेल..

महाराज: तुम्ही म्हणता ते ठीक.. आम्ही संगीताबद्दल उदार आहोत.. तो कुठल्यातरी पाश्चात्य पद्धतीने गायला ते ठीक.. पण सूर? संगीतभूषण..

प्रधानजी: कदाचित त्या झुमरीतलय्या विद्यापीठात हेच शिकवले असेल..

महाराज: राजगुरू.. आपले काय म्हणणे आहे?

राजगुरू: महाराज, जास्त अपेक्षा न ठेवल्यास अपेक्षाभंगाचे दु:ख जास्त होत नाही.. त्यामुळे..

महाराज: आपण म्हणता ते योग्य आहे राजगुरू.. तरीही..

शिक्षणमंत्री: महाराज.. झुमरीतलय्यतील खरेदी केलेल्या पदवीबद्दल याहून जास्त अपेक्षा करणे योग्य नाही..

प्रधानजी: महाराज.. आमचे मत असे आहे की यास एक संधी द्यावी अजून..

महाराज: खरे आहे.. आणि त्यावाचून दुसरा उपाय तरी काय आहे? आता वाट पाहावी.. कुणी सांगावे.. असो.. आम्ही ते कर्णतुकडे घालून बसतो.. आजचे कामकाज येथेच बरखास्त.. नाहीतर नको.. नकोच ते कर्ण तुकडे.. नको ते संगीत.. त्यापेक्षा हा रूक्ष राज्यकारभार बरा.. प्रधानजी.. दरबाराचे कामकाज सुरू करावे..

प्रधानजी: जो हुकूम महाराज..

***

(दिवस दुसरा. सारे दरबारी आहेत. समोर गिटार हाती घेऊन कानसेन. गाणे गायला तयार.)

महाराज: गा गानसेना.. आज तयारी चांगली झाली असणारच..

गानसेन: महाराजांचे आशीर्वाद.. ऐकावे महाराजांनी..

(गाऊ लागतो)

मी

मी गॅनसेन..

मी गॅनसेन..

तुमी तुमी तुमी तुमी

कॅनसेन

कॅनसेन कॅनसेन..

माज्या गान्याची

गॅंमत गॅंमत

हिपहॉपाची

रॅंगत रॅंगत रॅंगत

नॅंचा गावा रे

माज्या सॅंगत सॅंगत

जॅस्ती नाय काय मी

मॅंगत मॅंगत मॅंगत..

मी गॅनसेन.. गॅनसेन

तुमी कॅनसेन.. कॅनसेन

माजॅ म्युझिकचा वाजतो

डॅंका डॅंका डॅंका

माजॅ म्युझिक सगळीजण

आयका आयका आयका

डोले मिटुन

डोले मिटुन डोलनार

बरका बरका बरका

कारण मीच तो

तॅनसेन तॅनसेन तॅनसेन..

सॅंगीत भूषण गॅनसेन..

तुमी कॅनसेन कॅनसेन कॅनसेन..

महाराज: गानसेन.. बस्स.. थांब.. तुझ्या तोंडी तानसेनाचे नाव.. तॅनसेन.. तॅनसेन.. प्रधानजी यास येथून लगेच रवाना करा.. या दरबारात आमच्या पिताजींनी सुरांचे सिंचन केले.. स्वरांची बाग फुलवली तेथे हा धागडधिंगा.. जल्दी.. प्रधानजी.. आमच्या संयमाचा कडेलोट होण्याआधी..

(प्रधानजी शिपायास इशारा करतात.. शिपाई गानसेनास घेऊन जातात.)

महाराज: प्रधानजी.. याचे आता काय करावे.. गानहिरा.. जमिनीखालील कोळशासारखाच निघाला..

प्रधानजी: सत्य आहे महाराज..

महाराज: संगीत विशाल आहे.. पण त्यात असल्या बदसुरत कणसुरास स्थान नाही.. प्रधानजी: होय महाराज.. त्याच्या पदवीस भुललो.. पण.. आम्ही अजून शोध घेतो महाराज.. कुणी न कुणी मिळेलच आपल्यासाठी..

महाराज: नाही प्रधानजी.. नाही.. आजपासून आम्ही संगीताचे वेड सोडले.. या गानसेनाने आमच्या मस्तिष्कात काय बदल घडवले ठाऊक नाही पण आता हे गाणे नको.. त्याहून रूक्ष गद्य संवादच बरा.. एक मात्र करा

प्रधानजी: हुकूम महाराज

महाराज: गानसेनास परत दरबारात बोलावू नये..  कधीही..

प्रधानजी: पण त्यांची नेमणूक..

महाराज: गलती झाली आमचीच.. राहील  पदरी.. न गाणारा गायक म्हणून.. सरकार दरबारची नोकरी.. आपणच त्यास तसे नेमणूकपत्र दिले आहे..

प्रधानजी: महाराज खूप अस्वस्थ वाटत आहे आपणास.. मागील मासात आपला रथचालक असाच रथ चालवण्यायोग्य नसल्याने बसवला गेला.. रथचालकास रथ न चालवण्याचे काम! तसेच हे.. दरबारी गायक आणि त्यास गावयास बंदी..

महाराज: खरे आहे.. पण आम्हास आमचेच आश्वासन पाळावे लागेल.. आणि आजपासून संगीतास सुट्टी.. गद्य व्यवहार.. गद्य विचार.. पण तो उद्यापासून.. आज दरबार बरखास्त..

प्रधानजी: जो हुकूम महाराज!

शिपाई:

(गाऊ लागतात..)

ऐका तुम्ही सकल जन ते ऐका

होई बरखास्त हा दरबार..

गीतशरण महाराज..

परतुनी येतील..

महाराज( एकाएकी): खामोश.. आजपासून हे संगीत बंद.. या सांगितीक घोषणा बंद.. कदाचित नेहमीसाठी नाहीतर कमीत कमी या गानसेनाचा अंमल उतरेपर्यंत तरी.. गीतशरण.. आता शरण जाईल.. गाण्यास नव्हे.. पद्यास नव्हे.. तर गद्यास.. आम्ही निघतो..

(महाराज निघून जातात आणि पाठोपाठ पडदा पडतो.)



# ९ महाराज सत्यदेवराय यांचा दरबार

महाराज सत्यदेवराय दरबारात येत आहेत.. सिंहासन आहे.. मागे तीन माकडांचे चित्र. तेच.. न बोलणारे, ऐकणारे आणि पाहणारे माकड. खाली सत्यमेव जयते मोठ्या अक्षरात लिहिलेले. बाजूला पांढऱ्या कपड्यातील न्यायदेवतेचा बैठा पुतळा. तिच्या हाती नेहमीचा तराजू नाही. भाजीवाले वापरतात तसा तराजू तिच्यासमोर.. बाजूला वजनं पडलेली. डोळ्यांवर काळा स्टायलिश गॉगल. बाजूला सत्यवचनी युधिष्ठिराच्या रथ हवेत चालत असतानाच्या फोटोची तसबीर, चंदनाचा हार घातलेली.

पाठून आवाज..

सदा सत्य बोला सदा सत्य चाला..

नित्य सत्य बोला नित्य सत्य चाला..

सत्य राम नाम आहे

राम नाम सत्य आहे..

सत्यदेवमहाराजांचा विजय असो..

महाराज येतात. युधिष्ठिराच्या तसबिरीची पूजा करून नमस्कार करतात. मग न्यायदेवतेपुढील तराजूत वजन ठेवून दोन्ही तागड्या बरोबरीच्या आहेत की नाही ते बारकाईने

पाहतात. त्यांचे वजन अगदी योग्य झाल्याचे पाहून जाऊन सिंहासनावर बसतात. सारे दरबारी राम नाम सत्य आहे म्हणत टाळ्या वाजवतात.

महाराज: प्रधानजी.. दरबाराचे कामकाज सुरू करावे. जे जे काही सत्य असेल ते सांगून टाकावे..

प्रधानजी: हुकूम महाराज हुकूम..

(शिपाई लाल कापडातली गीता घेऊन उभा राहतो .. प्रधानजी गीतेवर हात ठेवत) जे सांगेन ते सत्य सांगेन.. सत्याखेरीज अजून काही सांगणार नाही.. नेहमीपेक्षा वेगळी वाटते पोथी.. (गीता उघडून पाहात..) घात झाला.. महाराज.. ही गीतेची ओरिजीनल प्रत नाहीच.. पायरेटेड कॉपी आहे महाराज..

महाराज: हे काय आहे सुरक्षामंत्री?

सुरक्षामंत्री: क्षमा असावी महाराज.. महाराज.. गीतेची प्रत चोरीस गेली.

प्रधानजी: काय? चोरी राजकचोरीत? नाही राजकचेरीत? आणि त्यातही गीता चोरीस जावी? असा कोण चोर आहे ज्यास एवढी आध्यात्मिक भूक आणि आध्यात्मिक ओढ आहे?

सुरक्षामंत्री: कोण आहे त्याचा ठावठिकाणा लागेलच पण तोपर्यंत काय? दरबारी कामकाज अडकू नये म्हणून तेव्हा आम्हीच ही पायरेटेड कॉपी आणवली..

प्रधानजी: पायरेटेड?

सुरक्षामंत्री: ओरिजीनल आणण्यासाठी तिजोरीतून अधिक रक्कम गेली असती..

प्रधानजी: म्हणून ही अनधिकृत प्रत?

सुरक्षामंत्री: अधिकृत काय आणि अनधिकृत काय.. गीता ती गीताच नाही का? आणि फक्त हातच तर ठेवण्यासाठी ती हवी असताना.. हा अनाठायी खर्च कशास..

**प्रधानजी: सत्य सांगावयाची शपथ जिच्यावर घ्यायची तीच पोथी..**

**महाराज(दुर्लक्ष करीत): प्रधानजी, पुढे बोलावे.. दरबारी कारवाई सुरू करावी.. सत्य सांगावे काय ते..**

**प्रधानजी: तर आपल्या आज्ञेवरून खालील सत्य बाबी ऐका..**

**महाराज: ह्यास द्विरुक्ती म्हणतात प्रधानजी द्विरुक्ती.. म्हणजे पिवळा पीतांबर.. किंवा आमच्या दरबारी सत्य.. आमच्या दरबारी फक्त आणि फक्त सत्य.. सत्य आणि सत्यच. आमचे ध्येय.. अंतिम सत्याकडे वाटचाल.. म्हणूनच राम नाम सत्य आहे आमच्या दरबारी.. तेव्हा बोलावे..**

**प्रधानजी: (हातातल्या पेपरातून वाचत) हुकुमावरून.. सादर करणेत येते की.. खालील बाबी शासनाचे विचाराधीन होत्या त्याबाबत केलेली वा करणेत येईल अशी कारवाई येणेप्रमाणे..**

**१. मौजे वरणगाव येथील नावाप्रमाणेच कोरडी नदी हिचेवर बांध घालणेत येईल असे आश्वासन मा. तलाठी श्री. हणमंतराव बळवंतराव इरेगौडा मकदूम यांनी दिले असून सदर प्रस्ताव महाराजांचे मंजूरीदाखल सरकार दरबारी दाखल करून घेणेबद्दल महाराजांची अनुज्ञाप्राप्ती अपेक्षित आहे.त्यापुढील कारवाई त्यानंतर करणेत येईल**

**महाराज: करून घेणे.. कोरड्या नदीवर बांध घालण्याची कल्पना नामी आहे**

**प्रधानजी: धन्यवाद महाराज. ही कल्पना आमचीच. सदर नदी कित्येक वर्षे कोरडी असून पुढमागे कधी हीस पूर आला तर बांधाचे बांधकाम कामी येईल..**

**महाराज: सत्य आहे.. पुढचे सत्य बोलावे..**

प्रधानजी: २. राज्यसीमेवरील सैन्यास गेल्या काही मासात भत्ता न मिळाल्याने सैनिकगडी कावलेला असून त्यास तातडीने तो मिळणेबाबत सरकार दरबारी अर्ज दाखल करून एक मास लोटल्याबद्दल त्याची मासिक पुण्यतिथी साजरी करावी अशी याचिका दाखल करणे बाबत निर्णय प्रलंबित आहे. त्याबाबतीत जलदीने निर्णय घेणे अनुज्ञेय आहे. महाराजांचे आदेश मिळाल्यास याबाबत पुढील कारवाई करणे संभव होईल..

महाराज: प्रधानजी.. त्या अर्जीचा समय कोणता होता?

प्रधानजी: मागील मासातील पाच

महाराज: आणि आज दोन तारीख असताना अशी अर्जी मासिक तिथीच्या आधी येऊ कशी शकते.. असत्य.. हे असत्य आमच्या दरबारी पचनी पडणार नाही.. रद्द करावा तो अर्ज..

प्रधानजी: सत्य आहे महाराज. आपली जशी आज्ञा महाराज.. आणि त्या भत्त्याबद्दल..

महाराज: असत्याधारित बाबीत आम्ही लक्ष घालत नाही प्रधानजी.. पुढील कारवाई सुरू करावी..

प्रधानजी: आज्ञा हुजूर..

३. शेतकरी बांधव संघटना या गैरशासकीय संस्थेने शेतकरी बंधुंच्या कथा आणि व्यथा यावर उद्बोधक असे कार्यक्रम आयोजिणेचे ठरविले आहे. त्यानिमित्ताने या कार्यक्रमास महाराजांनी जातीने उपस्थित राहून त्याचे उद्घाटन करावे असा विनंती अर्ज संघटनेच्या वतीने दरबार कचेरीत दाखल करणेत असून या संबंधात महाराजांनी मंजुरी दिल्यास पुढील कार्यवाही करता येऊ शकेल. त्याप्रमाणे महाराजांनी आदेश दिल्यास..

**महाराज: थांबावे. प्रधानजी, कोणत्याही गैर कामास आम्ही परवानगी देऊ शकत नाही. मग ती संघटना गैर शासकीय असेल तर तीस आम्ही अनुमोदन देणे ही गैर आहे नव्हे का? तेव्हा हे असत्य कर्म आमच्याने होणे नाही.. अर्ज बाद करावा प्रधानजी. पुढील कामाकडे वळावे..**

**प्रधानजी: जी हुजूर. ४. शिक्षण समिती ही गैर शासकीय संस्था.. महाराज ही देखील गैर शासकीयच असल्याने हिचा अर्ज देखील बाद करता येईल..**

**महाराज: अर्थात.. गैर असे कोणतेच काम येथे होणार नाही. येथे फक्त राम नामच सत्य असेल.. पुढे बोलावे.**

**प्रधानजी: जी हुजूर..**

**महाराज: आम्ही आधीदेखील सांगितले आहे. आम्हास श्री श्री सत्यान्वेषी बापू स्वामीमहाराज यांचा वरदहस्त आहे. स्वामीजींनी आजवर आम्हास दिलेले आदेश आम्ही पाळत आलो आहोत. त्यांच्या अनुग्रहानुसार सारे चालते येथे.. सारे काही सत्यान्वेषी. सदा सत्य चाला..**

**पुढे बोलावे..**

**प्रधानजी: आज्ञा हुजूर.. ५. या वर्षी देखील पावसाचे प्रमाण कमी असलेचे कारणाने गावातील विहिरी आटलेल्या असून तीतून गाळ उपसणे आणि खणणेची महाराज कृपेने परवानगी मिळावी अशी याचना करणारी अर्जी दाखल करणेत आली असून तत्संबंधी कारवाईचे महाराज कृपेने आदेश प्राप्त करणेची विचारणा ग्रामीण राज्यविभाग येथून करणेत आली आहे. त्यासंबंधी आदेश देणेची विनंती करणेत येत आहे.**

महाराज: खणणे? देऊन टाकावी परवानगी. खणणे अन असत्याच्या अमंगल अमलातून सत्य खणून काढणे या क्रिया एकसमान असल्याने या बाबीस परवानगी तात्काळ देण्याची विनाविलंब आणि ताबडतोबीने तजवीज व्हावी.

प्रधानजी: जो हुकूम महाराज. ६. राज्यातील सत्येंद्र, सत्येन, सत्येंद्रनाथ, सत्यवान, सत्यजित, सत्यवती, सत्यनारायण, सत्यम अशा नावांच्या नागरिकांना खास ओळख म्हणून सत्याचे शिलेदार असा किताब देणे संबंधात राज्य सांस्कृतिक विभाग येथून प्रस्ताव पाठविणेत आला असून त्याचा पाठपुरावा करणे. महाराजांचे मतानुसार त्यात सुधारणा करणे. तसेच या बाबतीत अन्य उपाययोजना करून सत्यास बळ आणि पाठबळ देणे. या संबंधी महाराजांचे मत विचारात घेऊन पुढील कारवाईसाठी दरबार कचोरीत.. नव्हे.. कचेरीत दाखल करणेत आलेल्या अर्जीबद्दल पुढील कारवाई हुकुमानुसार करणे यासाठी प्रलंबित अशा या माहिती अर्जाची छाननी करणे. पुढील कार्यवाही हुकुमानुसार करणेसाठी प्रस्ताव दाखल.

महाराज: छान. सरकारी भाषा क्लिष्ट असते असे ऐकून होतो आम्ही. आता यापुढे कदाचित आम्हास ही ती कळेनाशी होण्याची भीती आहे. पण इतक्या उदात्त कामासाठी आमची परवानगी घेण्याची जरूरी नाही. सत्य कोणत्याही रूपात असो. आमचा त्यास पाठिंबाच असेल.. आहे .. आणि यापुढेही राहिल. त्यामुळे सत्य ज्यांच्या नावातच असेल अशांना सत्याचे शिलेदार म्हणून आम्ही सत्यान्वेषीच कारभार करणार आहोत. हा प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्यात यावा. लवकरच अशा सर्व नागरिकांस ही उपाधी प्रदान करण्याचा समारंभ आयोजित करण्यात यावा अशी आमची आज्ञा आहे

प्रधानजी: हुकूम महाराज. लवकरच हे होईल महाराज..

**महाराज: वा! किती मंगल आणि उदात्त उदाहरण.. सत्याचे शिलेदार. आमचे हे असे एकमेव राज्य असेल जेथे असे घडत असेल. सत्य आणि निखळ सत्य. सत्यान्वेषी स्वामींच्या चरणी आमचे हे राज्य लीन आणि नतमस्तक होत आहे. आणि त्यात हे सत्याचे शिलेदार नव्याने सहभागी होतील. आम्ही प्रसन्न आहोत. आणि त्यात आमच्या .. खुद्द राजकचेरीतून गीता चोरीस जावी? आम्ही गोंधळलो आहोत. चोरास चोरीची बुद्धी व्हावी हे वाईट की गीतेसारख्या पोथीची ती करावीसे वाटणे हे चांगले.. असू देत.. पण हे राज्य सत्यान्वेषीच होते.. आहे आणि राहिल!**

**(शिपाई एका इसमाची मानगूट पकडून त्याला दरबारात घेऊन येतो आणि महाराजांच्या पुढ्यात टाकतो. )**

**प्रधानजी: हा कोण आहे?**

**सुरक्षामंत्री: हाच तो.. महाराज हाच तो ज्याने चोरली राजकचेरीतील गीता. आणि हाच तो ज्यास आम्ही पकडले रंगे हाथ..**

**प्रधानजी: म्हणजे.. यास गीता प्रत्यक्ष उचलताना पकडलेत?**

**सुरक्षामंत्री: नाही. आम्ही पकडले तेव्हा हा तेथून पळून गेला होता. गीता ही ह्याच्या हाती नव्हती..**

**प्रधानजी: मग रंगे हाथ म्हणजे?**

**सुरक्षामंत्री: म्हणजे याच्या हातास लागला आहे आपल्या गीतेच्या बाहेरील लाल वस्त्राचा लाल रंग.. दाखव रे हात..**

(तो इसम हात दाखवतो. त्यावर लाल डाग दिसतात..)

ते पहा.. लाल डाग.. रंगे हाथ.. हाच आहे गीता चोर महाराज.. हाच आहे चोर.

महाराज: तुम्हाला खात्री आहे मंत्री?

सुरक्षामंत्री: होय महाराज.. खात्री आहे. त्यादिवशी दरबारात गीतेवर हात ठेवून शपथ झाली.. गीता आम्ही आमच्या कचेरीच्या आतील फडताळात ठेवलेली. बाहेर पहारेकरी तैनात होता. फक्त गीता कोणी चोरेल याचा अंदाज नव्हता. एकतर राज दरबारी गीता. त्यात दरबारात चोरी. हा दरवानाची नजर चुकवून दरवाजातून आत शिरला.. दरबारी गीता उचलून पसार झाला. त्या भानगडीत त्याच्या हातास घाम सुटला आणि त्या लाल कापडाचा रंग याच्या हातास लागला. आमच्या सदा सतर्क शिपायाने हा रंग पाहून याची गचांडी पकडली आणि तडक त्यास येथे घेऊन आला.

महाराज: मग या इसमाचे काय म्हणणे आहे?

इसम: महाराज.. मी निर्दोष आहे. मी नाही चोरी केली.. माझ्या आयुष्यात शेवटची चोरी केलेली ती मी पाच वर्षे वयाचा होतो तेव्हा.. वरच्या शिंकाळयातील दही चोरलेले.. माखनचोर म्हणा.. त्यानंतर आईचा मार खाल्ला आणि नंतर चोरी कधी नाही केली.

सुरक्षामंत्री: मग हे लाल डाग?

इसम: ते महाराज त्या लाल रंगाच्या औषधाचे आहेत. एका मुलास खेळताना लागले पायास त्याला लावत होतो ते औषध. त्याचा रंग लागला आहे हाताला.

महाराज: मंत्री म्हणतात तूच केलीस चोरी आणि तू म्हणतोस नाही.. मग सांग कुणी चोरली पोथी?

इसम: महाराज, ते मला कसे असेल ठाऊक? गीतेची पोथी चोरीस गेली हे मला इथे आल्यावर कळले.. नाही मला कसे ठाऊक असणार?

सुरक्षामंत्री: प्रत्येक चोर असाच आपला बचाव करत असतो महाराज. आपण त्याच्याकडे लक्ष देऊ नये. आणि यास शिक्षा फर्मवावी कडकातील कडक.

महाराज: आता मंत्री म्हणतात म्हणजे ते सत्य असायलाच पाहिजे. तुझे आम्ही का ऐकावे? आधीच चोर वर शिरजोर?

इसम: नाही महाराज.. मी नाही केली चोरी.. चोरी झाली तेव्हा मी इथे कसा काय असेन?

सुरक्षामंत्री: ते तुलाच ठाऊक.. चोराच्या वाटा चोरालाच ठाऊक..

इसम: नाही महाराज..

महाराज: या दरबारात फक्त सत्यास स्थान आहे. सत्य सत्य आणि निखळ सत्य. अर्ध सत्य आणि असत्य यांना येथे स्थान नाही. शिपाई..

शिपाई: हुजूर..

महाराज: आम्ही सत्याचे पाईक सत्यदेवराय यांचा आदेश आहे हा.. यास कोठडीत टाका. चोरीचे कुकर्म त्यावर ती न केल्याच्या असत्य कथनाचे अधिक महत्पाप.. कुठे फेडशील? या असत्याची चीड आहे आम्हास.. घेऊन जा यास नजरेसमोरून..

(शिपाई इसमास घेऊन जातो. जाता जाता तो महाराज मी निर्दोष आहे.. निर्दोष आहे ओरडून सांगतो.. तो गेल्यावर..)

महाराज: किती हा खोटेपणा. कलंक.. कलंक.. असत्य कथन.. आम्ही न्यायदानात कसूर करत नाही. सत्यास मरण नाही आणि असत्यास थोडाही आश्रय नाही. पाहिलेत ना.. आमचा न्याय.. अचूक.. आणि सत्याधारित.. सत्यनिष्ठ आम्ही. जय न्यायदेवते.. जय जय श्री सत्यान्वेषी स्वामीजी.

प्रधानजी: महाराजांनी जिवास त्रास करून घेऊ नये. आम्ही बाकी पाहून घेऊ.. आपण थकला असाल महाराज.. थोडा विश्राम करावा..

महाराज: असे म्हणता.. ठीक. उद्या नव्याने येऊ इथे. सत्याचा शोध घेण्यास..

दुसरा दिवस.

महाराज नेहमीप्रमाणे येतात. नेहमीप्रमाणेच पूजा करतात. तराजूत वजन ठेवतात. सिंहासनावर बसतात. पाठून सदा सत्य बोला सुरू होते..

महाराज: प्रधानजी, सत्यकथन सुरू करा.

(शिपाई गीता घेऊन येतो.)

प्रधानजी: सत्य कथन करू अन सत्याशिवाय अन्य काहीही कथन करणार नाही.. ही गीता.. महाराज ही ओरिजीनल प्रत..

महाराज: काय? सुरक्षामंत्री.. तुम्ही मूळ प्रतीचा शोध लावलात? आम्ही खूप खूश आहोत..

सुरक्षामंत्री: पाहू.. होय महाराज.. ही मूळ प्रत.. शिपाई ही कुठे सापडली?

शिपाई: ही म्याच ठेवलेली म्हाराज.. त्या कपाटाच्या तळाशी.. त्यावरच्या कप्प्यात म्हाराज झुरळं लई झालीत म्हनून ठिवलं खाली..

**सुरक्षामंत्री: म्हणजे.. ती तू ठेवून गेलेलास.. काल आम्ही शोधून थकलो.. आम्हाला वाटले.. चोरी झाली की काय?**

**शिपाई: स्वारी.. काल माजी शी येल व्हती.. सांगायला इसरलो..**

**महाराज: म्हणजे.. चोरी झालीच नाही..**

**प्रधानजी: होय महाराज. दिसते तर असेच आहे.**

**महाराज: म्हणजे कालचा तो माणूस.. आणि आमचे न्यायदान..?**

***

**(यापुढे एकांकिकेस दोन शेवट संभवतात .. दोन्ही शेवट पुढीलप्रमाणे :**

**शेवट अ आणि ब )**

***

**( शेवट अ )**

**प्रधानजी: हे खरे महाराज की चोरी झालीच नाही.. पण..**

**महाराज: पण काय?**

**प्रधानजी: हे सत्य फार थोड्या लोकांस ठाऊक आहे..**

**महाराज: म्हणजे?**

**प्रधानजी: आता येथे जे आहेत ते वगळता कोणास हे ठाऊक आहे?**

**महाराज: याचा अर्थ?**

प्रधानजी: जे इतरांना ठाऊक तेच एक सत्य महाराज.. मग खरे सत्य दुसरे कुठलेका असेना! येथील चार लोक वगळता कुणास हे सत्य ठाऊक नाही.. आणि ज्या शिपायाने हे केले त्यास कैदेत टाकल्यास अन्य कोणाच्या कानी याची कुणकुण जाणार नाही.. या इसमास सोडून दिल्यास अन्यायाचा उगाच गवगवा होईल.. या उलट तो तिथे कैदेत राहिल्यास आपला सत्याचा अट्टहास सर्वांच्या डोळ्यांसमोर आदर्श म्हणून तसाच राहिल. आणि तो तसा दिसणे हे तसा असण्याहून जास्त महत्त्वाचे.

महाराज: म्हणजे? आम्ही त्या निरपराधास तसेच राहू द्यावे?

प्रधानजी: होय महाराज. सत्यवान राज्याच्या सत्याबद्दलच्या कळवळयाच्या कीर्तीसाठी कोणत्याही देशप्रेमी नागरिकाने असे बलिदान तर केलेच पाहिजे.. त्याचे बलिदान व्यर्थ जाणार नाही महाराज.. आपली आणि राज्याची कीर्ती देशविदेशी पोहोचेल.. आणि एक नागरिक म्हणून ते त्याचे कर्तव्यच ठरते.. अन आपला सत्याग्रह आपण तसाच सुरू ठेवू..

महाराज: आपण म्हणता ते खरे आहे प्रधानजी.. तूर्तास त्या शिपायाने चूक केली त्यास निष्ठूरपणे सजा देणे हीच एक सत्य बाब.. त्यास कैदेत टाका आणि दरबाराचे पुढचे कामकाज सुरू करा..

प्रधानजी: हुकूम महाराज..

महाराज: सत्याचे प्रयोग आपल्याला सुरू ठेवावेच लागतील.. तेव्हा सुरू करा सत्याचे कथन ..

प्रधानजी: आज्ञा महाराज..

शिपाई गीता घेऊन परत येतो..

प्रधानजी (गीतेवर हात ठेवून) : सारे काही सत्य सांगेन.. सत्याखेरीज दुसरे काही सांगणार नाही..

(प्रधानजी हे म्हणत असतानाच पडदा पडतो)

*****

( शेवट ब )

प्रधानजी: त्यास आम्ही सोडून देतो महाराज.. निर्दोष..

महाराज: ते तर तुम्ही करा. पण आमचे सत्यान्वेषी न्यायदान.. त्याचे काय झाले? असत्यास आम्ही थारा दिल्यास आमचे श्री श्री आमच्यावर कोपतील.. आणि आम्ही आता अस्वस्थ आहोत.. जा त्या इसमास घेऊन यावे ..

(शिपाई आत जातो. कालच्या त्या माणसास घेऊन येतो..)

महाराज: जा.. तू निर्दोष आहेस याची खात्री पटली.

इसम: धन्यवाद महाराज. हा सत्यकाम आपले आभार मानेल तितके थोडेच आहे. आम्ही जाऊन आपल्या न्यायदानाच्या गोष्टी जनतेस सांगू..

महाराज: कोणत्या? आणि सत्यकाम तू तुझे नाव आधी का सांगितले नाहीस? अशा नावाचा कोणी चोर कसा असू शकेल? तुला सत्याचा शिलेदार पदवी मिळेल.. जा..

सत्यकाम: धन्यवाद महाराज..

(हातावरील लाल डागाकडे पाहात सत्यकाम जातो)

महाराज: या शिपायाने केला घोटाळा. आम्ही आता काय करावे? आम्ही अस्वस्थ आहोत..

प्रधानजी: आम्ही राजगुरूंस बोलावून घेतो महाराज.. तेच आपल्याला योग्य मार्ग दाखवतील..

महाराज: शीघ्र.. तातडीने..

राजगुरू महाराजांच्या समोर उभे आहेत.

महाराज: राजगुरूजी.. एक धर्मसंकट जणू आमच्या समोर आहे..

(महाराज झाला प्रकार कथन करतात.)

राजगुरू: महाराज, या गोष्टीत पेच आहेच कुठे? आपण कशाचा शोध घेत आहात?

महाराज: अर्थात सत्याचा

राजगुरू: सत्याचा नाही महाराज.. शोध हा अंतिम सत्याचा असतो..

महाराज: म्हणजे आम्ही समजलो नाही..

राजगुरू: महाराज, अंतिम सत्य.. यातील अंतिम शब्द महत्वाचा. काल पर्यंत माहिती असलेले सत्य हे की त्या सत्यकामाने केली चोरी.. आजचे सत्य हे की चोरी झालीच नाही. तेव्हा सत्याचा शोध घेत रहावे.. सध्याचे अंतिम सत्य हे.. आणि हेच आहे. सत्य बदलत राहते.. अंतिम सत्याचा शोध सुरू ठेवावा..

महाराज: असे म्हणता राजगुरू.. म्हणजे सत्याचा शोध हा सत्यदेवराय सुरूच ठेवील.. आज चुकला तर उद्या ती चूक सुधारेल.. याचा अर्थ.. चूक करणे ही ती चूक सुधारण्याच्या आधीची पायरी आहे! आणि ती केलीच नाही तर सुधारणार काय? आणि शोध सत्याचा.. नव्हे अंतिम सत्याचा घेणार कसा?

राजगुरू: योग्य आहे हे महाराज

**महाराज: राजगुरूजी तुम्ही आमचा मोठा प्रश्न सोडवलात. आजवर आम्ही असत्याच्या भीतीने सदा ताणग्रस्त होत होतो.. आता ते बंद.. आजचे असत्य हे उद्याच्या सत्याची पहिली पायरी.. एवढे समजले की हा सत्याग्रह सोपा आहे.. आपण यावे राजगुरूजी..**

**(राजगुरू जातात.)**

**महाराज: दरबाराचे कामकाज सुरू करावे प्रधानजी..**

**शिपाई गीता घेऊन येतो.**

**प्रधानजी (गीतेवर हात ठेवून): जे सांगेन ते सत्य सांगेन..**

**महाराज: ही शपथ बदलावी प्रधानजी.. आजपर्यंतचे सत्य सांगेन म्हणा..**

**प्रधानजी: जी महाराज..**

**(गीतेवर हात ठेवून..) जे सांगेन ते आजवरचे सत्य सांगेन.. आजवरच्या सत्याखेरीज दुसरे काही सांगणार नाही..**

**( प्रधानजी हे बोलत असताना पडदा पडतो )**